रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड शुक्रवार । दि. १२ जून २०२६ । अंक ६ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### राज्यभरातील शिक्षकांना दिलासा

**मुंबई :** राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आभा कार्ड सक्तीबाबत घालण्यात आलेली जाचक अट शिक्षण विभागाने रद्द केली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २२ मे रोजी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकात आभा कार्ड नसल्यास ५ लाख रुपयांपर्यंतच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके स्वीकारली जाणार नसल्याचा उल्लेख होता. या निर्णयावर शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतल्यानंतर शिक्षण संचालनालयाने १० जून रोजी शुद्धीपत्रक काढून संबंधित अट रद्द केली.

### महागाई भत्त्यात वाढ

**मुंबई :** राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत महागाई भत्त्यात (डीए) ५ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होऊन आर्थिक दिलासा मिळणार आहे. बैठकीत वेतनातील फरक, निवृत्तीवेतन आणि इतर प्रलंबित मागण्यांबाबतही चर्चा करण्यात आली.

## वेधक

### मुंढवा जमीन व्यवहार; ६ जुलैला सुनावणी

**पुणे :** मुंढवा येथील ४० एकर जमीन व्यवहारप्रकरणी करण्यात आलेला दस्त रद्द करण्याबाबतची पुढील सुनावणी ६ जुलै रोजी होणार असून, त्यावेळी महत्त्वपूर्ण निर्णय अपेक्षित आहे. जिल्हा प्रशासनाने ही जमीन केंद्र सरकारच्या मालकीची असून, तिचा विक्री व्यवहार व दस्तनोंदणी बेकायदेशीर असल्याचा दावा करत दिवाणी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणीत कुलमुखत्यारधारक शीतल तेजवानी आणि अमेडिया एंटरप्राइझेस कंपनीचे प्रतिनिधी अनुपस्थित राहिले. जिल्हा प्रशासनाने जमीन सरकारी मालकीची असल्याचे पुरावे न्यायालयात सादर केले.

### तीन सख्ख्या भावांचा बुडून मृत्यू

**खेड :** खेड शहर व भोस्ते गावाच्या सीमेवरील जगबुडी नदीतील बदामीचा पऱ्या येथील खोल डोहात पोहण्यासाठी उतरलेल्या चार सख्ख्या भावांपैकी तिघांचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरूवारी दुपारी घडली. मुंबईहून खेड येथे नातेवाईकांकडे आलेले हे चार भाऊ पोहण्यासाठी नदीत उतरले होते. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. मदतीसाठी आरडाओरड करण्यात आली, मात्र तिघांना वाचविण्यात अपयश आले. घटनेची माहिती मिळताच खेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### अमेरिकेचा इराणवर पुन्हा हल्ला

**नवी दिल्ली :** अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं बुधवारी इराणमधील विविध शहरांवर हल्ले केल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. इराणकडून सुरू असलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई केली जात असल्याचं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं प्रसार माध्यमावर स्पष्ट केलं आहे. अब्बास, सिरिक, मिनाब, केशम बेट आणि उत्तरेकडील गोरगन शहरात हल्ले करण्यात आले आहेत. अमेरिकेनं इराणवर हल्ले केल्यानं तेहराननं पुन्हा होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. त्यामुळे पुन्हा मध्य पूर्वेतील देशात तेल, इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

# तस्करीचा डाव, कस्टमचा घाव

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

**फर्निचर आयातीच्या नावाखाली चीनमधून भारतात प्रतिबंधित ई-सिगारेट्सची मोठी तस्करी करण्याचा प्रयत्न न्हावा शेवा कस्टम्सने हाणून पाडला आहे. जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊस (जेएनसीएच) येथील विशेष तपास आणि गुप्तचर शाखेने (एसआयआयबी-आयात) केलेल्या धडक कारवाईत तब्बल ९२.८० कोटी रुपये किमतीच्या १ लाख १६ हजार ई-सिगारेट्स जप्त करण्यात आल्या आहेत. न्हावा शेवा बंदर परिसरात उघडकीस आलेल्या या प्रकरणामुळे तस्करीच्या आंतरराष्ट्रीय जाळ्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.**

फर्निचरच्या आडून **92.80** कोटींच्या ई-सिगारेट्सची तस्करी

चीनमधून आलेल्या कंटेनर्समध्ये सापडल्या **1.16** लाख प्रतिबंधित व्हेप्स

तस्करीच्या आंतरराष्ट्रीय रॅकेटकडे तपास यंत्रणांची नजर

गुप्त माहितीच्या आधारे कस्टम्स अधिकाऱ्यांनी चीनमधून आलेल्या दोन संशयास्पद कंटेनर्सवर लक्ष ठेवले होते. कागदोपत्री या कंटेनर्समध्ये फर्निचर असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, अधिकाऱ्यांना संशय आल्याने कंटेनर्सची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान फर्निचरच्या आडून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित ई-सिगारेट्स लपवून आणल्याचे उघड झाले आणि तस्करांचा डाव उधळून लावण्यात आला. कारवाईदरम्यान ब्ल्यूबेरी आइस, वॉटरमेलन आइस, पीच लिची ब्लॅककरंट, स्ट्रॉबेरी वॉटरमेलन, किवी पॅशन फ्रूट पेरू, कोला आइस, ब्लॅकबेरी आइस, ट्रिपल मँगो यांसारख्या विविध फ्लेवर्समधील सुमारे १ लाख १६ हजार ई-सिगारेट्स जप्त करण्यात आल्या. सीमाशुल्क विभागाच्या माहितीनुसार, या संपूर्ण मालाची बाजारातील किंमत तब्बल ९२.८० कोटी रुपये इतकी आहे.

भारतामध्ये ई-सिगारेट्स प्रतिबंधक कायदा २०१९ अंतर्गत ई-सिगारेट्स तसेच इलेक्ट्रॉनिक निकोटीन डिलिव्हरी सिस्टीम्स (ईएनडीएस) यांच्या उत्पादन, आयात, निर्यात, विक्री, वितरण आणि साठवणुकीवर संपूर्ण बंदी आहे. त्यामुळे सीमाशुल्क कायदा १९६२ च्या कलम •> पान २ वर

#### काय आहे ई-सिगारेट्स बंदी कायदा?

ई-सिगारेट्स प्रतिबंधक कायदा २०१९ नुसार भारतात ई-सिगारेट्स आणि इलेक्ट्रॉनिक निकोटीन डिलिव्हरी सिस्टीम्स (ईएनडीएस) यांच्या उत्पादन, आयात, निर्यात, विक्री, वितरण, जाहिरात आणि साठवणुकीवर बंदी घालण्यात आली आहे. तरुणांमध्ये वाढणारे व्यसन आणि आरोग्यावरील गंभीर परिणाम लक्षात घेऊन केंद्र सरकारने हा कायदा लागू केला आहे.

#### बनावट घोषणापत्रांचा वापर

चीनमधून आलेल्या दोन कंटेनर्समध्ये फर्निचर असल्याचे कागदोपत्री नमूद करण्यात आले होते. मात्र, कस्टम्सच्या विशेष तपासात त्यामध्ये लपवून ठेवलेल्या १.१६ लाख प्रतिबंधित ई-सिगारेट्स आढळून आल्या. बनावट घोषणापत्रांचा वापर करून बंदी असलेला माल देशात आणण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.




# आज ग्रामपंचायत आरक्षणाची सोडत

■ **रायगडमधील ३३६ ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा**

■ **सकाळी ११ ते दुपारी २ दरम्यान आरक्षण जाहीर होणार**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील मुदत संपलेल्या तसेच मुदत संपण्याच्या मार्गावर असलेल्या ग्रामपंचायतींच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सदस्य आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्ह्यातील ३३६ ग्रामपंचायतींच्या सदस्यांच्या आरक्षणाची सोडत आज, शुक्रवार (दि. १२) रोजी काढण्यात येणार असून, प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम पार पडणार आहे.



आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभा बोलावण्यात आली असून तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांचे राजकीय •> पान २ वर

#### ८ जुलैपर्यंत चालणार अंतिम प्रक्रिया

ग्रामपंचायत सदस्य आरक्षण सोडतीनंतर संबंधितांकडून हरकती व अभिप्राय स्वीकारले जाणार आहेत. त्यानंतर प्राप्त हरकतींची छाननी करून अंतिम आरक्षण निश्चित केले जाईल. जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार असून, ही प्रक्रिया ८ जुलैपर्यंत पूर्ण होणार आहे.

# आठ दिवसांत बॅरिअर्स बसवणार?


■ **नवेदर बेली पूल मोजतोय अखेरची घटका**

■ **वर्षभर निद्रावस्थेत असलेल्या बांधकाम विभागाचे पुन्हा आश्वासन**

**। चौल । प्रतिनिधी ।**

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील बेली पूल दिवसेंदिवस अधिक धोकादायक बनत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाने पुन्हा एकदा आश्वासनांची मलमपट्टी करण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्हा वाहतूक पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी लेखी आदेश देऊनही आठ दिवस उलटले तरी एक साधा लोखंडी बॅरिअर उभारता आलेला नाही. आता आठ दिवसांत बॅरिअर्स बसवू असा दावा बांधकाम विभागाकडून केला जात आहे. मात्र, गेल्या वर्षभरात पुलाच्या सुरक्षेसाठी ठोस पाऊल उचलता न आलेल्या विभागाच्या या नव्या आश्वासनावर नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

नवेदर बेली पुलाची दुरवस्था, ढासळलेले खांब, बाहेर आलेल्या गंजलेल्या सळ्या आणि वाढलेला अपघाताचा धोका याकडे वारंवार लक्ष वेधले जात असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ कागदी हालचाली केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. ४ जून रोजी दैनिक कृषीवलने या गंभीर प्रश्नाला वाचा फोडली. •> पान २ वर



> जिल्हा वाहतूक विभागाकडून पत्र मिळाले आहे. येत्या आठ दिवसांमध्ये नवेदर बेली पुलावर लोखंडी बॅरिअर्स लावण्यात येतील. जेणेकरुन या पुलावरुन अवजड वाहनांना अटकाव करता येईल.
>
> – मोनिका धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

#### वर्षभर काय करत होतात?

गेल्या वर्षभरात पुलाच्या दुरुस्तीबाबत कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. मंजुरी, प्रक्रिया आणि तांत्रिक कारणांच्या नावाखाली वेळकाढूपणा झाल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे ''आठ दिवसांत बॅरिअर्स बसवू'' असे आश्वासन देऊन वेळ मारुन नेली जात आहे. आमचा आश्वासनांवर विश्वास नाही. मोठी दुर्घटना होण्याचीच संबंधित प्रशासन वाट पाहात आहे. त्यामुळे अपघात झाल्यास संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते दिपक गुरव यांनी दिला आहे.

# उत्पादन शुल्क विभाग अ‍ॅलर्ट मोडवर

**अवैध हातभट्टी, बनावट मद्याविरोधात धडक मोहीम; १२२ जणांना अटक**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पिंपरी-चिंचवड येथे घडलेल्या विषारी दारू दुर्घटनेत अनेकांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरातील उत्पादन शुल्क यंत्रणा अ‍ॅलर्ट मोडवर आली आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रायगड जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध हातभट्टी, बनावट देशी-विदेशी मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात व्यापक धडक मोहीम सुरू केली आहे. जिल्हाभरात अनेक ठिकाणी छापे टाकून हातभट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या असून, गेल्या दहा दिवसांत मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १२२ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईमुळे अवैध मद्य व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

पिंपरी-चिंचवड येथील विषारी दारू प्रकरणानंतर संपूर्ण राज्यात सतर्कता वाढविण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क विभागानेही तातडीने हालचाली सुरू करत हातभट्टीच्या दारू अड्ड्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. जिल्हाभरात कारवाईची तीव्रता वाढविण्यात आली असून, नागरिकांनाही अवैध मद्यनिर्मिती अथवा विक्रीबाबत माहिती असल्यास ती तात्काळ विभागाला देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. •> पान २ वर

> पिंपरी-चिंचवड येथील विषारी दारू प्रकरणानंतर जिल्हाभरात विशेष धाडसत्र सुरू करण्यात आले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाची पथके विविध भागांत सातत्याने कारवाई करत आहेत. दुर्गम आणि ग्रामीण भागांमध्ये स्थानिकांच्या मदतीने अवैध मद्यनिर्मितीच्या अड्ड्यांवर धाडी टाकल्या जात आहेत. हातभट्टीसह बनावट मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतूक करणाऱ्यांविरोधात ठोस कारवाई केली जात आहे. जिल्ह्यात कुठेही अवैधरित्या दारू विक्री, वाहतूक किंवा निर्मिती होत असल्याची माहिती नागरिकांनी तात्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावी.
>
> – रविकिरण कोले, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, रायगड

# मान्सूनची चाल मंदच!



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नैऋत्य मान्सून महाराष्ट्रात दाखल होऊन चार दिवस उलटले असले, तरी त्याची पुढील वाटचाल मंदावल्याचे चित्र आहे. ७ जून रोजी कोकणात दाखल झालेला मान्सून त्यानंतर अपेक्षित वेगाने पुढे सरकलेला नसल्याने राज्यातील अनेक भागांना अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा करावी लागत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, संथ गतीने पुढे सरकत असलेल्या मान्सूनला संपूर्ण महाराष्ट्र व्यापण्यासाठी आणखी किमान आठवडाभराचा कालावधी लागू शकतो.

हवामान विभागाने दिलेल्या विस्तारित अंदाजानुसार ११ ते १८ जून या कालावधीत राज्यातील विशेषत: •> पान २ वर

# 'रायगड भूषण'च्या खैरातीला ब्रेक

**जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांची ग्वाही**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा रायगड भूषण पुरस्कार यापुढे कोणत्याही परिस्थितीत खैरात स्वरूपात वाटला जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिली आहे. अलिबाग येथे झालेल्या एका सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांनी यासंदर्भात भूमिका स्पष्ट केल्याने आगामी काळात रायगड भूषण पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेत मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



रायगड भूषण हा जिल्हा परिषदेचा मानाचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय आणि उत्तुंग कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. समाजकारण, शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्र तसेच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींची या पुरस्कारासाठी निवड केली जाते. त्यासाठी दरवर्षी प्रस्ताव मागविण्याची •> पान २ वर

# व्यसनमुक्ती केंद्रातील तरुणाचा मृत्यू संशयास्पद

**नातेवाईकांचा संताप, चौकशीची मागणी**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील परहूर येथील व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या ३३ वर्षीय तरुणाचा गुरुवारी सकाळी संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर मृताच्या नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त करत व्यसनमुक्ती केंद्राच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, सखोल चौकशीची मागणी केली आहे. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याची माहिती समोर आली आहे. •> पान २ वर

**बाजारपेठांमध्ये शालेय साहित्य खरेदीची लगबग** | **१५ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात**

# प्रवेशोत्सवासाठी विद्यार्थी सज्ज

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सव्वा महिन्याच्या उन्हाळी सुट्टीनंतर सोमवार (दि. १५) पासून जिल्ह्यातील शाळांची घंटा पुन्हा एकदा वाजणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी विद्यार्थी उत्सुक झाले असून, शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने जिल्ह्यातील अलिबागसह प्रमुख बाजारपेठांमध्ये शालेय साहित्य खरेदीची लगबग वाढली आहे. पुस्तके, वह्या, दप्तर, कंपास, गणवेश आणि अन्य शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी पालकांसह विद्यार्थ्यांची गर्दी दुकानदारांकडे पाहायला मिळत आहे.



एप्रिलअखेर परीक्षा संपल्यानंतर एक मे रोजी निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी देण्यात आली होती. १४ जूनपर्यंतच्या या सुट्टीत अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसमवेत मूळगावी जाणे, नातेवाईकांकडे मुक्काम करणे, क्रिकेट, गोट्या यांसारख्या पारंपरिक खेळांचा आनंद घेणे अशा •> पान २ वर

#### स्वागताची जय्यत तयारी

जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. शाळांच्या प्रवेशद्वारांना तोरणे लावली जाणार असून, परिसरात आकर्षक रांगोळ्या काढण्यात येणार आहेत. मुख्याध्यापक, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात येईल.

# उपेक्षितांसाठी रस्त्यावर उतरु

**शरद पवार यांचे सूतोवाच**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

देशासमोर शेतकरी, बेरोजगार, आदिवासी, अल्पसंख्याकांचे प्रश्न मोठे आहेत. या सर्व उपेक्षित वर्गांच्या प्रश्नांमध्ये लक्ष द्यावे लागेल. या घटकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आगामी काळात रस्त्यावर उतरून संघर्ष करावा लागेल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी गुरुवारी केले.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापनदिन आज येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात साजरा करण्यात आला. यावेळी महाड सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त विशेष साहित्याचे, 'लोकसाहित्य' •> पान २ वर

#### अनावश्यक हस्तक्षेप झाल्यास विचार करणार

अजित पवार गटाचा गुरुवारी मुंबईत वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतरचा हा पहिलाच वर्धापन दिन सोहळा होता. यावेळी बोलताना सुनेत्रा पवार यांनी आतापर्यंत सर्वांना समजून घेतलं, पण यापुढे कुणीही अनावश्यक हस्तक्षेप केल्यास विचार केला जाईल, असा सूचक इशाराच सुनेत्रा पवार यांनी दिला आहे.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028
१९३७-२०२६ वर्ष ९०



# घोडीवली-अंजरुण पूल धोकादायक

## ● बांधकाम विभाग दुर्घटनेची वाट पाहतोय का? ●तातडीने दुरुस्ती करण्याची ग्रामस्थांची मागणी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील घोडीवली-अंजरुण मार्गावरील जुना पूल सध्या वाहतुकीसाठी धोकादायक बनला असून, त्याच्या दुरुस्तीकडे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. पुलावरील खड्डे, जीर्ण झालेली संरचना आणि संरक्षण कठड्यांचा अभाव यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.



गेल्या पावसाळ्यात याच पुलावरून घोडीवली येथील सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र पालांडे हे दुचाकीसह पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. त्यांचा अद्याप शोध लागला नसून कुटुंबियांनी त्यांना मृत घोषित केले आहे. एवढी गंभीर घटना घडूनही पुलाची दुरुस्ती न झाल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

घोडीवली, नावंढे आणि परिसरातील हजारो नागरिकांसाठी हा पूल महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र संरक्षण कठडे नसल्याने आणि पुलाची अवस्था दिवसेंदिवस खालावत असल्याने पावसाळ्यात जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी पुलाची दुरुस्ती, लोखंडी रेलिंग आणि जड वाहतुकीवर निर्बंध घालावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. बांधकाम विभागाच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

> “हा पूल अपघातांना आमंत्रण देत आहे. दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी आणि वाहनचालक या मार्गाचा वापर करतात. पावसाळ्यापूर्वी पुलाची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.”
> -अरुण पिंगळे, सामाजिक कार्यकर्ते

> “गेल्या वर्षी एका ग्रामस्थाचा जीव गेला, तरीही प्रशासन जागे झालेले नाही. यंदाही दुरुस्ती न झाल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. संबंधित विभागाने तात्काळ कारवाई करावी.”
> - रोहिदास पिंगळे, माजी सरपंच

### जड वाहतुकीमुळे वाढला धोका

सुमारे ५० वर्षांपूर्वी बांधलेला हा पूल पूर्णपणे जीर्ण झाला आहे. स्लॅबमधील सळ्या उघड्या पडल्या असून, जड वाहतुकीमुळे संरचना अधिक कमकुवत होत आहे. पुलावर बॅरिकेड्स आणि लोखंडी रेलिंग बसवून अवजड वाहनांना प्रतिबंध करणे आवश्यक असल्याचे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता सुदर्शन आगलावे यांनी म्हटले आहे. तसेच कायमस्वरूपी उपाय म्हणून पुलाची पुनर्बांधणी गरजेची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## ‘अंशदान भरण्याची सक्ती थांबवावी’

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

राज्यातील सहकारी पतसंस्थांना स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीसाठी अंशदानाच्या रकमेचा भरणा करण्याची सक्ती करू नये, अशी मागणी रायगड जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. जे.टी. पाटील यांनी सहकार आयुक्तांकडे केली आहे. यासंदर्भात सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी २०२५-२६ वर्षासाठी वार्षिक अंशदान जमा करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. मात्र, अंशदानाच्या मुद्द्यावर महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन तसेच नाशिक विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशन यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केल्या असून त्या सध्या प्रलंबित आहेत.

अंशदानाचा विषय न्यायप्रविष्ट असताना अंतिम न्यायालयीन निर्णय होण्यापूर्वी पतसंस्थांवर अंशदान भरण्याची सक्ती करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही, असे ॲड. पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे.

## एसईझेडची जमीन शासनजमा करण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठवावा

### ● महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंचे निर्देश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित केल्या होत्या. या जमिनीवर अद्यापपर्यंत कोणतेही प्रकल्प उभे राहिले नाही. त्यामुळे या जमिनी परत देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार या संपादित जमिनी शासन जमा करण्यासाठीचा प्रस्ताव पाठवावा, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित जमिनी परत मिळण्यासंदर्भात आमदार रविशेठ पाटील यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने मंत्रालयात मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी आमदार रवींद्र पाटील, वन व भूसंपादन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर उपस्थित होते. तर रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील पेण विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या जमिनी विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात आल्या होत्या. या प्रकल्पामध्ये आतापर्यंत कोणतेही प्रकल्प उभे राहिले नसल्याने या जमिनी मूळ जमीन मालकांना परत करव्यात अशी मागणी पाटील यांनी केली होती.

यावर मंत्री बावनकुळे यांनी याप्रकरणी रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादन अधिनियमानुसार विशिष्ट प्रकल्पासाठी संपादित जमिनीवर विहित कालावधीत तो प्रकल्प उभे राहिले नसल्यास ते परत करण्याची तरतूद असल्यास तपासणी करून यासंबंधीचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले.

# रोह्यातील विद्यार्थी राज्यात चमकले

## उत्तुंगतेज यंग सायंटिस्ट स्पर्धा परीक्षेत आठवे स्थान

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा येथील एमडीएन इंटरनॅशनल स्कूलचा इयत्ता ५ वीचा विद्यार्थी विहान अजित तेलंगे याने उत्तुंगतेजयंगसायंटिस्टकॉम्पिटिटिव्ह एक्झाम २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत राज्यात आठवे स्थान मिळविले आहे.विहानने १५० पैकी १२३ गुण मिळवत ही उल्लेखनीय कामगिरी केली असून, त्याची राष्ट्रीय स्तरावरील गुणवंत विद्यार्थी म्हणून निवड झाली आहे. तसेच त्याला इस्रो व आयआयटी शैक्षणिक भेट कार्यक्रम २०२६ साठीही निवडण्यात आले आहे.




विहानच्या या यशाबद्दल कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संदीप तटकरे,सचिव प्रकाश सरकले,रजिस्ट्रार अजित तेलंगे, एमडीएन इंटरनॅशनल स्कूलचे डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर,प्राचार्या योगिनी देशमुख मॅडम तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व वैज्ञानिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विज्ञान विषयातील आवड,सातत्यपूर्ण अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर विहानने मिळविलेल्या या यशामुळे शाळा,पालक आणि संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून भविष्यात तो विज्ञान क्षेत्रात आणखी मोठी कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## उरणमधील चाणजे परिसरात पाणीटंचाई

**। उरण । प्रतिनिधी ।**

अनेक वर्षे पाण्यासाठी वणवण करणाऱ्या उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील करंजा कोंढरीमध्ये यंदाही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. आठ दिवसांतून एकदा पाणी येत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा जनतेतून, नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. आणखी किती वर्षे पाणीटंचाई सहन करायची असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

करंजा कोंढरी आणि परिसर हा तालुक्यातील सर्वात मोठ्या चाणजे ग्रामपंचायतीचा भाग आहे. जवळपास ५० हजार लोकवस्ती आहे. या विभागाला पाणीपुरवठा करण्यासाठी कोट्यवधींच्या योजना राबविल्या आहेत. मात्र, तरीही येथील पाण्याचा प्रश्न न सुटल्याने करंजा येथील ग्रामस्थांनी उरण तहसील कार्यालयावर मोर्चा काढला होता. त्यानंतर काही महिन्यांनी आठ दिवसांनी पाणी मिळत होते. मात्र, काही दिवसांपासून पाण्याची वाट पाहात असल्याची माहिती कोंढरी येथील विनायक पाटील यांनी सांगून प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.

> “चाणजेत हद्दीत प्रचंड लोकसंख्येमुळे पाणीपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत आहे. करंजापर्यंत पाणी नेण्यासाठी पम्पिंग करावे लागते. उपाययोजना केल्या जात असून, लवकरच पाणीपुरवठा सुरळीत होईल.”
> - सुधीर चव्हाण, ग्रामविकास अधिकारी, चाणजे

# पर्यटकांच्या बेफिकीरीमुळे समुद्रातील अपघात वाढले

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या काशिद समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या निष्काळजीपणामुळे समुद्रातील अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. प्रशासन आणि स्थानिकांकडून वारंवार सूचना देऊनही अनेक पर्यटक सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष करत खोल पाण्यात उतरतात, त्यामुळे जीवितहानीच्या घटना घडत आहेत. नुकतेच जळगाव जिल्ह्यातील २५ वर्षीय तरुणाचा काशिद समुद्रात बुडून मृत्यू झाला, तर त्याच्यासोबत असलेल्या दुसऱ्या तरुणाचे प्राण वाचविण्यात यश आले. या घटनेनंतर पुन्हा एकदा पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### ● प्रशासनाच्या आवाहनांकडे दुर्लक्ष

काशिद समुद्रकिनाऱ्याची नैसर्गिक रचना इतर किनाऱ्यांपेक्षा वेगळी आहे. वाळूचा पट्टा, खोलगट भाग आणि खडकाळ क्षेत्र यामुळे समुद्रातील पाण्याच्या खोलीचा अचूक अंदाज पर्यटकांना येत नाही. त्यामुळे अनेकदा पोहताना अपघात घडतात. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाने पर्यटकांना समुद्रात उतरण्यापूर्वी आवश्यक माहिती घेण्याचे तसेच सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. जीव धोक्यात घालण्याऐवजी सावधगिरी बाळगून पर्यटनाचा आनंद घ्यावा, असेही सांगण्यात येत आहे.

पर्यटकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त होत आहे. अन्यथा अशा घटनांमुळे मुरुड पर्यटन क्षेत्राच्या प्रतिमेवर परिणाम होऊन स्थानिक पर्यटन व्यवसायालाही फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

## तस्करीचा डाव, कस्टम्स घाव

१११ (ड) अंतर्गत हा माल बेकायदेशीर घोषित करून जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, या तस्करीमागील आयातदार, परदेशी पुरवठादार आणि देशांतर्गत नेटवर्कचा शोध घेण्यासाठी सीमाशुल्क विभागाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. या तस्करीमागे कार्यरत असलेल्या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करण्यासाठी संबंधित कागदपत्रे, आर्थिक व्यवहार आणि आयात प्रक्रियेची बारकाईने चौकशी केली जात आहे.

न्हावा शेवा बंदर परिसरात झालेली ही कारवाई अलीकडील काळातील प्रतिबंधित ई-सिगारेट्सविरोधातील सर्वात मोठ्या कारवायांपैकी एक मानली जात असून, तस्करीविरोधातील कस्टम्स विभागाच्या आक्रमक भूमिकेचे हे ठळक उदाहरण ठरले आहे.

## आठ दिवसांत बॅरिअर्स बसवणार?

त्यानंतर वाहतूक शाखेने तातडीने पत्र देऊन पुलावर लोखंडी बॅरिअर्स उभारण्याची सूचना केली. कारण, बॅरिअर्स बसल्यास अवजड वाहनांना रोखणे शक्य होणार होते. मात्र, विभागाकडून आजपर्यंत कोणतीही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नाही. याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. बांधकाम विभाग मोठ्या दुर्घटनेची वाट पाहात आहे का, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून विचारण्यात येत आहे. विशेष म्हणजे, पुलाच्या धोकादायक स्थितीमुळे एसटी बससेवा बंद करण्यात आली आहे. पण, दुसरीकडे ३० ते ४० टन वजनाचे ट्रक त्याच पुलावरून सर्रास धावत आहेत. हा विरोधाभास नागरिकांच्या संतापात भर घालत आहे. जर पूल धोकादायक आहे, तर अवजड वाहतूक सुरू का आहे? आणि जर ती बंद करायची असतील, तर बॅरिअर्स बसविण्यासाठी आणखी किती काळ लागणार आहे? असे सवाल उपस्थित होत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी ‘‘आठ दिवसांत लोखंडी बॅरिअर्स बसवू’’ असे आश्वासन दिले असले तरी गेल्या वर्षभरातील अनुभव पाहता हे आश्वासन कितपत वास्तवात उतरणार याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. कारण वर्षभर मंजुरी, निधी, प्रक्रिया आणि दुरुस्तीच्या नावाखाली वेळ काढण्यात गेला. आता पोलिसांच्या स्पष्ट सूचनेनंतरही तातडीची कार्यवाही करण्याऐवजी पुन्हा आठ दिवसांची मुदत मागितली जात आहे. यावरुन पुलाबाबतचे गांभीर्य संबंधित अधिकाऱ्यांना किती आहे, हे दिसून येते. स्थानिक नागरिक रोज जीव मुठीत धरून या पुलावरून प्रवास करत आहेत. पूल दिवसेंदिवस खालावत असताना, प्रशासनाची गती मात्र कासवाच्या पावलांनी सुरू असल्याची टीका होत आहे. उद्या एखादी दुर्घटना घडली, अवजड वाहनासह पूल कोसळला किंवा निष्पाप नागरिकांचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे.

## मान्सूनची चाल मंदच!

अंतर्गत भागांमध्ये पावसाचा जोर कमी राहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यासह अनेक भागांमध्ये १५ जूनपर्यंत पावसामध्ये विशेष वाढ होण्याची चिन्हे नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या कालावधीत राज्यातील काही भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडू शकतात. मात्र व्यापक आणि समाधानकारक पावसासाठी अजून काही दिवस वाट पाहावी लागणार असल्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. दरम्यान, मुंबईसह कोकण किनारपट्टीवर पुढील किमान आठवडाभर कमी-अधिक प्रमाणात पावसाची हजेरी कायम राहण्याची शक्यता आहे. किनारपट्टी भागात मान्सून सक्रिय असला, तरी राज्याच्या अंतर्गत भागांमध्ये त्याचा प्रभाव तुलनेने कमी राहणार असल्याचा अंदाज आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १८ जूनपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात राज्यातील पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. जून महिन्याच्या अखेरपर्यंत हा पावसाचा जोर कायम राहू शकतो, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे खरीप हंगामासाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मान्सूनच्या संथ वाटचालीमुळे पावसाचे स्वरूप अद्याप स्थिर झालेले नाही. त्यामुळे पुरेसा ओलावा निर्माण होईपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणी टाळावी. १५ जूननंतरच्या हवामान अंदाजाचा विचार करूनच खरीप हंगामाचे नियोजन करणे अधिक सुरक्षित ठरेल, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे.

## प्रवेशोत्सवासाठी विद्यार्थी सज्ज

विविध उपक्रमांत सहभाग घेतला. काही विद्यार्थ्यांनी सुट्टीचा कालावधी अभ्यास, शिकवणी वर्ग आणि स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही वापरला.

आता नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील पंधरा दिवसांपासून शालेय साहित्य खरेदीला सुरुवात झाली असून, सध्या खरेदीचा अंतिम टप्पा सुरू असल्याची माहिती विक्रेत्यांनी दिली. जिल्ह्यातील अलिबागसह अन्य बाजारपेठांमध्ये पाठ्यपुस्तके, वह्या, दप्तर, गणवेश आणि अन्य साहित्य खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. मात्र, यंदा शालेय साहित्यांच्या किमतीत सरासरी दहा टक्क्यांनी वाढ झाल्याने पालकांच्या खिशाला कात्री बसत आहे. वाढती महागाई आणि शैक्षणिक साहित्यांच्या वाढलेल्या दरांमुळे शालेय खर्चाचे आर्थिक गणित अनेक कुटुंबांना नव्याने मांडावे लागत आहे.

दरम्यान, रायगड जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून दिली जातात. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पुस्तके मिळावीत यासाठी शिक्षण विभागाने विशेष नियोजन केले आहे. बालभारतीकडे पाठविण्यात आलेल्या मागणीनुसार पाठ्यपुस्तके जिल्ह्यात दाखल झाली असून, ती तालुकास्तरावरून केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

शाळा सुरू होण्यापूर्वी दोन दिवस शिक्षकांनी शाळांमध्ये उपस्थित राहून स्वच्छता, परिसर सुशोभीकरण आणि स्वागताची तयारी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी विशेष उपक्रमही राबविले जाणार आहेत. जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेत गावोगावी आणि घरोघरी जाऊन पालकांशी संवाद साधला आहे. जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. शाळांच्या पहिल्या दिवशी जिल्हाभरात प्रवेशोत्सव साजरा करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभातफेरी आणि पाठ्यपुस्तक वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.

**शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी विशेष मोहीम**

जिल्ह्यातील एकही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शिक्षण विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. सहा ते चौदा वयोगटातील प्रवेशपात्र विद्यार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालय आणि शाळांच्या सूचना फलकांवर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. शिक्षकांसह सरपंच, गावकरी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, युवक, बचतगट आणि ज्येष्ठ नागरिकांच्या माध्यमातून गृहभेटी घेऊन पालकांशी संवाद साधला जाणार आहे. शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना मिळणार मोफत पाठ्यपुस्तके

रायगड जिल्ह्यातील शाळांमधील तब्बल दोन लाख २५६ विद्यार्थ्यांना शासनाकडून दहा लाख ८९ हजार पाठ्यपुस्तके मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यापैकी आठ लाख तीन हजार ६३ पुस्तके जिल्ह्याला प्राप्त झाली असून, उर्वरित पुस्तकांचा पुरवठा सुरू आहे. शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना ही पुस्तके वितरित करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

## आज ग्रामपंचायत आरक्षणाची सोडत

चित्र या आरक्षण सोडतीनंतर स्पष्ट होणार असल्याने विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रायगड जिल्ह्यात एकूण ८१० ग्रामपंचायती असून त्यापैकी २४० ग्रामपंचायतींवर सध्या प्रशासकीय राजवट सुरू आहे. तसेच २०२६ या कालावधीत ८९ ग्रामपंचायतींची मुदत संपणार आहे. एकूण ३२९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जिल्हा प्रशासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार आज आरक्षण निश्चितीची प्रक्रिया पार पडणार आहे.

या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला तसेच सर्वसाधारण महिला अशा विविध प्रवर्गांसाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. आरक्षण सोडतीनंतर हरकती व अभिप्राय नोंदविण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असून, त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून अंतिम अधिसूचनेला मान्यता दिली जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ८ जुलैपर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील शहापूर, आंबेपूर, श्रीगाव, कुसुंबळे, पोयनाड, कुर्डूस, बेलोशी, चिंचोटी, सारळ, रांजणखार, डावली, थळ, वरसोली, रामराज, सुडकोली, मापगाव, सातिर्जे, चेंढरे, बेलकडे, कुरुळ, ढवर, काविर, बामणगाव, सहाण, वरंडे, बोरघर, चौल, आगरसुरे, झिराड, धोकवडे, रेवस, परहूर, चरी, कुरकुंडी, कोलटेंभी, ताडवागळे, मानतर्फे झिराड, सासवणे, पेझारी आणि वाघोडे या ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षणाची सोडत आज सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत काढण्यात येणार आहे. मंडळ अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडणार असून, आरक्षण निश्चितीनंतर अनेक ठिकाणची राजकीय गणिते बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोणत्या प्रभागात कोणते आरक्षण पडणार, कोणत्या इच्छुकांच्या आशा पल्लवित होणार आणि कोणाच्या राजकीय योजनांना ब्रेक लागणार, याचे चित्र आजच्या आरक्षण सोडतीनंतर स्पष्ट होणार आहे.

**इच्छुकांचे आरक्षणाकडे लागले डोळे**

आज होणाऱ्या आरक्षण सोडतीकडे विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, माजी सदस्य, विद्यमान पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागून राहिले आहे. आरक्षणाच्या स्वरूपावर अनेक गावांमधील निवडणुकीची समीकरणे अवलंबून असल्याने ग्रामपंचायत स्तरावरील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

अलिबाग - ३८, पेण - २६, पनवेल - ४०, उरण - १४, कर्जत - ३९, खालापूर - ५, रोहा - ४७, सुधागड - ६, माणगाव - २६, तळा - १८, महाड - ३९, श्रीवर्धन - २०, म्हसळा - १४, मुरूड - ०४, एकूण - ३३६

## उत्पादन शुल्क विभाग ॲलर्ट मोडवर

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकांनी जिल्ह्यातील विविध भागांत धाडसत्र सुरू केले आहे. अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि तस्करीविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत आतापर्यंत १८० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी १७ हून अधिक गुन्हे बेवारस स्वरूपाचे आहेत. या कारवाईत १२२ जणांना अटक करण्यात आली आहे. धाडसत्रादरम्यान दोन हजार २४९ लीटर हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली असून, ८४ हजार ४९४ लीटर रसायन नष्ट करण्यात आले आहे. याशिवाय ९३.७८ बल्क लीटर देशी मद्य, ६.६९ बल्क लीटर विदेशी मद्य आणि १५.५७ बल्क लीटर बिअर जप्त करण्यात आली आहे.

परराज्यातून रायगडमध्ये आणण्यात आलेले १०४.३ बल्क लीटर मद्यही ताब्यात घेण्यात आले आहे. जिल्ह्यातील निरा व ताडी विक्रेत्यांवरही विशेष लक्ष ठेवण्यात येत असून, बनावट निरा आणि ताडी विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेत ३१३ लीटर निरा, १५१ लिटर ताडी आणि २७० किलो काळा गूळ जप्त करण्यात आला आहे. अवैध मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. या सर्व कारवाईत लाखो रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाला यश आले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाची विविध पथके जिल्ह्यातील प्रमुख रस्त्यांवर सातत्याने गस्त घालत असून ग्रामीण, डोंगराळ आणि जंगल परिसरातील गावठी व हातभट्टीच्या दारू व्यवसायावर आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अवैध मद्यनिर्मितीचे अनेक अड्डे दुर्गम भागात असल्याने तेथे पोहोचणे आव्हानात्मक ठरत असले तरी स्थानिकांच्या सहकार्याने अशा ठिकाणांवर थेट धाडी टाकून अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. उत्पादन शुल्क विभागाच्या या व्यापक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध मद्य व्यवसायाला मोठा फटका बसल्याचे चित्र आहे.

**प्रतिबंधात्मक कारवाईचा इशारा**

अवैध दारू विक्री, वाहतूक आणि निर्मिती करणाऱ्यांविरोधात रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने आणखी कठोर भूमिका घेतली आहे. ज्या व्यक्तींविरोधात दोन ते तीन गुन्हे दाखल आहेत, त्यांच्याविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ९३ अंतर्गत संबंधितांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून पुनरावृत्ती रोखण्यासाठी विशेष लक्ष दिले जात आहे.

## व्यसनमुक्ती केंद्रातील तरुणाचा मृत्यू संशयास्पद

मिळालेल्या माहितीनुसार, राकेश चंद्रकांत जाधव (वय ३३) असे मृत तरुणाचे नाव आहे. राकेश याला दारूचे व्यसन असल्याने काही दिवसांपूर्वी त्याला परहूर येथील व्यसनमुक्ती केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, गुरुवारी सकाळी त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली.

राकेश जाधव याला व्यसनमुक्ती केंद्रात बांधून ठेवण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. त्याच्या मृत्यूनंतर कुटुंबीय आणि नातेवाईकांनी संताप व्यक्त करत व्यसनमुक्ती केंद्राच्या व्यवस्थापनाकडे जाब विचारला आहे. या घटनेमुळे केंद्रातील उपचार पद्धती आणि व्यवस्थापनाबाबत विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, या तरुणाचा मृत्यू संशयास्पद परिस्थितीत झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण समोर येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तसेच मृताच्या नातेवाईकांनी व्यसनमुक्ती केंद्रातील कारभाराविरोधात तक्रार दाखल केल्याची माहितीही समोर येत असून पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## ‘रायगड भूषण’च्या खैरातीला ब्रेक

प्रक्रिया राबविण्यात येते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून रायगड भूषणसह जिल्हा परिषदेकडून दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पुरस्कारांची संख्या सातत्याने वाढत असल्याने त्यांचे महत्त्व आणि प्रतिष्ठा कमी होत असल्याची टीका विविध स्तरांतून होत होती. विशेषतः निवडणुका जवळ आल्या की पुरस्कारांची मोठ्या प्रमाणावर घोषणा केली जाते, अशी चर्चा राजकीय आणि सामाजिक वर्तुळात नेहमीच रंगत आली आहे. काही वर्षांत दीडशे ते अडीचशेहून अधिक जणांची रायगड भूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे हा पुरस्कार खऱ्या अर्थाने गुणवंतांचा सन्मान राहिला आहे की केवळ पुरस्कार वितरणाचा सोहळा बनला आहे, असा प्रश्नही उपस्थित केला जात होता. विशेष म्हणजे, पुरस्कारासाठी निवड झालेल्या व्यक्तींची यादी अनेकदा कार्यक्रमाच्या आदल्या दिवसापर्यंत जाहीर होत नसल्याने निवड प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबतही प्रश्न उपस्थित होत होते. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी अलिबागमधील कार्यक्रमात पुरस्कारांच्या खैरातीला आळा घालण्याबाबत स्पष्ट संकेत दिले आहेत. ‘‘रायगड भूषण पुरस्काराची खैरात होणार नाही,‘‘ असे त्यांनी ठामपणे सांगितल्याने पुरस्कारांची संख्या कमी करून गुणवत्ताधारित निवड प्रक्रियेला प्राधान्य दिले जाणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

रायगड भूषण पुरस्कार हा जिल्ह्यातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या सन्मानांपैकी एक मानला जातो. त्यामुळे या पुरस्काराचा दर्जा आणि विश्वासार्हता कायम राखण्यासाठी कठोर व पारदर्शक निकष आवश्यक असल्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. अध्यक्षांच्या वक्तव्यानंतर आता प्रत्यक्षात निवड प्रक्रियेत कितपत बदल होतात आणि पुरस्कारांचे वाढते संख्याबळ रोखले जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रतिष्ठेचा पुरस्कार; पण निवड प्रक्रियेवर कायम प्रश्नचिन्ह

रायगड भूषण पुरस्कार हा जिल्ह्यातील मानाचा पुरस्कार मानला जात असला तरी गेल्या काही वर्षांत पुरस्कारांची वाढती संख्या आणि निवड प्रक्रियेतील अपारदर्शकतेवर सातत्याने टीका होत आली आहे. अनेकदा पुरस्कारार्थींची यादी कार्यक्रमाच्या आदल्या दिवसापर्यंत जाहीर होत नसल्याने निवडीचे निकष आणि प्रक्रिया याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## उपेक्षितांसाठी रस्त्यावर उतरु

अंकाचे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नव्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ते म्हणाले, ‘‘शेतकरी कर्जमाफीचा मोठा प्रश्न आहे. खतासाठी शेतकऱ्यांची रांग लागली आहे. शेतकरी आत्महत्या करत आहे. सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या घामाची किंमत कळत नाही. त्यामुळे मी या घटकासाठी पडेल ते कष्ट करायला तयार आहे.’’ मंत्री गिरीश महाजन यांनी ‘ऑपरेशन ब्लू स्टार’वर केलेल्या विधानाचा त्यांनी समाचार घेतला. ते म्हणाले, ‘‘राज्याच्या मंत्रिमंडळातील एका गृहस्थांनी शीख समाजाच्या कार्यक्रमात भाषण करताना इंदिरा गांधींवर टीका केली. इंदिरा गांधी यांनी देशाच्या प्रतिष्ठेबाबत तडजोड केली नाही. आपण शीख समाजाचे योगदान कधी विसरणार नाही. स्वातंत्र्य चळवळीपासून शेती-अन्नधान्याच्या प्रश्नांमध्ये शीख समाजाने योगदान दिले आहे. मात्र, त्याचबरोबर इंदिरा गांधींची, राजीव गांधी, जनरल वैद्य यांची हत्या झाली. त्याचे स्मरण करायला पाहिजे.’’राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वर्धापन दिनाच्या जाहिरातीवर त्यांनी टीका केली. ‘‘वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावरील जाहिरातीची किंमत किती असते, याची माहिती मला आहे. त्यामुळे आजपर्यंत इंग्रजी दैनिकात राष्ट्रवादीची जाहिरात कधीही पाहिली नव्हती.’’. दरम्यान, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावरील मालिकेसाठी आमदार रोहित पवार यांनी ५० लाख रुपयांची मदत जाहीर केली. तर, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या मालिकेला १० लाख रुपयांची मदत देणार असल्याचे सांगितले.

## निवडक

### आत्माराम आपटे यांचे निधन



**रेवदंडा :** रायगड प्रेस क्लबचे माजी जिल्हाध्यक्ष तसेच सल्लागार पत्रकार अभय आपटे यांचे वडिल आत्माराम आपटे यांचे गुरूवारी (दि.११) निधन झाले. निधनसमयी ते ९३ वर्षाचे होते. ते रोहा तालुक्यातील खारी शाळेतून निवृत्त झाले होते. त्यांचा शाळेमध्ये परिपाठ घेण्यात हातखंडा होता. निवृत्ती नंतर त्यांनी सामाजिक कार्याला झोकून दिले होते. येथील विठ्ठल-रखुमाई देवस्थानात कार्यकारी मंडळात होते तर रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संस्थेच्या ठिकाणी ते अनेक वर्षे सचिव म्हणून होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सुन, नात व अन्य परिवार आहे. त्यांच्या अत्यंविधीसाठी ज्येष्ठ पत्रकार नागेश कुलकर्णी, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, उपसरपंच संतोष मोरे, राजन वाडकर, सुराराम माळी, किशोर मानकर, दिलिप पटेल, विजय मानकर, चंद्रकांत पाटील, नदिम मुकादम, प्रकाश दांडेकर, ओमकार नागावकर, निलेश फुंडे, मिथून वैद्य तसेच रेवदंडा व पंचक्रोशीतील अनेक मान्यवर मंडळी उपस्थिती होती.



### खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

**पनवेल :** शहरातील मालधक्का रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने नागरिक व वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील अत्यंत वर्दळीच्या या मार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. पनवेल रेल्वे स्थानक तसेच पनवेल एसटी डेपोकडे जाण्यासाठी हा महत्त्वाचा संपर्क मार्ग असल्याने वाहतुकीची मोठी वर्दळ असते. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका निर्माण झाला असून, वाहतूकही संथ गतीने होत आहे. पावसाळा कोणत्याही क्षणी सुरू होण्याची शक्यता असल्याने खड्ड्यांची समस्या अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे पावसापूर्वीच संबंधित यंत्रणांनी तातडीने खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी नागरिक व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. वेळेत उपाययोजना केल्यास संभाव्य अपघात टळून नागरिकांना दिलासा मिळू शकतो.

### विहान तेलंगेचे उल्लेखनीय यश

**रोहा :** तालुक्यातील चिंचवली येथील एमडीएन इंटरनॅशनल स्कूलचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी विहान तेलंगे याने उत्तुंगतेज यंग सायंटिस्ट कॉम्पिटिटिव्ह एक्झाम २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत राज्यात ८ वे स्थान मिळविले आहे. विहानने १५० पैकी १२३ गुण मिळवत ही उल्लेखनीय कामगिरी केली असून, त्याची राष्ट्रीय स्तरावरील गुणवंत विद्यार्थी म्हणून निवड झाली आहे. तसेच, त्याला इस्रो व आयआयटी शैक्षणिक भेट कार्यक्रम २०२६ साठीही निवडण्यात आले आहे. विहानच्या या यशाबद्दल कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संदीप तटकरे, सचिव प्रकाश सरकले, रजिस्ट्रार अजित तेलंगे, एमडीएन इंटरनॅशनल स्कूलचे डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर, प्राचार्या योगिनी देशमुख मॅडम तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व वैज्ञानिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### ''आंबेडकर विरुद्ध आंबेडकर'' नाटकाचे आयोजन




**पनवेल :** युनिव्हर्सल ग्रुप पनवेलतर्फे पनवेलमधील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये बौद्ध समाजातील इयत्ता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा व समाजप्रबोधनाचा भाग म्हणून ''आंबेडकर विरुद्ध आंबेडकर'' या प्रबोधनात्मक नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. ''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' या तत्त्वावर चालणाऱ्या युनिव्हर्सल ग्रुपच्या उपक्रमाला पनवेलमधील जनतेने उदंड प्रतिसाद दिला. यावेळी पनवेल तालुक्यातील ९० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला पनवेल तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अनेकांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाचे व आयोजकांचे कौतुक केले. त्याचबरोबर ''आंबेडकर विरुद्ध आंबेडकर'' या नाटकाला पनवेलमधील जनतेने भरभरून प्रतिसाद दिला. बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम ध्येय असले पाहिजे हे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांनी लिहिलेलं संविधान यांच्या विचारावरील नाटकाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

# बॉक्साईट जनसुनावणीवर गुप्ततेचे सावट!

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |



• (संग्रहीत छायाचित्र)

श्रीवर्धन तालुक्यातील मेघरे येथे प्रस्तावित बॉक्साईट खाण प्रकल्पाच्या जनसुनावणीवर आता गंभीर संशयाचे ढग दाटून आले आहेत. लोकशाही प्रक्रियेचा गळा घोटत संपूर्ण जनसुनावणीच गुप्ततेच्या आवरणात पार पडल्याचा आरोप होत असून, स्थानिक पत्रकारांना जाणीवपूर्वक दूर ठेवून प्रशासनाने नेमके काय लपवण्याचा प्रयत्न केला? असा संतप्त सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सुनावणीस्थळी पत्रकारांसाठी स्वतंत्र कक्ष आणि आसनव्यवस्था करण्यात आली होती; मात्र, तालुक्यातील एकाही अधिकृत पत्रकाराला याबाबत ना निमंत्रण, ना पूर्वसूचना, ना कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली. मग ही पत्रकारांसाठीची व्यवस्था केवळ कागदोपत्री दिखावा होता का? जनसुनावणी केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठीच आयोजित करण्यात आली होती का? अशा चर्चा आता रंगू लागल्या आहेत.

मेघरे आणि परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बॉक्साईट उत्खननामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत. धुळीचे वाढते प्रदूषण, रस्त्यांची दुरवस्था, आरोग्याच्या समस्या आणि वाहतुकीचा वाढता ताण यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त आहेत. पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अहवालानुसार खनिज वाहतुकीसाठी १० टनांपेक्षा जास्त क्षमतेच्या वाहनांना परवानगी नसताना प्रत्यक्षात ३० ते ३५ टन क्षमतेचे अवजड ट्रक रस्त्यांवरून धावतात, असा गंभीर आरोप स्थानिकांनी केला आहे. जर हा आरोप खरा असेल, तर संबंधित विभागांनी आजवर किती कारवाई केली? ओव्हरलोड वाहतुकीवर किती दंडात्मक कारवाई झाली? याचे उत्तर प्रशासनाकडे नसल्याने संशय अधिकच गडद झाला आहे. सन २००८ पासून सुरू असलेल्या खाण प्रकल्पामुळे कंपनीने स्थानिक विकासासाठी कोट्यवधींचा निधी खर्च केल्याचे दावे केले आहेत. मात्र, प्रत्यक्षात गावांच्या विकासाचे चित्र अत्यंत निराशाजनक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

पर्यावरणीय निर्णय प्रक्रियेत जनसुनावणी हा लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाचा आणि कायदेशीर टप्पा मानला जातो. मात्र स्थानिक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांना पुरेशी माहिती न देता ही प्रक्रिया पार पाडण्यात आल्याने संपूर्ण जनसुनावणीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक पत्रकार संघटना, पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन किंवा उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, खाण प्रकल्पाच्या पर्यावरणीय अटी, खर्च, वृक्षारोपण, वाहतूक नियमांचे पालन आणि जनसुनावणी प्रक्रियेची संपूर्ण माहिती सार्वजनिक करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, पत्रकारांना दूर ठेवून घेतलेली जनसुनावणी म्हणजे लोकशाहीची हत्या; मेघरे प्रकरणात सत्य बाहेर यायलाच हवे!''अशी तीव्र प्रतिक्रिया आता श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक, पत्रकार आणि सामाजिक संघटनांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणार की सर्व काही कागदोपत्रीच दडपले जाणार? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### हरित क्षेत्राचा नियम कुठे गेला?

कंपनीने परिसरात सुमारे १,५०० झाडे लावल्याचा दावा केला आहे. मात्र, त्यापैकी किती झाडे आज अस्तित्वात आहेत? त्यांची निगा कशी राखली गेली? पर्यावरणीय नुकसान भरून काढण्यासाठी आणखी काय उपाययोजना करण्यात आल्या? याबाबत कोणतीही सार्वजनिक माहिती उपलब्ध नाही. तसेच, नियमांनुसार खाणकामामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई म्हणून प्रति एकर २,५०० झाडे लावणे आणि किमान ८० ते ८५ टक्के हरित क्षेत्र राखणे अपेक्षित आहे. या अटींचे पालन झाले की नाही, याचा स्पष्ट अहवाल अद्याप जनतेसमोर आलेला नाही.

## कर्जतच्या बालकांना जन्म दाखले मिळेना

| नेरळ | प्रतिनिधी |




सध्या शाळा प्रवेशाचा हंगाम सुरू असून, रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य अधिकाऱ्यांच्या अनास्थेमुळे अनेकांना जन्माचे दाखले मिळेनासे झाले आहेत. त्यामुळे अनेक बालकांचे शाळा प्रवेश रोखले गेले असून, जिल्हा परिषदेच्या उदासीन कारभारामुळे अनेक बालके शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, शासनाच्या जन्म मृत्य नोंदी करणाऱ्या पोर्टलमुळे अनेक बालकांचे शाळा प्रवेशाचे स्वप्न भंग होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शासनाने २०२० रोजी जन्माला आलेल्या बाळांना त्याच ठिकाणी जन्माचा दाखला ऑनलाइन पद्धतीने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. घरी जन्म झाला असेल, तर ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि महापालिका त्यांना जन्माचा दाखला देऊ शकते. मात्र, एखाद्या सरकारी दवाखान्यात त्या बाळाचा जन्म झाला असेल, तर त्या बालकाला त्याच सरकारी दवाखान्यातून जन्माचे दाखले देण्याचे नियोजन आहे. मात्र, सहा वर्षे होऊन देखील जन्म दाखला न मिळाल्यामुळे बालकांचे आधार कार्ड बनत नाही. त्यामुळे अनेक मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. या सर्व कार्य प्रणालीला जबाबदार असणाऱ्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नेहरकर यांच्याकडे या प्रश्नावर कोणतेही उत्तर नाही.

कर्जत तालुक्यातील राज्याच्या आरोग्य विभागाचे उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय कशेळे तसेच जिल्हा परिषदेचे आरोग्य केंद्र नेरळ, कळंब, खांडस, आंबिवली, कडाव, मोहिली या प्राथमिक आरोग्य केंद्रात जन्मलेल्या बाळाच्या नोंदी २०२१ पासून सुरू आहेत. मात्र, या जन्म नोंदी ऑनलाइन पोर्टलवर नसल्यामुळे मुलांना त्या मिळत नाही. त्या बालकांचे आधार कार्ड बनवणे शक्य होत नाही. आणि अंगणवाडीमध्ये त्यांची नोंद केली जात नाही. दरम्यान, शेकडो बालकांना जन्म दाखले न मिळाल्यामुळे शिक्षणापासून वंचित रहावे लागणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## महावितरणच्या कारभारवार स्त्री शक्ती आक्रमक

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल परिसरातील कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल, खारघर तसेच आसपासच्या भागात वारंवार व दीर्घकाळ विद्युत पुरवठा खंडित होत आहे. अनेक ठिकाणी सलग ८ ते १२ तास, तर काही भागांमध्ये संपूर्ण रात्र वीजपुरवठा बंद राहण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, त्याचा सर्वाधिक परिणाम महिलांवर होत आहे. तरी महिलांना होत असलेल्या मानसिक, शारीरिक व आरोग्य विषयक त्रासाबद्दल कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षांना स्त्री शक्ती फाऊंडेशन महाराष्ट्र राज्याच्या संस्थापक अध्यक्षा विजया कदम यांनी केली आहे. या मागणीत त्यांनी म्हटले आहे की, सध्या वाढत्या उष्णतेमुळे नागरिक त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत वीजपुरवठा खंडित झाल्याने गर्भवती महिला, प्रसूतिपूर्व व प्रसूतीनंतरच्या माता, ज्येष्ठ नागरिक महिला, आजारी महिला तसेच लहान बालकांना गंभीर मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे राज्य महिला आयोगाने या गंभीर बाबीची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागवावा, अशी नम्र विनंती केली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील खेरणे गाव परिसरात एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून, तिच्या नातेवाईकांचा शोध पोलीस करीत आहेत. या महिलेचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे, अंगाने सडपातळ, डोक्यावरील केस काळे साधारण वाढलेले, चेहरा उभट, नाक सरळ, रंग सावळा, उंची ५ फुट असून, अंगात काळ्या रंगाचा फुल बाह्याचा गाऊन घातलेला आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कराओकेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात

| नागोठणे | प्रतिनिधी |



• (छायाचित्र: महेश पवार)

नागोठणे बाजार पेठेतील प्रतीक्षा मल्टी आर्ट स्टुडिओमध्ये दि.३१ मे रोजी पार पडलेल्या कराओके गायन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ मंगळवारी (दि.९) पीएनपी नाट्यगृहात संपन्न झाला. या समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. या कराओके स्पर्धेत रायगड जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

यावेळी राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, राजाभाऊ ठाकूर, सुरेंद्र म्हात्रे, रेवदंडाचे उपसरपंच बाबू मोरे, के.डी. पाटील, विक्रांत वार्डे, निवेदक यशवंत हारेर, महेश दळवी, सागर म्हात्रे,रोहित पाटील, योगेशकुमार, स्वरवैभव थोरवे व प्रतीक्षा शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच अनेक मान्यवर आणि नामवंत कलाकारांच्या उपस्थितीमुळे समारंभाची शोभा अधिकच वाढली. या कराओके स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. त्यामध्ये प्रथम क्रमांक प्रज्ञा सावंत, द्वितीय क्रमांक सागर ठोंबरे, तृतीय क्रमांक प्रसाद उलांडे, चतुर्थ क्रमांक सुजी मॅथ्यू, पाचवा क्रमांक महेश पाटील यांना गौरविण्यात आले. याशिवाय उत्तेजनार्थ पारितोषिक म्हणून हंसिका पाटील, वैभव पोटले, आयेशा सय्यद, प्रथमेश गायकवाड यांनाही मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रे व पारितोषिके प्रदान करण्यात आली.

### कोमसापतर्फे कवी संमेलनाचे आयोजन

| उरण | प्रतिनिधी |

कोकण मराठी साहित्य परिषद व मधुबन कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१७) सायंकाळी५वाजताकविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ''आगमन पावसाचे'' या विषयावर मधुबन कट्ट्याचा १२८ वा कवितांचा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी तथा साहित्यिक एल.बी. पाटील व चैतन्य पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी सुरेश शिंदे व पुंडलिक म्हात्रे यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

## महावितरण कार्यालयावर प्रतीकात्मक अंत्ययात्रा

| पनवेल | प्रतिनिधी |



वाढत्या उष्म्यामुळे नागरिक आधीच त्रस्त असताना खांदा वसाहत परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अनेकदा वीज खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने गुरुवारी (दि.११) महावितरणच्या कारभाराविरोधात प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरू झालेली ही अंत्ययात्रा सेक्टर-१ मधील महावितरण कार्यालयापर्यंत नेण्यात आली. आंदोलनादरम्यान मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महावितरणच्या निष्क्रिय कारभाराविरोधात घोषणाबाजी केली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन देऊन परिसरात अखंड वीजपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली. नागरिकांना २४ तास दर्जेदार वीजपुरवठा देणे महावितरणचे कर्तव्य असून वारंवार होणाऱ्या वीज खंडितीची समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

### नायक मराठा समाजाची बैठक

| महाड | प्रतिनिधी |

एवढ्या मोठ्या समाजामध्ये आपण कुणीकड आहोत हे प्रत्येकानी पाहिले पाहिजे. तरच, समाजाची उन्नती गतीशिल होईल, अशी खंत महाड तालुका नायक मराठा समाजाचे माजी अध्यक्ष गरुड जाधव यांनी केले आहे. महाड शहर विभागातील समाज बांधव भगिनींची बैठव दस्तुरी नाका येथे आयोजित करण्यात आली होती. त्याला संबोधतांना ते बोलत होते. नायक मराठा समाज सेवा संघाच्यावतीने दस्तुरी नाका येथे समाज संकुलाचे काम सुरु आहे. त्याचा आढावा आणि निधी संकलन करणे याकरिता या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

## कळंबोली पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

### १३.७० लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत



| पनवेल | प्रतिनिधी |

कळंबोलीत घडलेल्या घरफोडीच्या गंभीर गुन्ह्याचा तपास करून दोन आरोपींना उत्तर प्रदेशातून अटक करण्यात कळंबोली पोलिसांना यश आले आहे. या आरोपींकडून चोरीस गेलेल्या मालापैकी तब्बल १३ लाख ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

संबंधित आरोपींनी कळंबोली परिसरात भरदिवसा घरफोडी करून सुमारे २० तोळे सोन्याचे दागिने, ९३ ग्रॅम चांदीचे दागिने व वस्तू तसेच १२ हजार रुपये रोख रक्कम असा मोठा ऐवज लंपास केला होता. कळंबोली पोलिसांना तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींची ओळख निश्चित करण्यात पोलिसांना यश आले. तपासादरम्यान आरोपी हे उत्तर प्रदेश राज्यातील आंबेडकर नगर जिल्ह्यात आपले अस्तित्व लपवून राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर विशेष तपास पथकाने तेथे जाऊन सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच एक आरोपी शेताच्या दिशेने पळून गेला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार दुसऱ्या आरोपीलाही अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून चोरीच्या मालापैकी सुमारे १३ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

या उत्कृष्ट तपासकार्याची दखल घेत मासिक गुन्हे आढावा बैठकीत नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते संपूर्ण तपास पथकाला प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कळंबोली पोलिसांच्या या यशस्वी कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली असून, त्यांचे स्तरांतून कौतुक केले जात आहे.

**निखिल पवार यांची थक्क करणारी गाथा | कर्तृत्वातून घडवली वेगळी ओळख**

## दुर्गप्रेम, देशभक्ती अन् जिद्दीचा अभुतपुर्व संगम

| माणगाव | प्रतिनिधी |

आजच्या धावपळीच्या जगात स्वतःच्या यशासोबत समाज, इतिहास, संस्कृती आणि नातेसंबंध यांचेही जतन करणारी माणसे फारच दुर्मिळ झाली आहेत. अशाच दुर्मीळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव निखिल पवार यांचे घेतले जाते. छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या या तरुणाने आपल्या जिद्द, परिश्रम, शिस्त आणि राष्ट्रभक्तीच्या बळावर एक प्रेरणादायी जीवनप्रवास घडवला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारण्यासाठी ज्या गड-किल्ल्यांचा आधार घेतला, त्या इतिहासाच्या साक्षीदारांप्रती निखिल पवार यांना विलक्षण प्रेम आहे. हे प्रेम केवळ छायाचित्रांपुरते किंवा सोशल मीडियापुरते मर्यादित नसून, प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी ते सिद्ध केले आहे. गड-किल्ल्यांवरील स्वच्छता मोहिमा, दुर्गसंवर्धन, ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि जनजागृती यामध्ये ते सातत्याने योगदान देत आहेत. प्रत्येक शनिवार आणि



रविवार निखील पवार त्यांच्यासाठी विश्रांतीचे दिवस नसतात, तर इतिहासाच्यासेवेसाठीसमर्पितदिवस असतात. महाराष्ट्रातील विविध गड-किल्ल्यांवर ट्रेकिंग मोहिमा राबवून ते युवकांना इतिहासाची ओळख करून देतात. राष्ट्रभक्ती, शौर्य आणि स्वाभिमानाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम ते निष्ठेने करत आहेत. आजपर्यंत महाराष्ट्रातील ५० हून अधिक किल्ल्यांना भेट देऊन त्यांनी दुर्गसंवर्धनाच्या कार्यात मोलाचा वाटा उचलला आहे.

त्यांचा इतिहासावरील प्रेमाबरोबरच शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीवर विशेष भर आहे. जवळपास ४० हाफ मॅरेथॉन, सायकलिंग आणि विविध साहसी उपक्रमांमध्ये ते नियमित सहभाग घेत असतात.

दुर्गसंवर्धन, इतिहासप्रेम, फिटनेस, शेती, डिजिटल क्षेत्र, कुटुंबवत्सल स्वभाव आणि व्यावसायिक यश अशा अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत निखिल पवार यांनी एक आदर्श जीवनप्रवास घडवला आहे. त्यांच्या कार्यातून आजच्या युवकांना जिद्द, शिस्त, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळत आहे.

# नकोशा विक्रमांच्या दिशेने

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहरुंचा विक्रम मोडला म्हणून सध्या कौतुक चालू आहे. मोदी पुढे जाऊन आणखीही अनेक विक्रम मोडतील. त्याबद्दल त्यांचे आगाऊच अभिनंदन करून ठेवायला हवे. पण मोदी आणि भाजपवाल्यांच्या नावे इतरही अनेक कौतुक न करण्यासारखे विक्रम जमा आहेत. विरोधकांवर इडी लावणे किंवा विरोधकांचे पक्ष फोडणे यांच्या विक्रमांबद्दल तर आता बोलण्यासारखेही काही उरले नाही. याबाबत निलाजरेपणाच्या सर्व हद्दी त्या पक्षाने पार केल्या आहेत. पण रोजच्या धोरणांमध्ये या पक्षाची दांभिकता व खोटेपणा हाही विक्रमी म्हणावा इतक्या पातळीला गेला आहे. अलिकडेच मोदींनी देशाला काटकसरीचे आवाहन केले. सार्वजनिक वाहतूक आणि मेट्रोने प्रवास करण्याचे आवाहन केले. पण या देशातील सरकारी वाहनसेवांची भीषण अवस्था सुधारण्यासाठी मोदी सरकारने गेल्या बारा वर्षांमध्ये काय प्रयत्न केले असा प्रश्न त्यांना कोणीतरी करायला हवा. एकेकाळी सर्व देशातच नव्हे तर पूर्ण जगात जिचे नाव घेतले जात असे त्या मुंबईतील बेस्ट बससेवेची भयंकर दुर्दशा हे त्याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणायला हवे. अलिकडेच दादरमध्ये एका बेस्ट बसला अपघात होऊन एका निरपराध युवकाचा मृत्यू झाला. ही बस इलेक्ट्रिक होती. अशा इलेक्ट्रिक व गियर नसलेल्या बसवरचे नियंत्रण जाऊन मुंबईत अलिकडच्या काळात वारंवार अपघात झाले आहेत. एकेकाळी देशाची राजधानी दिल्लीत जेव्हा सुमार दर्जाच्या ब्ल्यू लाइन बसमुळे जेव्हा पादचारी किंवा प्रवाशांचे अपघात होत होते तेव्हा मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या बससेवेचे तोंडभरून कौतुक केले जायचे. दिल्लीत मेट्रोचे जाळे उभारले गेले आणि ब्ल्यू लाइन बसच्या भिकार कारभाराच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला. मुंबईसारख्या दीडेक कोटी लोकसंख्येच्या शहरात मध्य व पश्चिम रेल्वेची लोकलसेवा आणि बेस्टची बससेवा याच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या पायावर ही आर्थिक राजधानी उभी आहे. दिल्लीत जेव्हा मेट्रो उभारण्यास सुरुवात झाली तेव्हाच ती खरेतर मुंबईत उभी करण्याची मुहूर्तमेढ रोवायला हवी होती. म्हणजे आतापर्यंत ३०० किमीपेक्षा जास्त लांबीची मेट्रोसेवा कुलाब्यापासून दहिसर-बदलापूरपर्यंत जोडली गेली असती, असे अनेकांना वाटते. पण महागडी मेट्रो सेवा ही रेल्वेच्या लोकलला आणि मुंबईच्या कानाकोपऱ्यात कुठेही पोचवणाऱ्या बेस्ट बसला पर्याय ठरू शकत नाही हे लक्षात ठेवायला हवे.

## बेस्ट बस सेवेचे धिंडवडे

आता मुंबईत मेट्रोचा विस्तार झाला म्हणून मोठे कौतुक केले जात आहे. पण लोकलने जे अंतर काटायला पाच किंवा दहा आणि बेस्ट बसने १५ ते २० रुपये लागतात तिथे मेट्रोला किमान ३० ते ४० रुपये लागत आहेत. शिवाय मेट्रो हवी तिथे उपलब्ध नाही. मेट्रो स्टेशनात पोचणे हे अत्यंत दिव्य आहे. पण मोदी आणि मंडळींना श्रीमंती मेट्रोचा विस्तार हवा आहे. तो होत असताना एकीकडे बेस्ट आणि दुसरीकडे लोकलची सेवा कमकुवत होऊ लागली आहे. दादर येथील प्लाझा सिनेमागृहासमोरील वीर कोतवाल उद्यानाजवळ बेस्टच्या बसचालकाचा पाय ब्रेक ऐवजी अँक्सिलेटरवर पडल्याने एकाचा मृत्यू झाला तर सहाजण गंभीर जखमी झाले. यापूर्वी कुर्ला पश्चिम येथे दोन वर्षांपूर्वी बेस्ट बसने चिरडल्याने आठजणांचा जीव गेला होता तर ४० जखमी झाले होते. गतवर्षी भांडुप येथे चुकून अँक्सिलेटरवर पाय दिला गेल्याने चारजणांचा जीव गेला होता तर अगदी पाच दिवसांपूर्वी मालाड येथे बेस्टच्या धडकेत एका टॅक्सीचालकाचा मृत्यू झाला. १४० कोटी लोकसंख्येच्या देशात माणसाच्या जीवाला किंमत फार नाही. बेस्ट उपक्रमाने मृताच्या नातलगांना जेमतेम २५ हजार देण्याची घोषणा केली, यावरून हेच दिसते. पण बेस्टच्या कंत्राटी बसगाड्या आणि जेमतेम तीन दिवस किंवा फारतर आठवडाभराचे प्रशिक्षण घेऊन मुंबईतील गल्लीबोळ, अवघड वळणांवर अवाढव्य बसगाड्या चालवणारे हे चालक म्हणजे बेस्टने मोकाट सोडलेले यमदूत न वाटले तरच नवलं ! अशा पद्धतीच्या चालकांच्या चुकांमुळे किंवा बसगाड्यांमधील तांत्रिक दोषांमुळे २०२५ ते २०२६ या केवळ वर्षभरात ३२ जणांचा मृत्यू झाला आहे. हे अत्यंत भीषण व संतापजनक वास्तव आहे. वर्षभरात बेस्ट बसगाड्यांचे १०८ अपघात झाले. त्यामधील सर्वाधिक ७७ अपघात भाडेतत्त्वावरील बसगाड्यांचे झाले तर ३१ अपघात बेस्टच्या स्वमालकीच्या बसचे झाले. भाडेतत्त्वावरील बसगाड्या पुरवणाऱ्या कंपन्यांना बसचालकांसह त्या पुरवणे बंधनकारक आहे. खासगी झाले तरी या चालकांकडे बेसिक ड्रायव्हिंग परवाना असणारच. तरीही ते इतके बेदरकारपणे गाड्या चालवत असतील व त्यांच्यावर कोणाचाचा वचक नसेल तर ती चिंताजनक गोष्ट आहे.

## कंत्राटदारांचे राज्य

खासगीकरण हा सध्याच्या युगाचा मंत्र आहे. तो काही मोदींनी सुरू केलेला नाही हे खरे. पण खासगी बेतालपणावर अंकुश ठेवायला समजा काँग्रेस अपयशी ठरली असेल तर मोदींनी ते करणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात मुंबईतील बेस्ट बस असो की, राजेश एक्स्पोर्ट्सारख्या कंपन्या असोत मोदी सरकारचे त्यांच्याबाबतचे धोरण संशयास्पद आहे. यामुळेच सर्व ठिकाणी कंत्राटी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळ केला, कंत्राटी सफाई कामगारांनी कचरा नीट न उचलल्याने रोगराई वाढली किंवा कंत्राटी बसचालकाचे तुटपुंज्या प्रशिक्षणाच्या बळावर रस्त्यावर जीव घेतले तरी संबंधित राज्यकर्ते व प्रशासकीय अधिकारी यांच्या अंगावर कारवाईचा एकही ओरखडा उठताना दिसत नाही. एकेकाळी बेस्ट हा मुंबई महापालिकेचा उपक्रम अत्यंत सक्षमपणे चालवला जात होता. मुंबई शहर विभागात वीजपुरवठा करणे आणि मुंबई शहर व उपनगरात वाहतूक सेवा पुरवणे या दोन्ही जबाबदाऱ्या तो समर्थपणे पार पाडत होता. बेस्टची वीज बिलांची वसुली जवळपास शंभर टक्के होती व परिवहन विभाग तोट्यात होता. मात्र वीज पुरवठ्यातील नफा आणि परिवहन सेवेतील तोटा यांचे ताळेबंद स्वतंत्रपणे मांडण्याचे फर्मान राज्य वीज नियामक आयोगाने काढल्यानंतर बेस्टला उतरती कळा लागली. शहरातील वीजपुरवठ्याची बेस्टची मक्तेदारीही मोडीत काढली गेली. एकेकाळी आर्थिकदृष्ट्या सक्षम वाटणारा हा उपक्रम महापालिकेच्या अनुदानावर अवलंबून राहू लागला. बेस्ट कर्मचाऱ्यांचे पगार, बोनस याकरिता देखील महापालिकेकडे बेस्टला आशाळभूत नजरेनी पाहायला लागावे लागले. मुंबईतील बेस्टच नव्हे तर मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर आदी अनेक शहरांमधील परिवहन सेवांना असेच भिकेचे डोहाळे लागलेले आहेत. यामुळेच रिक्षा, खासगी बसगाड्या, टॅक्सी, ओला वगैरेंचे उखळ पांढरे होत आहे. सार्वजनिक परिवहन सेवा लंगडी ठेवण्यात त्या त्या शहरातील राजकीय नेत्यांचे हितसंबंध आहेत. जी स्थिती मुंबईची तीच आता पुण्यात व इतर शहरांमध्ये होऊ लागली आहे. एसटीमध्येही खासगी कंत्राटदार घुसले आहेत. मुंबई-पुणे एशियाड बससेवा फायद्यात असताना सरकारने ती खासगी लोकांना आंदण म्हणून देऊन टाकली. याच धर्तीवर उद्या मुंबईची लोकल सेवा किंवा मुंबई-पुणे किंवा मुंबई- दिल्ली या रेल्वेच्या सेवा अदानीसारख्या खासगी कंपनीला देऊन टाकण्याचे विक्रम होऊ शकतात. हा विक्रमांचा प्रवास जनतेच्या जिवावर बेतणारा असेल.

विचार

# कांद्याच्या अश्रूंनी भिजलेला महाराष्ट्र

***राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अक्षरशः संकटाच्या खाईत उभा आहे. कांद्याचे पडलेले दर, वाढलेला उत्पादन खर्च, आयात-निर्यात धोरणातील अस्थिरता, प्रशासनाची उदासीनता आणि बाजार व्यवस्थेतील विस्कळीतपणा यामुळे आज शेतकरी मानसिकदृष्ट्याही कोलमडून गेला आहे. ज्या कांद्याने अनेक वेळा सरकारे हादरवली, तोच कांदा आज शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणत आहे.***

**मनोज कुलकर्णी**

महाराष्ट्रातील शेतकरी आणि कांदा हे समीकरण गेल्या अनेक दशकांपासून राज्याच्या राजकारण, अर्थकारण आणि समाजकारणाच्या केंद्रस्थानी राहिले आहे. देशातील सर्वात मोठा कांदा उत्पादक प्रदेश म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, धुळे, जळगाव आणि मराठवाड्यातील अनेक जिल्हे कांदा उत्पादनासाठी प्रसिद्ध आहेत; परंतु विडंबना अशी, की देशाला सर्वाधिक कांदा पुरवणारा शेतकरीच अनेकदा सर्वाधिक आर्थिक संकटात सापडतो. आजही अनेक बाजार समित्यांमध्ये कांद्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. दर वर्षी जवळपास तेच चित्र दिसते. कधी कांदा रस्त्यावर फेकला जातो, कधी बाजारात विक्री न करता शेतातच सडू दिला जातो आणि कधी आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रात या वर्षी काही ठिकाणी कांद्याला पन्नास पैसे किलो भाव मिळाल्याने शेतकऱ्यांची जणू चेष्टाच झाली. राष्ट्रीय बागवानी संशोधक संस्थेनुसार कांद्याचा उत्पादन खर्च १५ रुपये आहे. त्याच्या किमान दीडपट भाव शेतकऱ्यांना मिळायला हवा; परंतु प्रत्यक्षात उत्पादनखर्चाच्या आठ टक्केही भाव मिळाला नसल्याचे अनेक शेतकऱ्यांच्या कांद्याच्या पट्टया पाहून दिसते. आता सरकारने साडेबारा रुपये किलो दराने कांदा खरेदी करण्याचे ठरवले आहे; परंतु खरेच शेतकऱ्यांचा सर्व कांदा खरेदी केला जाईल का, तेवढी केंद्रे आहेत का, महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांवर ही वेळ वारंवार का येते, याचा विचार केला पाहिजे.

पूर्वी महाराष्ट्र देशाला कांदा पुरवत होता. आखाती देशांसोबतच शेजारच्या पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंकेत कांदा पाठवला जात होता. अलिकडच्या काही वर्षांमध्ये मध्य प्रदेश, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश आदी राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन वाढले आहे. त्यामुळे तिकडे कांदा जात नाही. सरकारच्या आयात-निर्यात धोरणातील धरसोडीमुळे कांदा बाहेरच्या देशांमध्ये जात नाही. देशाला सुमारे एक कोटी साठ लाख टन कांद्याची गरज असते. कितीही प्रयत्न केले, तरी कांदा निर्यात २०-२५ लाख टनांच्या पुढे जाऊ शकत नाही. त्यातही उन्हाळी कांदाच टिकतो. खरीप आणि रब्बी हंगामातील कांदा टिकत नाही. त्यामुळे कांदा साठवणुकीला आणि निर्यातीलाही मर्यादा आहेत. दरवर्षी सुमारे वीस लाख टन कांदा सडतो. हे गणित एकदा लक्षात घेतले, की कांद्याचे उत्पादन, पुरवठा, मागणी याचे अर्थशास्त्र जमले, तरच कांद्याला भाव येतो; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये मागणीच्या तुलनेत पुरवठा कायम जास्त होत असल्याने कांद्याचे भाव कोसळत आहेत. कांदा हे कमी काळात येणारे, कमी पाणी लागणारे आणि जमिनीत नायट्रोजन निर्माण करणारे पीक असल्याने तसेच एखाद्या वर्षी भावाचे गणित जमले नाही, तर दुसऱ्या वर्षी जमते, या अनुभवावर शेतकरी कांद्याची दरवर्षी लागवड करतो; परंतु दराचे गणित त्याला साथ द्यायला तयार नाही. त्यामुळे आता कांदा उत्पादकांच्या आत्महत्या व्हायला लागल्या आहेत.

उत्पादन खर्च, मजुरी, बियाणे, खत, कीटकनाशके, सिंचन, वाहतूक आणि साठवणूक खर्च लक्षात घेतल्यास मिळणारा भाव अनेकदा तोट्यात जाणारा ठरतो. परिणामी, कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक विवंचनेत सापडलेला दिसतो. कांद्याच्या प्रश्नाकडे केवळ बाजारभावाच्या दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. हा प्रश्न शेती अर्थशास्त्र, सरकारी धोरणे, निर्यात व्यवस्थापन, साठवणूक क्षमता, बाजारातील मध्यस्थांची भूमिका आणि ग्राहककेंद्री राजकारण यांच्याशी जोडलेला आहे. देशात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. भारत हा जगातील प्रमुख कांदा उत्पादक देशांपैकी एक आहे. कांद्याचे दर वाढतात आणि शहरी ग्राहक नाराज होतात, तेव्हा सरकार तातडीने निर्यातबंदी, निर्यात शुल्क, साठा मर्यादा किंवा बाजार हस्तक्षेप यांसारखे निर्णय घेते. या निर्णयांचा बाजारावर तात्काळ परिणाम होतो आणि दर कोसळतात. ग्राहकांना स्वस्त कांदा मिळतो; परंतु त्याची किंमत शेतकऱ्याला मोजावी लागते. शेतकऱ्याला त्याच्या मालाचा योग्य दर मिळण्याऐवजी तोट्यात विक्री करावी लागते. गेल्या काही वर्षांमधील घटनांचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट दिसून येते. कांद्याचे दर वाढू लागले, की केंद्र सरकारने अनेकदा निर्यातीवर निर्बंध घातले. काही वेळा किमान निर्यात मूल्य निश्चित करण्यात आले, तर काही वेळा थेट निर्यातबंदीच लागू करण्यात आली. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय कांद्याची विश्वासार्हता कमी झाली. भारतातून कांदा घेणाऱ्या देशांनी पर्यायी स्रोत शोधण्यास सुरुवात केली.

एकदा बाजार गमावला, की पुन्हा मिळवणे कठीण असते. याचा फटका शेवटी शेतकऱ्यालाच बसला. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे कांद्यासाठी प्रभावी हमीभाव यंत्रणा नसणे. गहू आणि तांदळाप्रमाणे कांद्याची सरकारी खरेदी होत नाही. कागदोपत्री काही योजना असल्या, तरी प्रत्यक्षात बहुतांश शेतकऱ्यांना मुक्त बाजारावर अवलंबून राहावे लागते. बाजारात पुरवठा वाढला, की दर कोसळतात. उत्पादन कमी झाले, की दर वाढतात; पण त्या वाढीचा लाभ सर्व शेतकऱ्यांना मिळतोच असे नाही. कारण त्या वेळी अनेक शेतकऱ्यांचा माल आधीच विकून गेलेला असतो. तिसरी समस्या म्हणजे साठवणुकीची अपुरी व्यवस्था. महाराष्ट्रात कांदा साठवणुकीसाठी पारंपरिक चाळींचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो; मात्र आधुनिक गोदामे, शीतगृहे आणि वैज्ञानिक साठवणूक सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना काढणीनंतर लगेच माल विकावा लागतो. त्याच काळात बाजारात मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने दर घसरतात. शेतकऱ्यांकडे पुरेशी साठवणूक क्षमता असती, तर ते बाजारातील परिस्थिती पाहून योग्य वेळी विक्री करू शकले असते. चौथी समस्या म्हणजे उत्पादन नियोजनाचा अभाव. चांगले दर मिळाले की पुढील हंगामात मोठ्या प्रमाणावर कांदा लागवड केली जाते. त्यामुळे उत्पादन वाढते आणि भाव घसरतात. भाव घसरल्यावर शेतकरी लागवड कमी करतात. त्यानंतर उत्पादन घटते आणि भाव वाढतात. अशा प्रकारे कांद्याच्या बाजारात सतत चढ-उतार सुरू राहतात. यावर दीर्घकालीन उपाय म्हणून पीक नियोजन, अचूक बाजार माहिती आणि शेतकऱ्यांना मार्गदर्शन आवश्यक आहे.

कांद्याच्या प्रश्नात मध्यस्थांची भूमिकाही महत्त्वाची आहे. शेतकरी आणि ग्राहक यांच्यामध्ये अनेक स्तरांवरील व्यापारी असतात. अनेकदा ग्राहक ३० ते ४० रुपये किलो दराने कांदा खरेदी करतो; पण शेतकऱ्याला त्यातील केवळ आठ ते बारा रुपयेच मिळतात. म्हणजेच पुरवठा साखळीतील नफ्याचा मोठा हिस्सा मध्यस्थांकडे जातो. शेतकरी उत्पादक कंपन्या, थेट विक्री व्यवस्था आणि डिजिटल बाजारपेठांचा विस्तार केल्याशिवाय ही दरी कमी होणार नाही. सरकारच्या धोरणांमधील सर्वात मोठी विसंगती म्हणजे ग्राहक आणि शेतकरी यांच्यातील संतुलन साधण्यात आलेले अपयश. महागाई वाढली, की सरकार तातडीने ग्राहकांच्या हिताचा विचार करते. हा विचार चुकीचा नाही; परंतु त्याच वेळी शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करणेही आवश्यक आहे. कांद्याचे दर वाढले, की सरकार सक्रिय होते; पण दर कोसळले की त्याच तत्परतेने हस्तक्षेप होताना दिसत नाही. हेच शेतकऱ्यांच्या नाराजीचे प्रमुख कारण आहे. महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी आज केवळ बाजारातील चढ-उतारांशी झुंज देत नाही, तर हवामानबदलाचाही सामना करत आहे. अवकाळी पाऊस, गारपीट, उष्णतेच्या लाटा आणि बदलते हवामान यामुळे उत्पादनावर परिणाम होत आहे. अनेक वेळा पीक नुकसान होते, तर अनेकदा साठवणुकीतील कांदा खराब होतो. अशा परिस्थितीतही योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी अधिकच वाढतात.

कांद्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढायचा असेल तर काही मूलभूत बदल आवश्यक आहेत. सर्वप्रथम, निर्यात धोरण स्थिर आणि दीर्घकालीन असले पाहिजे. वारंवार बदलणारे निर्णय टाळले पाहिजेत. दुसरे म्हणजे, कांद्यासाठी प्रभावी किंमत स्थिरीकरण यंत्रणा उभारली पाहिजे. दर कोसळल्यास सरकारी हस्तक्षेपाद्वारे शेतकऱ्यांचे संरक्षण केले पाहिजे. तिसरे म्हणजे, आधुनिक साठवणूक सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. चौथे म्हणजे, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि थेट बाजार व्यवस्थेला प्रोत्साहन दिले पाहिजे. पाचवे म्हणजे, प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करून कांद्यापासून मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्यावर भर दिला पाहिजे. कांदा हा केवळ एक भाजीपाला नाही, तर तो लाखो शेतकरी कुटुंबांच्या उपजीविकेचा आधार आहे. देशाच्या अन्नसुरक्षेत आणि अर्थव्यवस्थेत त्याचे महत्त्व मोठे आहे. त्यामुळे कांद्याकडे केवळ महागाईच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी शेतकरी कल्याणाच्या दृष्टिकोनातूनही पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वर्षानुवर्षे उत्पादन वाढवत आहे, तंत्रज्ञान स्वीकारत आहे आणि देशाची गरज भागवत आहे; मात्र त्याच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळत नसेल, तर ही व्यवस्था कुठे तरी अपयशी ठरत असल्याचे मान्य करावे लागेल.

**(लेखक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश प्रवक्ता आहेत.)**

चर्चा आजची

# गुणवत्ता पूर्ण शिक्षण काळाची गरज

**सुयोग आंग्रे**



देशातील बुद्धीजीवी वर्गामध्ये वेळोवेळी निःस्वार्थीकरणाची चर्चा होत असते, पण ती कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचू शकत नाही. जेव्हा उपनिवेशीकरणाची मोहीम सुरू होते तेव्हा त्याचा आधारही भारतीय असावा, हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे. आपण हे सत्य ओळखले पाहिजे आणि भारतातील समकालीन उच्च शिक्षण संस्था आणि त्यांची उत्पादने, संशोधन प्रयत्न आणि पदवीधरांसाठी अभ्यासक्रम यांना प्राधान्य दिले पाहिजे. या संदर्भात पाहिले तर, उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम नवकल्पनांच्या माध्यमातून जिवंत करण्याची गरज बऱ्याच काळापासून जाणवत होती, पण ठोस पावले उचलली जाऊ शकली नाहीत. ही प्रवृत्ती स्वदेशी विकासाच्या प्रयत्नात नेहमीच अडथळा ठरेल. स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही देशाच्या शैक्षणिक व्यवस्थेवरची वसाहतवादी पकड संपवणे कठीण काम ठरत आहे. वसाहतवादाचा हा प्रश्न गंभीर बनत आहे. यामुळे शिक्षण व्यवस्थेला गुणवत्ता संपवणारी वाळवी लागत आहे. सध्या अनेक भारतीय संस्थांचा अभ्यासक्रम भारतीय दृष्टीकोनाची वास्तविकता किंवा त्यांच्या समस्यांचे ज्ञान पूर्णपणे प्रतिबिंबित करत नाही. विद्यार्थ्यांना मौलिकतेच्या मार्गावर कसे चालायचे हे शिकवले गेले तरच उच्च संस्थांच्या प्रणालींमध्ये भारतीय ज्ञानाच्या उपनिवेशीकरणाच्या प्रयत्नांना स्पष्टपणे आणि सक्रियपणे पाठिंबा मिळू शकेल. त्यांना भारतीय परिस्थितीसाठी विशेष आणि विशिष्ट उपायांचा विचार करण्यासाठी देखील शिक्षित केले पाहिजे. भारतीय ज्ञानाच्या सध्याच्या व्यवस्थेचे उपनिवेशीकरण करूनच संपूर्ण स्वराज्याची प्राप्ती शक्य होईल. आता नाविन्यपूर्ण कल्पना आणि कार्यक्रम सादर करण्यापूर्वी ज्ञानशास्त्रीयदृष्ट्या विचार करण्यास मुक्त असणे आवश्यक आहे. ज्ञानशास्त्रीय मुक्तीमुळे मानसिक, भावनिक आणि मानसिक स्वातंत्र्य मिळते. उच्च शिक्षण संस्थांनी भारतीय विचार आणि दृष्टीच्या गतिमानतेवरील पकड गमावली आहे. याचे एक खास कारण म्हणजे भारतीय भाषांचे ज्ञान सामावून घेण्यात आलेले अपयश. आजही इंग्रजी ही अस्सल भाषा आहे आणि ती ज्ञानाच्या जगावर अधिराज्य गाजवते आहे. हिंदी आणि इतर भारतीय भाषांमध्ये विचार करत असताना, त्या विचारांचे इंग्रजीत भाषांतर करणे केवळ वेळखाऊच नाही, तर अनेकदा कुचकामी आणि अप्रामाणिक असल्याचेही सिद्ध होते. मूळ विचार करण्याची संधी देखील गमावली जाते कारण आपण आपल्या कल्पना आणि त्यांचे प्रकार परदेशातून आयात केले आहेत आणि त्यांना 'फिटिंग' केल्याशिवाय विचार प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही. आपल्या शैक्षणिक संस्थांमध्ये बौद्धिक प्रयत्न, अध्यापन प्रक्रिया आणि संशोधनात भारतीय भाषा संस्थात्मकदृष्ट्या अंगीकारता न येणे हा मौलिकतेच्या मार्गात मोठा अडथळा आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीत झेप घेणारे, आविष्कारांमध्ये प्रगती करणारे आणि शैक्षणिक उत्कृष्टतेच्या सीमा तोडणारे अनेक देश त्या अनुषंगाने आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमाला अनुकूल आणि विकसित करत आहेत, असे मानण्याची चांगली कारणे आहेत. दुर्दैवाने, पाश्चात्य शिक्षणाचा वारसा आपल्याला मिळालेल्या मर्यादेत आपण आपली विचारसरणी मर्यादित ठेवली आहे. त्याच वेळी, आम्ही व्यावहारिक आणि उपयुक्त पर्याय शोधण्यासाठी पुरेसे उत्सुक नाही. ते असो, युरोकेंद्री ज्ञान मॉडेलमधील आपले विसर्जन आपल्या विचारांचे वसाहत करत राहिले आहे आणि स्वावलंबी राष्ट्राला आवश्यक असलेल्या स्वदेशी विकासाच्या प्रयत्नांना नेहमीच अडथळा आणत आहे. भारतीय संस्कृतीचे जतन आणि समकालीन संशोधन आणि वैचारिक वास्तवांमध्ये त्या कल्पना आणि तत्त्वांचे एकत्रीकरण करण्याव्यतिरिक्त, भारतीय विद्यापीठांनी भारतीय प्रतिभा आणि ज्ञानविज्ञानाचे विश्वासूपणे प्रतिबिंबित करण्यासाठी विद्यमान अभ्यासक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रमांचा नियोजित विस्तार करणे आवश्यक आहे. तरच ते देशाला सक्षम आणि सज्ज करण्यात यशस्वी होऊ शकतील. आमचा अभ्यासक्रम आणि त्यांच्या मूल्यमापन पद्धती भारतीय जागतिक दृष्टिकोनाच्या तर्कशास्त्र आणि समीक्षेवर प्रश्न विचारण्यास सक्षम असायला हव्यात. या अभ्यासक्रमांनी विद्यार्थ्यांची आणि लोकांची आवड अशा प्रकारे आकर्षित केली पाहिजे की ते भारतीय ज्ञान परंपरेतून नावे निवडणे आणि मोजण्याच्या व्यायामाची केवळ औपचारिकता पार पाडत नाहीत, तर त्यांच्याद्वारे विचार करण्याची प्रेरणा मिळते. या दिशेने, ते देखील त्यांच्या स्वतः च्या आणि राष्ट्रीय चेतनेला आवाहन करू शकतात. भारतीय विचार आणि संकल्पनांचा शिक्षणात नैसर्गिक आणि समर्पक रीतीने समावेश करणे आवश्यक आहे जेणेकरून ते आपल्या गरजा आणि आव्हानांना अतिरिक्त ओझे न बनता तोंड देण्यास सक्षम होतील. त्यामुळे उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात समन्वय आणि नव्या कल्पनांच्या संयोजनातून नवसंजीवनी देणे केवळ आवश्यकच नाही तर अनिवार्य झाले आहे. जागतिकीकरणाच्या या युगात, अशी पावले उचलणे देखील आवश्यक आहे कारण ते अशा वैचारिक संरचनांना पुन्हा आकार देण्यास उपयुक्त ठरतील ज्यामुळे जागतिक ज्ञान समुदायात भारतीयांचे स्थान सुधारेल.

लोकसंसद

## बँकांसमोर आर्थिक फसवणुकीचे वाढते सायबर संकट

भारतात डिजिटल व्यवहारांचा विस्तार जितक्या वेगाने होत आहे, तितक्याच वेगाने आर्थिक गुन्ह्यांच्या पद्धतीही बदलत आहेत. इस्रायलच्या तेल अवीव या शहरात असलेल्या अग्रगण्य जागतिक सायबर सुरक्षा कंपनी 'बायोकॅच'च्या २०२६ जागतिक सर्वेक्षणानुसार, या सर्वेक्षणात भाग घेतलेल्या २५ देशांपैकी भारतीय बँका आणि वित्तीय संस्थांना अलीकडच्या काळात वाढत्या फसवणुकीच्या घटनांचा सर्वाधिक सामना करावा लागत आहे. भारतातील ८४ टक्के बँकिंग प्रमुखांनी गेल्या वर्षात आर्थिक फसवणुकीमुळे मोठे नुकसान झाल्याचे मान्य केले आहे. तर देशातील ६६ टक्के अधिकाऱ्यांनी तात्काळ देयक सेवा आणि डिजिटल व्यवहारांशी संबंधित फसवणूक प्रयत्न हे आर्थिक गुन्हे वाढण्यामागील प्रमुख कारण ठरत असल्याचे म्हटले आहे. सायबर गुन्हेगारांकडून 'एआय'च्या मदतीने बँक कर्मचाऱ्यांचे किंवा ग्राहकांच्या नातेवाईकांचे फोटो, हुबेहूब आवाज आणि डीपफेक व्हिडिओ तयार केले जातात आणि ग्राहकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केली जाते. या वाढत्या सायबर धोक्यांचा सामना करण्यासाठी पारंपरिक ओळख पडताळणी पद्धती (उदा. ओटीपी किंवा पासवर्ड) आता पुरेशा राहिलेल्या नाहीत. 'बायोकॅच'च्या अहवालानुसार, भारतीय बँकांना आता ग्राहकांचे डिजिटल वर्तन, व्यवहारांचा पॅटर्न आणि संशयास्पद हालचालींवर रिअल-टाइम लक्ष ठेवणारी आधुनिक 'एआय'आधारित बँकिंग फसवणूक नियंत्रण सुरक्षा यंत्रणा उभारणे गरजेचे झाले आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# जागतिक बालकामगार विरोधी दिन



आजच्या गतिमान युगातही जगभरात लाखो बालक आपल्या निष्पाप बालपणाच्या काळात शाळा, खेळ, शिक्षण याऐवजी कष्टकरी जीवन जगत आहेत. त्यांच्या या वेदनादायी वास्तवाकडे लक्ष वेधण्यासाठी दरवर्षी १२ जून रोजी 'जागतिक बालकामगार विरोधी दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून, एक सामाजिक साद आहे जी आपल्या प्रत्येकाला विचार करायला भाग पाडते की 'मुलांचे काम नाही, तर शिक्षण हवे!' संपूर्ण जगभरात बालकामगार विरोधी दिन दरवर्षी १२ जून रोजी पाळण्यात येतो. बालमजुरीला आळा घालण्यासाठी बालकामगार प्रथा कायमची बंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणात समाजामध्ये सामाजिक जागृती घडून यावी याकरिता १२ जून २००२ पासून जागतिक कामगार संघटनेच्या वतीने बालकामगार विरोधी दिनाची सुरुवात करण्यात आली. संपूर्ण जगभरात जागोजागी सुरू असलेल्या बालमजुरी, बालकामगार प्रथेवर समाजाचे लक्ष केंद्रित करण्याकरिता आणि त्यावर कायमस्वरूपी आळा घालण्याच्या उद्दिष्टासाठी जागतिक बालकामगार विरोधी दिवस पाळला जातो. १४ वर्षांखालील जी मुले स्वतः:च्या आणि आपल्या परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी, रोजगार कमवितात त्यांना बालकामगार म्हणतात. ज्या वयात शाळेत जावून शिकायचे, खेळायचे, बागडायचे त्या वयात हातात झाडू घेऊन साफ-सफाई करायची, भांडी, कपडे धुवायचे, विटा उचलायच्या, दगड फोडायचे अशी अनेक कामे करावी लागतात. या बालकामगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्यावतीने जिल्हास्तरावर राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविण्यात येतो. अमरावती जिल्ह्यात २००४ पासून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत ९ ते १४ वयोगटातील धोकादायक, व्यवसायामध्ये काम करणाऱ्या बालकामगारांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यात येते. प्रकल्पाचा मुख्य उद्देश बालकामगारांचा त्यांच्या कामापासून परावृत्त करून शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनविणे व त्यांच्या पालकांचा आर्थिक स्तर उंचावणे, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे. अमरावती जिल्ह्यात सध्या एकूण ३७ विशेष प्रशिक्षण केंद्र विविध वस्त्यांमध्ये कार्यान्वित आहेत. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात साधारतः १५० कर्मचारी काम करीत आहेत. या प्रकल्पांतर्गत बालकामगारांना विविध कौशल्य विकास योजनांचा लाभ मिळवून देण्यात येतो. बालकामगार थांबवण्यासाठी केवळ कायदे असून चालत नाही, तर समाजाची सक्रिय भूमिका आवश्यक आहे. जर कोठेही मुलांना कामावर लावले जात असेल, शोषण केले जात असेल, तर त्याबाबत त्वरित स्थानिक प्रशासन अथवा बालसुरक्षा संस्थांना कळवले पाहिजे. यासोबतच गरजू कुटुंबांना सरकारच्या योजना, शिक्षणविषयक मदत आणि रोजगारविषयक पर्याय यांची माहिती देणेही महत्त्वाचे आहे. शिक्षण हक्काचा प्रभावी अंमलबजावणी हीच या समस्येवर कायमची मूळ उपाययोजना आहे. 'जागतिक बालकामगार विरोधी दिन' म्हणजे एक सामाजिक बांधिलकी. हा दिवस आपल्याला विचार करायला लावतो आपण समाज म्हणून बालकांसाठी काय करत आहोत? त्यांचे बालपण वाचवण्यासाठी आपली पावले कोणत्या दिशेने चालली आहेत? एक सशक्त, शिक्षित आणि सन्मानित पिढी घडवायची असेल, तर बालमजुरीला पूर्णविराम द्यावा लागेल.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ जून

१) श्री. वामन धर्मा गायकवाड
श्रीबाग, १२-६-१९५२

२) श्री. चंद्रकांत रामदास पाटील
अलिबाग, १२-६-१९५२

३) श्री. चंद्रकांत नाथालाल मेहता
अलिबाग, १२-६-१९५८

४) श्रीम. प्रणिता सतिश वर्तक
अलिबाग, १२-६-१९६२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

### आजचे अन्नदाते



कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील, स्मरणार्थ
अलिबाग



कै. छाया शांताराम बैकर, स्मरणार्थ,
अलिबाग

दिव्या राजेश लंका,
अलिबाग

सौ नीला दहके,
पिंपळभाट, अलिबाग

## विजेचा धक्का लागून तरुणाचा मृत्यू

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील देऊड गावामध्ये विजेचा धक्का लागल्याने एका १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. जयराज संजय देसाई असे या मृत तरुणाचे नाव आहे. जयराज हा आपल्या घरासमोरील गाडीच्या शेडमधील हॅलोजन बल्ब बदलत असताना चालू असलेल्या विद्युत वाहिनीला त्याचा हात लागल्यामुळे तीव्र स्वरूपाचा विजेचा झटका बसला आणि तो जमिनीवर कोसळला. तरुणाची शुद्ध हरपल्याचे पाहून तात्काळ कुटुंबियांनी धावपळ सुरू केली. त्याला अत्यंत गंभीर अवस्थेत तातडीने उपचारासाठी जवळच असलेल्या जाकादेवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. परंतु, आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

# नालासोपाऱ्यात पानटपऱ्यांवर छापे

## ● पाच दुकाने सील; गुटखा माफियांना अन्न व औषध प्रशासनाचा दणका

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथे अन्न व औषध प्रशासनाने गुटखा तस्करांविरोधात मोठी मोहीम उघडली आहे. सुगंधित सुपारी आणि गुटख्याची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या पानटपऱ्या व दुकानांवर छापे टाकून अधिकाऱ्यांनी चार ते पाच दुकाने सील केली.

पालघर जिल्ह्यातील नालासोपारा आणि संपूर्ण वसई तालुका परिसरात गुटखा आणि प्रतिबंधित सुगंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या बेकायदेशीर विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने अत्यंत आक्रमक पाऊल उचलले आहे. एफडीएच्या विशेष पथकांनी नालासोपाऱ्यातील विविध बाजारपेठा, पानटपऱ्या आणि संशयास्पद दुकानांवर एकाच वेळी छापे टाकले आहेत. या धडक कारवाईमुळे संपूर्ण परिसरातील गुटखा माफियांचे धाबे दणाणले असून अनेकांनी आपली दुकाने बंद करून पळ काढला आहे.



### टोलनाक्यांवर फिल्डिंग

नालासोपारा आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये येणारा बहुतांश गुटखा हा गुजरात राज्याच्या सीमेवरून छुप्या मार्गाने वाहतूक केला जातो, अशी गोपनीय माहिती एफडीएच्या अधिकाऱ्यांना मिळाली आहे. या पुरवठा साखळीचा कणा मोडण्यासाठी प्रशासनाने केवळ दुकानांवरच नाही, तर वाहतुकीवरही लक्ष केंद्रित केले आहे. गुजरातवरून येणाऱ्या मालवाहू वाहनांची कसून तपासणी करण्यासाठी आणि संभाव्य गुटखा तस्करी रोखण्यासाठी प्रमुख हायवे आणि टोलनाक्यांवर विशेष पाळत तैनात करण्यात आली आहे.

वसई-विरार आणि नालासोपारा परिसरात गुटख्याची छुपी विक्री होत असल्याच्या तक्रारी अन्न व औषध प्रशासनाकडे सातत्याने येत होत्या. याची गंभीर दखल घेत एफडीएने या भागात ७ ते ८ विशेष पथके मैदानात उतरवली आहेत. या पथकांनी केलेल्या अचानक तपासणीदरम्यान ४ ते ५ मोठ्या दुकानांमध्ये प्रतिबंधित गुटखा आणि आरोग्याला घातक असलेली सुगंधित सुपारी मोठ्या प्रमाणात साठवून ठेवल्याचे आढळून आले.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करत संबंधित गुटख्याचा साठा जप्त केला असून, नियमांचे सरळसरळ उल्लंघन करणारी ही चार ते पाच दुकाने घटनास्थळीच सील केली आहेत. जप्त केलेल्या मालाची किंमत लाखो रुपयांच्या घरात असण्याची शक्यता असून, संबंधित दुकानदारांवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या कारवाईमुळे नालासोपाऱ्यातील मुख्य चौकांमध्ये बेकायदेशीरपणे पानमसाला आणि गुटखा विकणाऱ्या स्थानिक विक्रेत्यांमध्ये मोठी घबराट पसरली आहे.

# पावसाळी साहित्यांनी सजली तळा बाजारपेठ

**। तळा । प्रतिनिधी ।**

शाळा सुरू होण्यास अवघा तीन दिवसांचा कालावधी उरला असल्याने शालेय साहित्य खरेदीला वेग आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यावर्षी पाऊस लांबला असला तरी पावसाळ्यात लागणाऱ्या साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. तळा बाजारपेठेत शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी साहित्य बाजारात दाखल झाले असून विद्यार्थी व त्यांच्या पालकांची शालेय साहित्य खरेदीसाठी रेलचेल सुरू झाल्याचे पहावयास मिळत आहे.

सर्व शाळा १५ जूनला सुरू होणार असल्याने बाजारपेठेत वह्या, दप्तर, टिफीन, रेनकोट, छत्र्या, बुट, चप्पल, कमरपट्टे, पेन, कंपासपेटी व इतर साहित्य दुकानदारांनी विक्रीस आणले आहेत. मात्र मागील वर्षापेक्षा यावर्षी किंमती वाढल्याचे दिसत आहे. तरीही ग्राहक, विद्यार्थी पालक बाजारात वस्तू खरेदीसाठी सध्या मोठ्या प्रमाणात येत असल्याचे दिसत आहे. तसेच नागरिकही पावसाळपूर्व छत्र्या, मेनकापड, रेनकोट इत्यादी साहित्य खरेदी करताना दिसत आहेत.

# मान्सूनपूर्वी 'महावितरण'ची अपूर्ण कामे पूर्ण करावीत

## ● ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांचे निर्देश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील महावितरणची अपूर्ण असणारी सर्व कामे मान्सून सुरू होण्याअगोदर गतीने पूर्ण करावीत. अलिबाग तालुक्यातील आवास ते रेवदंडा परिसरात ग्राहकांची वाढती संख्या लक्षात घेऊन महावितरणच्यावतीने लवकरात लवकर शिबिराचे आयोजन करून ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात यावे. तसेच या परिसरातील वाढत्या वीजची मागणी लक्षात घेता १०० केव्हीचे २५ ट्रान्सफॉर्मर देण्यात यावेत, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर यांनी दिले.

एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या कार्यालयात आवास ते रेवदंडा किनारपट्टी परिसरातील वीजेच्या वाढत्या मागणीसंदर्भात आयोजित बैठकीत ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या.

ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे – बोर्डीकर म्हणाल्या की, अलिबाग तालुक्यातील आवास ते रेवदंडा या किनारपट्टीच्या गावामध्ये सागरी पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक नागरिकांनी घराघरात छोटे कॉटेज, होम-स्टे व इतर पर्यटनपूरक सुविधा निर्माण केल्या आहेत. या परिसरात वाढलेल्या पर्यटन व्यवसायामुळे विजेची मागणी लक्षात घेता महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने येथील विजेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. याचबरोबर या परिसरात शिबिराचे आयोजन करून ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करावे तसेच या शिबिरात पीएम सूर्य घर योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहचावावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# सोनवी पुलावरून एकेरी वाहतूक सुरू

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील संगमेश्वर बसस्थानकाजवळील सोनवी नदीवरील नवीन पुलाच्या एका मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर अखेर या पुलावरून एकेरी वाहतुकीला सुरुवात करण्यात आली आहे. तब्बल १८ वर्षे रखडलेल्या या प्रकल्पाच्या कामाला मूर्त स्वरूप मिळाल्याने स्थानिक नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.



मुंबई-गोवा महामार्गावर दररोज हजारो वाहने धावतात. मात्र संगमेश्वर येथील जुन्या आणि अरुंद पुलामुळे अनेक वर्षे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. पर्यटन हंगाम, सणासुदीचे दिवस आणि सुट्ट्यांमध्ये तर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून प्रवाशांना तासन्तास खोळंबा सहन करावा लागत होता. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी २००८ मध्ये नवीन पुलाच्या उभारणीचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र विविध तांत्रिक अडचणी, प्रशासकीय प्रक्रिया आणि निधीच्या प्रश्नांमुळे प्रकल्प रखडत गेला. गेल्या काही काळात पुलाच्या कामाला गती देण्यात आली आणि आता एका मार्गिकेचे बांधकाम पूर्ण झाल्याने त्यावरून वाहतूक सुरू करण्यात आली आहे.

# सुदाम शिंदे यांचा सेवापूर्ती सोहळा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

बीएसएनएलमधून तब्बल ३१ वर्षे ६ महिने प्रामाणिक सेवा बजावल्यानंतर सेवानिवृत्त होत असलेल्या तसेच वयाची ६० वर्षे पूर्ण केल्याबद्दल समाजसेवक सुदाम बाबू शिंदे यांचा सेवापूर्ती व षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शिंदे यांनी आपल्या जीवनात नोकरी, कुटुंब आणि समाजकारण यांचा सुंदर समतोल साधत कार्य केले. बीएसएनएलमध्ये सेवा बजावत असताना त्यांनी कर्मचारी संघटनेत सदस्य ते महाराष्ट्र राज्य सचिव या पदापर्यंत मजल मारली. तसेच सामाजिक क्षेत्रात जिल्हा सदस्य, महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी, जिल्हा सचिव ते जिल्हाध्यक्ष अशी विविध पदे भूषविली आहेत. सध्या ते महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे कोकण विभाग अध्यक्ष तसेच ओबीसी जनमोर्चा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. सर्व धर्म आणि सर्व पक्षांशी समभावाने वागणारे, जनसामान्यांमध्ये मिसळून समाजप्रबोधन करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. उपस्थित मान्यवरांनी शिंदेना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आगरी समाज विकास मंचाची कार्यकारणी जाहीर

## ● अध्यक्षपदी ॲड. डी.पी. म्हात्रे यांची बिनविरोध निवड

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुका आगरी समाज विकासमंचाची सर्वसाधारण सभा नुकतीच सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. डी.पी. म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णाजी कडू यांच्या हस्ते गणरायाचे पूजन करून सभेची सुरुवात करण्यात आली.

सभेच्या प्रारंभी कृष्णा वर्तक यांनी उपस्थित सभासद व मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर देशातील तसेच समाजातील दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मागील सभेचे इतिवृत्त कार्यवाहक ॲड. संदीप भोईर यांनी वाचन करून सभेसमोर मांडले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नवीन कार्यकारी मंडळाच्या निवडीबाबत अभिजीत कडू, वासुदेव पाटील, राम म्हात्रे व शशिकांत भगत यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर नवीन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. डी.पी. म्हात्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी अभिजीत कडू (नगरसेवक, पेण) व उज्वल म्हात्रे, खजिनदारपदी विठोबा पाटील (वाशी), सरचिटणीसपदी शशिकांत भगत, सहचिटणीसपदी राम म्हात्रे यांची निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून ललित पाटील (उद्योजक, पेण), मंगेश म्हात्रे (उद्योजक, पेण), परशुराम म्हात्रे (डोलवी), कृष्णा धर्माजी म्हात्रे (डोलवी), अनंत शंकर पाटील (जनवली), योगेश पाटील (वडखळ), कृष्णा वर्तक (मोठे वढाव), वासुदेव पाटील (तरणखोप) यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून तुकाराम म्हात्रे, विठोबा म्हात्रे, रमेश पाटील, यशवंत पाटील आणि द्वारकानाथ वर्तक यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी समाज विकासाच्या कार्यासाठी देणगीची घोषणा ही करण्यात आली. विठोबा बाळाराम पाटील यांनी ५१ हजार रुपये, तर कृष्णा वर्तक यांनी २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक बाबुराव कडू यांनी प्रत्येकाने या सामाजिक कार्यासाठी २५ हजार रुपयांची मदत करण्याचे आवाहन केले. आगरी समाज आज आर्थिकदृष्ट्या सक्षम असून अनेक दानशूर व्यक्ती या उपक्रमाला सहकार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उद्योजक ललित पाटील यांनीही आगरी समाजाच्या विकासासाठी कोणतीही कमतरता भासू देणार नसल्याचे सांगितले.

# नालासोपाऱ्यात कचऱ्याला आग

**माणगाव :** नालासोपारा पूर्वेतील आचोळे तलावासमोरील परिसरात फर्निचर दुकानांच्या मागील बाजूस साठवून ठेवलेल्या लाकडी वेस्टेज आणि कचऱ्याला अचानक आग लागल्याची घटना घडली. कचरा आणि लाकडी साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने आग झपाट्याने पसरू लागली आणि परिसरात धुराचे लोट पसरले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग नियंत्रणात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

'अमृत मानस मित्र'चे मोफत प्रशिक्षण | अनुभवी तज्ज्ञांचे मिळणार मार्गदर्शन

# मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांमधील वाढता शैक्षणिक ताण, भावनिक समस्या, सोशल मीडियाचे व्यसन, करिअरविषयक संभ्रम आणि मानसिक आरोग्याशी संबंधित विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर प्रशिक्षित समुपदेशकांची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. ही गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेमार्फत 'अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम' राबविण्यात येत असून मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी ही मोठी संधी ठरणार आहे.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे ही तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार असून प्रशिक्षणाची गुणवत्ता, अभ्यासक्रम, मार्गदर्शन आणि पर्यवेक्षणाची जबाबदारी संस्थेकडे असेल. मानसिक आरोग्य क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींना व्यावहारिक आणि सैद्धांतिक ज्ञान दिले जाणार आहे.

या प्रशिक्षणात विद्यार्थी समुपदेशन, बाल व किशोर मानसिक आरोग्य, संवाद कौशल्य, तणाव व्यवस्थापन, जीवनकौशल्य शिक्षण, आत्महत्या प्रतिबंध, सायबर सुरक्षा, पालक-शिक्षक समन्वय तसेच मानसिक आरोग्य जनजागृतीसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे स्वरूप हायब्रीड (ऑफलाइन आणि ऑनलाइन) असे ठेवण्यात आले आहे. पुणे येथील महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्थेत १५ दिवसांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण, त्यानंतर एक महिन्याची क्षेत्रीय नियुक्ती, ऑनलाइन तज्ज्ञ सत्रे, केस स्टडी चर्चा आणि सहा महिन्यांचे मार्गदर्शन यांचा समावेश असेल. प्रशिक्षणादरम्यान रोल प्ले, केस स्टडी आणि प्रत्यक्ष अनुभवावर विशेष भर दिला जाणार आहे. पहिल्या बॅचसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १५ जून ते २२ जून २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे.

### स्वयंरोजगाराचा मार्गही खुला होणार

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना 'अमृत मानसमित्र समुपदेशक' हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना शाळा व महाविद्यालयीन समुपदेशक, जीवनकौशल्य प्रशिक्षक, मानसिक आरोग्य जनजागृती प्रशिक्षक, विद्यार्थी कल्याण अधिकारी तसेच स्वतंत्र समुपदेशन सेवा सुरू करण्याच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे रोजगारासोबतच स्वयंरोजगाराचा मार्गही खुला होणार आहे.

### अर्जासाठी पात्रता

एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र किंवा मास्टर ऑफ सोशल वर्क ही पात्रता असलेले आणि अमृतच्या लक्षित गटातील निकष पूर्ण करणारे उमेदवार अर्ज करू शकतात. अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांचा संपूर्ण शैक्षणिक खर्च संस्थेमार्फत उचलला जाणार असून त्यांना मोफत प्रशिक्षणाची सुविधा मिळणार आहे.

## निवडक

### डॉ. नवाफ डावरेंना एमबीबीएस पदवी

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील वडवली गावचे सुपुत्र डॉ. नवाफ नूर मोहम्मद डावरे यांनी एमबीबीएस पदवी यशस्वीरित्या संपादन करून आपल्या कुटुंबाचे, गावाचे आणि संपूर्ण समाजाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च, जालना येथून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. डॉ. नवाफ यांनी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविला. हे यश त्यांच्या अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि गुणवत्तेचे प्रतीक आहे. त्यांनी आपले शालेय शिक्षण पुण्यातील रोझरी स्कूल येथे पूर्ण केले असून शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या यशामागे त्यांचे वडील नूर मोहम्मद डावरे आणि आई कमरजहाँ डावरे यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि आशीर्वाद लाभले आहेत. त्यांच्या त्याग, संस्कार आणि पाठबळामुळेच आज डॉ. नवाफ यांनी हे मानाचे यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व नातेवाईक, मित्रपरिवार, हितचिंतक आणि वडवली गावकरी यांच्याकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.





### अनधिकृत गतिरोधकांपासून धोका

**पालघर :** पालघर तालुक्यातील अत्यंत वर्दळीचा समजला जाणारा पालघर-सातपाटी मुख्य मार्ग सध्या अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या गतिरोधकांमुळे चर्चेचा विषय ठरला आहे. टेंभोडे येथील आंगण रिसोर्ट, घोडेला सोसायटी परिसर तसेच अल्याळी बसस्थानकाजवळ कोणतीही अधिकृत परवानगी अथवा वाहतूक विभागाच्या मान्यतेशिवाय गतिरोधक टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मार्गावरून दररोज हजारो वाहने, कामगार, विद्यार्थी आणि नागरिक प्रवास करीत असतात. अचानक उभारण्यात आलेल्या या गतिरोधकांमुळे वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून अपघाताचा धोका देखील वाढला आहे. विशेष म्हणजे, गतिरोधक टाकण्यात आले त्याच दिवशी अल्याळी परिसरात एका टेम्पो रिक्षाचा अपघात झाल्याची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित गतिरोधकांबाबत कोणतीही पूर्वसूचना, इशारा फलक किंवा आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे रात्रीच्या वेळी तसेच वेगात येणाऱ्या वाहनांना या गतिरोधकांचा अंदाज येत नसल्याने गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून टेंभोडे व अल्याळी परिसरातील अनधिकृत गतिरोधक हटवावेत व रस्ता पूर्ववत करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.



### उरणच्या नगराध्यक्षांचा सन्मान

**उरण :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचा २७ वा वर्धापन दिन मंगळवारी (दि.१०) मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे कार्यकर्त्यांच्या प्रचंड उत्साहात साजरा झाला. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उरणच्या नगराध्यक्ष भावना घाणेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते भावना घाणेकर यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. शरद पवार यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत उरण शहराच्या विकासासाठी, महिला सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सतत कार्यरत असणाऱ्या भावना घाणेकर यांच्या कामाची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के जागा महिलांना देण्याचा धोरणात्मक निर्णय जाहीर केला आणि भावना घाणेकर यांचा सत्कार हा याच महिला धोरणाचा भाग असल्याचे मानले जात आहे. 'भगिनींना संधी मिळाली तर त्या कर्तृत्व दाखवू शकतात, ऑपरेशन सिंदूरबाबत दोन महिलांनी माहिती देऊन हे सिद्ध केले,' असे पवार म्हणाले. पक्षामध्ये फूट पडली असली तरी विचाराने राहिलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे पवारांनी कौतुक केले आणि "जे राहिले ते विचाराने राहिले, तुमच्यासारखे कार्यकर्ते एकसंघ राहून विचारांना पुढे नेतील तर सत्ता आपोआप येईल," असा विश्वास व्यक्त केला. भावना घाणेकर यांच्या सत्काराने उरण शहरातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### 'फळपीक नुकसानीचे पंचनामे करा'

**मुंबई :** राज्यातील मे व जून २०२६ या कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपिटीमुळे बाधित झालेल्या फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि काटेकोरपणे पूर्ण करावेत. शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेऊन नुकसानभरपाईची प्रक्रिया गतीमान करावी, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या फळपीक नुकसानीसंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री भरणे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, मे आणि जून २०२६ या कालावधीत राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये एकूण ६१ हजार ४ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यापैकी १८ हजार १२१ हेक्टर क्षेत्र केळी पिकाखालील आहे. बाधित क्षेत्राचे सर्वेक्षण आणि पंचनाम्याची प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. विशेषतः ६ जून रोजी झालेल्या पावसामुळे माठे नुकसान झाले असून त्याचे अचूक मूल्यमापन करणे आवश्यक आहे. भारतीय कृषी विमा कंपनीकडून नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू असून सर्व पंचनामे पुढील दहा दिवसांत पूर्ण करावेत, असे निर्देशही मंत्री भरणे यांनी दिले.

# नेरळ ग्रामपंचायतीचे नालेसफाईकडे दुर्लक्ष

- पाऊस तोंडावर तरी प्रशासन सुस्त
- नेरळ गावासाठी मोठी समस्या

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात शहरीकरण झालेल्या नेरळ ग्रामपंचायतीमध्ये अनेक नाले आहेत. पावसाळ्यात पाण्याने तुडूंब भरून वाहणारे नाले सध्या हिरव्या पाण्याने आणि जलपर्णींनी भरलेले आहेत. नेरळ ग्रामपंचायतीकडून नालेसफाई झाली नसल्याने नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासन करते तरी काय? असा प्रश्न सर्वसामान्य लोक उपस्थित करू लागले आहेत.

नेरळ गाव हे मुंबईपासून दीड ते दोन तासाच्या अंतरावर असल्याने उपनगरीय लोकल सेवेमुळे नागरीकरण झपाट्याने झालेले उपनगर बनत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये नव्याने राहायला आलेले रहिवाशांसाठी उभा राहिलेल्या इमारती यातून बाहेर पडणारे सांडपाणी हे आता नेरळ गावासाठी समस्या बनत चालली आहे.



माथेरान डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या नेरळ गावातून दोन मोठे नाले पावसाळ्यात दुथडी भरून वाहत असतात. पावसाळ्यात वाहणारे नाले जे पावसाळा संपल्यावर कोरडे पडतात तर काही नाल्यातून सांडपाणी वाहत उल्हास नदीपर्यंत जात असते. या उल्हास नदीमध्ये होणारे प्रदूषण लक्षात घेऊन नेरळ गावातील सांडपाण्यावर प्रक्रिया करावी अशी चर्चा सातत्याने होत असते. मात्र ते नाले नेरळ ग्रामपंचायत प्रशासनाकडून पावसाळा सुरू होण्याआधी स्वच्छ देखील होत नसल्याने पावसाळ्यातील पाण्याबरोबर नाल्यातील घाण आणि कचरा उल्हास नदीत जाण्यास मदत होते. त्यामुळे कोणत्याही शहरात नालेसफाई एप्रिल महिना सुरू झाल्यावर सुरू होते. नेरळ ग्रामपंचायतीकडे स्वच्छता आणि आरोग्य विभागात ५०-६० कामगार आहेत. कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांकडून गावातील गटारांची स्वच्छता करण्याची कामे होतात.

मात्र, नेरळ गावातून वाहणारे दोन मोठे नाल्यांची सफाई कोण करणार? असा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. माथेरानचे डोंगरातून पावसाचे पाणी पाडा भागातील नाल्यातून पलीकडे मातोश्री नगर असे वाहत गंगानगर आणि पुढे एसटी स्टॅण्ड भागातून उमानगर असे जात असते. तर नेरळ गावातून वाहणारा दुसरा मोठा नाला हा आनंद वाडी जवळील कोमल वाडी येथून येतो. हा नाला मोहाची वाडी कोतवाल वाडी असा खांडा भागातून रेल्वे स्टेशन असा पुढे उल्हास नदीकडे जातो. तर तिसरा मोठा नाला हा माथेरान डोंगरातून पुढे टपाल वाडी असे होऊन पायरमाळ येथून गणेश घाट ब्रिटिश कालीन धरण येथून पोलीस ठाण्याच्या बाजूने पुढे रेल्वे स्टेशनकडे जातो. या नाल्यांची नालेसफाई दरवर्षी काही प्रमाणात केली जाते.

> “यावर्षी देखील अशीच थातूरमातूर पद्धतीने नाल्यांची सफाई केल्याचे दिसून येत आहे. ग्रामपंचायतीने केल्याचे सांगितले जात आहे. नालेसफाई केली आहे. तर नाले पुन्हा कचऱ्याने तसेच हिरव्या रंगाच्या पाण्याने भरले आहेत.”
>
> –गोरख शेप
> स्थानिक जागरूक नागरिक

## निवडक



### माथेरानमध्ये मनसेच्या उपोषणाची सांगता

**माथेरान :** शहरातील विजेच्या समस्या बाबत मनसेनेच्या वतीने उपोषण करण्यात आले होते. शहर अध्यक्ष संतोष कदम यांनी पुकारलेल्या आमरण उपोषणाला माथेरानमधील सर्व पक्षीय यांनी पाठिंबा दिला होता. महावितरणचे उप अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी माथेरान मधील सर्व कामे मंजूर असल्याचे पत्र सादर केल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले. पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमधील वीज पुरवठा खंडित होत आहे. गेले अनेक महिने वीज पुरवठा समस्या कायम आहे. माथेरानसाठी कळंबोली आणि नेरळ किंवा कर्जत इतर ठिकाणाहून वीज पुरवली जाते. त्यामुळे दुर्गम भागात असलेल्या माथेरान फिडर आणि डिओ सारखे बंद पडत असतात. माथेरानमध्ये अनेक वर्ष सुरू असलेला वीज पुरवठा खंडित होण्याचा हा परिणाम आहे. वीज नसताना देखील माथेरानकर वीज बिल भरण्याचे काम करतात. जर तुम्ही माथेरानची जबाबदारी घेत नसाल तर तुमचे माथेरानमध्ये काम काय? असा प्रश्न कदम यांनी उपस्थित केला आहे.



### मुनवलीत स्वच्छतेचा अनोखा उपक्रम

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथे रविवारी (दि.७) जून रोजी प्लास्टिक बाटलीमुक्त गांव अभियान या उपक्रमाचे उद्घाटन मापगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुनिल थळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी प्लास्टिक बाटलीमुक्त गांव अभियान अंतर्गत मुनवली गावामध्ये प्लास्टिक बाटल्यांचा कचरा नवीन लोखंडी जाळीच्या कुंडीमध्ये टाकण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्या पुढाकाराने व स्वखर्चाने ही कुंडी बसविण्यात आली आहे. यामुळे गावात वापर इस्तत: टाकण्यात येणाऱ्या प्लास्टिक बाटल्या आता प्लास्टिक बाटल्यांचा कचरा चार कुंड्यांमध्ये जमा करण्यात येणार असून गावात मोठ्या प्रमाणात स्वच्छता निर्माण होणार असल्याचे घाडी यांनी सांगितले. यावेळी सुनिल थळे, विवेक जोशी, सतीश घाडी, सानिका घाडी, गोविंद अनमाने, संजय अनमाने, दिलीप मोंढे, शैलेश तिलोटकर, मधुकर सूद, संतोष बांद्रे, वामन ठकरूळ, सुधाकर ठकरूळ, रुस्तुम कुर, मुनवर कुर, विजय पंडम, अमोल मोंढे, भगवान करमेळे, रुपेश अंगणे, मनिष खाडे, महेश नागावकर, मयुर अनमाने, सुलोचना मोंढे, निर्मला पंडम, रंजना घाडी, राजश्री पुजारी, सविता तिलोटकर, दिपाली मोंढे, संजना अनमाने, रत्नेशा अनमाने, रीना मोंढे, रुपाली अनमाने आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ‘शासकीय वसतिगृहात प्रवेशाकरीता अर्ज करा’

**नवीन पनवेल :** शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, ग्रीन पार्क सोसायटी समोर सेक्टर १०, प्लॉट नंबर २१ कळंबोली, पनवेल येथे कार्यरत आहे. मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छूक विद्यार्थीनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल उषा शशिकांत गुजेला यांनी केले आहे. या वसतिगृहामध्ये इ.८ वी पासून गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय अनु.जाती ८५ टक्के , अनु.जमाती ३ टक्के, विमुक्त जाती व भटक्या जमाती ५ टक्के, आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील विद्यार्थीनी ५ टक्के व विशेष मागास प्रवर्ग २ टक्के यांना गुणवत्तेनसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनीकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा ऋतुमानानुसार एक फळ व दुध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण देण्यात येते. अभ्यासाकरिता पुस्तके लेखन साहित्य विनामूल्य पुरविले जाते. दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून दरमहा १ हजार १५० निर्वाहभत्ता दिला जाईल तसेच अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

### तळोजा उपकेंद्रात भीषण आग

**खारघर :** तळोजा फेज-दोन येथील सेक्टर २६ मधील महावितरणच्या उपकेंद्रात रविवारी (दि.८) जून रोजी मध्यरात्री अचानक आग लागल्याची दुर्घटना घडली. यामध्ये विद्युत यंत्रणेचे मोठे नुकसान झाल्याने परिसरात वीजपुरवठा खंडित झाला. ऐन उकाड्याच्या दिवसांत वीज गेल्यामुळे रहिवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागले. तळोज्यात रात्री एकच्या सुमारास उपकेंद्रातून धूर निघत असल्याचे रहिवाशांच्या निदर्शनास आले. काही वेळातच आगीने तीव्र स्वरूप धारण केल्याने परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच महावितरण, अग्निशमन दल आणि पोलिस घटनास्थळी दाखल झाले. शर्थीच्या प्रयत्नानंतर जवानांना आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. यासंदर्भात महावितरणचे उपअभियंता रोहित मोरे यांच्याशी संपर्क केला असता, युद्धपातळीवर काम करून रात्री चारच्या सुमारास भागातील वीज पुरवठा सुरळीत झाल्याचे सांगितले. खारघरमध्ये तीन दिवस खेळखंडोबासेक्टर १२ मधील बी आणि जी लाइन परिसरात मागील तीन दिवसांपासून दररोज रात्री ११ ते पहाटे ३ वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. नवीन उपकेंद्र उभारणारनवी मुंबई, पनवेल आणि उरण या वेगाने विकसित होणाऱ्या परिसरातील वीज ग्राहकांची संख्या तब्बल ११ लाखांवर पोहोचली आहे. या वाढत्या भारामुळे महावितरणच्या अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रांवर आणि रोहित्रांवर मयादेपलीकडे ताण निर्माण झाला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- आवास परिसरामध्ये हाऊस किपिंग स्टाफ भरणे आहे. १५००० पगार +PF+ ESIC ८ तास ड्युटी. मो.नं. ९३७०५७९१६३, ८८३०२७७९५८
- Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required. Call 9150717038
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कडुलिंबाची झाडे लावून वाढदिवस साजरा

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरातील कोतवाल नगरमध्ये राहणाऱ्या असिफ मिर्झा या पर्यावरणप्रेमीने आपला साठवा वाढदिवस साठ कडुलिंबाची झाडांचे वृक्षारोपण करून साजरा केला. असिफ यांनी सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या मित्रांसोबत कर्जतच्या टेकडीवर कडुलिंबाच्या रोपांचे वृक्षरोपण केले. त्यानंतर सय्यद युसूफ शहा बाबा दर्गा रस्त्यावर वृक्षारोपण करून आपला साठवा वाढदिवस साजरा केला. या वृक्षरोपण सोहळ्याचा शुभारंभ नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांच्या हस्ते करण्यात आला.



याप्रसंगी उपनगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेविका नेहा शिंदे, अंजली कडू, सुभाषचंद्र नातू, कृष्णा लाड, पांडुरंग गरवारे, दिलीप कदम, अतुल कडू, विजय बेडेकर, भास्कर थोरवे, निलेश शिंदे, आदी उपस्थित होते.

यावेळी नातू यांनी मिर्झा यांच्या जीवनारील स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली. मिर्झा यांनी, पर्यावरण जोपसण्यासाठी मी हा एक छोटासा प्रयत्न केला आहे. या झाडांचे संगोपन करण्याचाही मी प्रयत्न करीन असे स्पष्ट केले.

याप्रसंगी मुकुंद भागवत, समीर सोहनी, आरिफ मिर्झा, सुमित चौडिया, शिवाजी श्रीखंडे, बळीराम दिघे, सुनील दानवे, प्रशांत उगले, मोहम्मद आयान मिर्झा, हेमंत परदेशी, आरिफ चौगुले, रियाज मुजावर, अकिल मुजावर, आबीद खान, वेदांत शिंदे आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठीकरिता एकत्रित कार्य करा

पनवेल : मराठी भाषा आणि सकस साहित्या करिता सर्व साहित्य संस्थांनी एकत्रित येऊन कार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कोषाध्यक्ष गझलकार प्रदीप निफाडकर यांनी पनवेल येथे केले. पनवेल उरण आगरी समाज मंडळ के गोलीमय वाचनालय पर्ण विचार मंच कोमसाप पनवेल व नवीन पनवेल शाखा या साहित्य संस्थांच्या वतीने प्रदीप निफाडकर यांच्याशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आगामी काळात मराठी भाषा, ग्रंथालय, साहित्य संमेलनापूर्वी पनवेलमध्ये सुद्धा साहित्य संमेलन नियोजित करावे असे सांगून पु ल देशपांडे,आचार्य अत्रे यांच्या आठवणींना उजाळा त्यांनी दिला.



## इंद्रायणी डोंगर परिसरात वृक्षारोपण


| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेर गावातील निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांच्या नेतृत्वाखाली इंद्रायणी डोंगर परिसरात आणि अक्कादेवीच्या माळरानात विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यावेळी विविध प्रकारची एकूण १० हजार झाडे लावण्याचा संकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. जंगल सत्याग्रहाच्या शतक महोत्सवाचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी २०२२ पासून इंद्रायणी डोंगर व अक्कादेवी डोंगरावर फळझाडे लावण्याची सुरुवात केली आहे. आजपर्यंत आंबा, जांभूळ, काजू, फणस अशी विविध प्रकारची फळझाडे त्यांच्या मार्गदर्शनाखाली लावण्यात आली आहेत.

## अनंत धाडवे यांना देवाज्ञा

| महाड | प्रतिनिधी |

महाड तालुक्यातील विठ्ठलवाडी गावचे ज्येष्ठ वारकरी ङ्गकाविळवाले बाबाफ म्हणून परिचित असलेले अनंत सखाराम धाडवे यांचे रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने विठ्ठलवाडीसह संपूर्ण महाड तालुका, रायगड जिल्हा त्यांच्या अनुयायांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह असंख्य नागरिकांनी अंतिम दर्शनासाठी गर्दी केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी,



तीन मुले, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. धाडवे परिवाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार दि. १३ जून रोजी ङ्गसातवाफ विधी तर शुक्रवार दि. १९ जून रोजी विठ्ठलवाडी येथे उत्तरकार्य विधी संपन्न होणार आहे असे त्याच्या नातेवाईकांनी सांगितले आहे.

## आंबे पिकातून शाश्वत आर्थिक विकास

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविली जाते. या योजने अंतर्गत आंबा फळबागेतून खालापूर तालुक्यातील धामणसे बंधूंनी खालापूर, कर्जत, पनवेल, पेण, अलिबाग, सुधागड, रोहा, मावळ, पुणे, मुंबई तसेच विदर्भातील अकोला, अहिल्यानगर, श्रीरामपूर, सांगली इस्लामपूर आणि आंध्रप्रदेश येथे आंबे यशस्वीरित्या विक्रीसाठी पाठविले. या विक्रीच्या माध्यमातून त्यांनी शाश्वत आर्थिक विकास साधण्याचा आदर्श निर्माण केला आहे.

तालुका कृषि अधिकारी यांच्या माध्यमातून २०१७ ते २०२० या कालावधीत खानाव व खांबेवाडी



महसूल गावांमध्ये आंबा फळबाग लागवड करण्यात आली होती. मागील दोन वर्षांपासून या बागांमधून आंबा उत्पादन घेण्यास सुरुवात झाली असून, यंदाही एप्रिल महिन्यापासून हापूस व केशर आंब्याची काढणी करण्यात आली. नैसर्गिकरित्या पिकवलेले रसाळ, गोड व चविष्ट हापूस आणि केशर आंबे विक्री आणि व्यवस्थापनाचे हे दुसरे वर्ष असतानाही ग्राहकांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. या आंब्याच्या दर्जाबाबत सकारात्मक प्रतिक्रिया प्राप्त होत असून, या प्रतिसादाबद्दल धामणसे बंधूंनी सर्व ग्राहकांचे आभार मानले आहेत. या यशामागे प्रमुख आंबा शास्त्रज्ञ डॉ.भगवानराव कापसे, विषय विशेषज्ञ डॉ. जीवन आरेकर, डॉ.साळवी तसेच तालुका कृषि अधिकारी कार्यालय व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभल्याचे आंबा बागायतदार मंगेश धामणसे, साधूराम धामणसे व जितेंद्र धामणसे यांनी सांगितले.

## कार्यालयाच्या काचा पारदर्शक नसल्याने कारवाईची मागणी

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयाच्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. पूर्वीच्या हेरिटेज इमारतीचे नूतनीकरण करताना लाकडी तावदानाच्या खिडक्यांची जागा आता स्लायडिंग खिडक्या यांनी घेतली आहे. मात्र त्या खिडक्यांना बसवण्यात आलेल्या काचा बद्दल माहिती अधिकार कार्यकर्ते दिगंबर चंदने यांनी आक्षेप घेतला आहे.

माथेरान या गिरीस्थान नगरपरिषद कार्यालयाच्या मुख्य इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातील खिडक्यांना शासन परिपत्रकाचे उल्लंघन करून बसविण्यात आलेल्या अपारदर्शक



काचा काढून टाकण्याबाबत तक्रार माथेरान शहरातील चंदने यांनी कोकण आयुक्तांकडे केली आहे. नूतनीकरण करण्यात आलेल्या पालिका मुख्याधिकाऱ्यांच्या दालनातील खिडक्यांना बाहेरून आत दिसू नये अशा अपारदर्शक काचा बसविण्यात आल्या आहेत. त्याचवेळी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनाचा दरवाजा पूर्णपणे लाकडी असून त्यामध्ये कोणतीही पारदर्शक काच नाही. विशेष म्हणजे यापूर्वी सदर दालनास अशा प्रकारच्या काळ्या काचा नव्हत्या व त्या अलीकडेच बसविण्यात आल्याचे दिसून येते. तक्रारकर्ते चंदने यांच्या कडून करण्यात आलेल्या तक्रारीनुसार शासन परिपत्रकानुसार शासकीय, निमशासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी,कर्मचारी यांच्या दालनांच्या दरवाजे व खिडक्यांना काळ्या, अपारदर्शक काचा बसविण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

मुख्याधिकाऱ्यांच्या दालनास बसविण्यात आलेल्या आहेत. सदर काचा कोणत्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने बसविण्यात आल्या आहेत याची चौकशी करण्यात यावी. तसेच आवश्यक मंजुरी नसल्यास सदर काचा १५ दिवसांच्या आत काढून टाकण्याचे आदेश देण्यात यावेत अशी मागणी केली आहे.

## शालेय वस्तूंच्या खरेदीसाठी गर्दी

| कर्जत | प्रतिनिधी |

शाळेचा गणवेश, नवीन दप्तर, वह्या, पुस्तके कार्टूनच्या चित्रांची कंपास पेटी, रंगबेरंगी डबे विविध आकाराच्या पाण्याच्या बाटल्या अशा सगळ्या नव्या नव्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालकांसह मुलांची गर्दी कर्जत बाजार पेठेच्या दुकानांमध्ये दिसत आहे. उन्हाळ्याची सुटी संपत आली आहे. मुलांना शाळा सुरू होण्याचे वेध लागले आहे.

काही शाळा सुरु झाल्या आहेत तर काही शाळा १५ जून पासून शाळा सुरू होणार आहेत. त्यामुळे शाळांमध्ये नवीन वर्ग, नवीन मित्र अशा स्वप्नात रंगलेले बाल विद्यार्थ्यांची शालेय साहित्य घेण्यासाठी लगबग सुरू झाली आहे.

कर्जत बाजारपेठेत सध्या शालेय वस्तू, शालेय गणवेश मिळत असलेल्या दुकानांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे. प्रत्येक शाळेचे गणवेश वेगवेगळे असल्याने पालकांची धावपळ होत आहे.

शहराच्या अनेक दुकानात शाळेचे गणवेश, दप्तर, रेनकोट, छत्री खरेदी साठी पालकांसह विद्यार्थी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत आहे, मार्केटमध्ये नविन फॅन्सी आलेल्या स्कुल बॅग, रेनकोट खरेदीवर विद्यार्थाचा जोर दिसत आहे.

**एस. एन. डी. टी. महाविद्यालयाचा अजब कारभार | प्रशासनाचे गंभीर बाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष**

# लिव्हिंग सर्टिफिकेटसाठी विद्यार्थ्यांची परवड

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबई संचलित महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालयाचा बेजबाबदार कारभार समोर आला असून, विद्यापीठाच्या नाकर्ते पणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागेवर पर्यायी व्यवस्था न केल्याने, तृतीय वर्षाच्या उत्तीर्ण विद्यार्थिनींना अद्याप ‘लिव्हिंग सर्टिफिकेट’ मिळालेले नाही. स्वाक्षरी करण्यासाठी प्राचार्य नसल्याने विद्यार्थिनींना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



एस. एन. डी. टी. महाविद्यालयाचे प्राचार्य गेल्या वर्षी सेवानिवृत्त झाले होते. परंतु काही महिन्यांसाठी त्याच निवृत्त प्राचार्यांची प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. काही महिन्यांपुरतीच नियुक्ती करण्यात आलेले प्रभारी प्राचार्यांनी पदभार सोडल्यानंतर त्या जागेवर प्राचार्यांची नवनियुक्ती करणे किंवा स्वाक्षरीचे अधिकार अन्य वरिष्ठ प्राध्यापकाकडे सोपवणे गरजेचे होते. मात्र, महाविद्यालय प्रशासनाने या गंभीर बाबीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. सध्या तृतीय वर्षाचा निकाल लागून विद्यार्थिनी पुढील शिक्षणासाठी वेगवेगळ्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

मात्र, प्रत्येक ठिकाणी मूळ लिव्हिंग सर्टिफिकेटची मागणी केली जात आहे. नियोजनाच्या अभावामुळे आमचे वर्ष वाया गेले तर आमचे शैक्षणिक नुकसान कोण भरून देणार अशी प्रतिक्रिया विद्यार्थीनी व्यक्त करीत आहेत.

या गंभीर प्रकरणाची दखल विद्यापीठ प्रशासन आणि उच्च शिक्षण विभागाने तात्काळ घेणे गरजेचे आहे. श्रीवर्धन एस. एन. डी. टी. प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात तात्काळ स्वाक्षरीचे अधिकार कोणाकडे तरी सुपूर्द करून येत्या चौवीस तासांतविद्यार्थ्यांना दाखले वाटप करावेत अशी पालकांनी मागणी केली आहे.

### प्रवेशाचा मुदत काही दिवसांवर

पुढील शिक्षणासाठी किंवा इतर कोर्सेसची प्रवेश घेण्याची अंतिम मुदत अवघ्या काही दिवसांवर आली आहे. ऑनलाईन फॉर्म भरताना किंवा कागदपत्र पडताळणीच्या वेळी दाखला सादर न केल्यास प्रवेश रद्द होऊ शकतो. या मानसिक त्रासामुळे विद्यार्थिनी हवालदिल झाल्या आहेत.

# ट्रेलर पार्किंगमुळे अपघाताला निमंत्रण

## कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी

। उरण । प्रतिनिधी ।



गव्हाण फाटा-दिघोडे मार्ग, उरण-पनवेल मुख्य रस्त्यावरील जासई बस स्थानक, तसेच करळ फाटा येथे दोन्ही बाजूला बेकायदा ट्रेलर पार्किंग करण्यात येते. त्यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत असून, अपघात होण्याचा धोका बळावला आहे. त्यामुळे अशा बेकायदेशीर व अनधिकृत पणे उभे असलेल्या सर्वच वाहनांवर कायदेशीर कारवाई करून या समस्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी जनतेने केली आहे.

गव्हाण फाटा-दिघोडे मार्गावर तसेच उरण-पनवेल मुख्य मार्गावर वाहतूक कोंडी सुरळीत व्हावी, या मार्गावरील प्रवास करणाऱ्या नागरिकांना त्रास होऊ नये, या दृष्टिकोनातून सार्वजनिक बांधकाम खात्याने काही वर्षांपूर्वी गव्हाण फाटा-दिघोडे मार्ग हा चौपदरी करण्यात आला होता. मात्र, काही गोदाम मालकांनी येथे चक्क अनधिकृतपणे ट्रेलर उभे करण्यास सुरुवात केली आहे. अशात रस्ता अरुंद होत असून, इतर गाड्यांना प्रवास करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. त्याचा त्रास वयोवृद्ध व शाळकरी मुलांनीही अनेकदा होतो. त्यावर तोगडा काढावा, यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते व पोलीस प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. वारंवार होणाऱ्या अनधिकृत व बेकायदेशीर पार्किंगमुळे उरणमधील नागरिकांना जीव मुठीत घेऊन रोजचा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे ही दैनंदिन समस्या आता उग्र रुप धारण करत आहे.

> “रस्ते वाहतूक व अपघात तसेच वाहतूक कोंडी, अवैध पार्किंग संदर्भात आम्ही जेएनपीएच्या चेअरमनसोबत बैठक घेतली आहे. यार्डमध्ये ५० कंटेनरची जागा असते, तर येथे २५० कंटेनर येतात. त्यामुळे अनेक कंटेनर हे रस्त्याच्या आडवे लावले जातात. याबाबत आम्ही वेळोवेळी कारवाई करत असतो. वाहतूक कोंडी होऊ नये तसेच अपघात होऊ नये यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत
> – अतुल दहिफळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण वाहतुक विभाग”

## “पारंपरिक मच्छीमारांचे संरक्षणही महत्त्वाचे”

। कोर्लई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनाने मत्स्यसंपदा वाढीसाठी मासेमारी बंदीचा कालावधी १ जून ते ३१ जुलै ऐवजी १ जून ते १५ ऑगस्ट करण्याचा विचार सुरू केला आहे. पावसाळा हा बहुतांश माशांचा प्रजनन काळ असल्याने मत्स्यसंवर्धनासाठी असे निर्णय आवश्यक आहेत, त्याला पारंपरिक मच्छीमारांचा विरोध नाही. परंतु, या निर्णयांचा सर्वाधिक परिणाम कोणावर होणार, याचाही विचार होणे गरजेचे आहे. त्यामुळे मत्स्य संवर्धनाबरोबर पारंपारिक मच्छीमारांचे संरक्षणही तितकेच महत्वाचे आहे. आज गरज आहे ती केवळ बंदीचा कालावधी वाढवण्याची नाही तर छोट्या पारंपरिक मच्छीमारांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र धोरण, आर्थिक मदत, पर्यायी रोजगार आणि समुद्री संसाधनांचे न्याय्य व्यवस्थापन करण्याची आहे. समुद्र फक्त उपजीविकेचे साधन नाही, तर अनेक पिढ्यांच्या अस्तित्वाचा आधार असल्याचे असल्याचे मत मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच चेतन जावसेन यांनी व्यक्त केले.

### जाहीर सूचना

सर्वांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. विजयकुमार बीजेंद्रप्रताप सिंग व श्रीमती सुनीता विजयकुमार सिंग हे खालील अनुसूचीत विस्तृतपणे विवरणीत शेतजमिनीचे (सदर मालमत्ता) मालक असून त्यांनी सर्व भार व मागणीपत्रांपासून मुक्त अशा सदर मालमत्तेची आमच्या अशिलांना विक्री करण्याचे मान्य केले आहे. कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, उत्तराधिकार, विनिमय, गहाण, प्रभार, भाडेकरार, वहिवाट, अनुज्ञप्ती, धारणाधिकार, भेट, न्यास, विचाराधीन विवाद, देखभाल, ताबा, सुविधाधिकार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना खालील पत्यावर आवश्यक दस्तावेजांसमवेत त्यांचे दावे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावेत अन्यथा विहित कालावधीत अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास सादर करण्यात न आल्यास ते जाणीवपूर्वक अधित्यागित, परित्यागित व सदर व्यक्तीने सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल.

**अनुसूची**
**(सदर मालमत्ता)**

पुढील विवरणीत शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड-जमीन मोजमापित ८.३६ हेक्टर आर, सर्व्हे क्र ८४, गट क्र. १/हिस्सा क्र. १, मौजे बीड बुद्रुक, तालुका कर्जत, रायगड येथील.

दिनांक : १२.०६.२०२६

सही/-
**ॲड. नितीन ताभाणे**
नेक्सस लीगल (वकील)
न्यू अपोलो को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड
१४ वा रस्ता, खार (पश्चिम),
मुंबई - ४०० ०५२.
ई-मेल : nitin@nexuslegal.net.in
मोबा. नं. : ९८२३२४१८५१


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट-मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळः कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश
किरोल रोड : विद्याविहार (पश्चिम) : मुंबई-४०० ०८६

ई-मेल: eemumbai@rediffmail.com — फोन: ०२२-२५१३६३०३
क्र.राप/काअमु/ईनिविदा/३१५ — दिनांक: १०.०६.२०२६

**ई- निविदा सुचना क्रमांक ०३ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार (प) मुंबई ८६ दूरध्वनी क्र. २५१३६३०३ हे खालील कामा करीता सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या ठेकेदारांकडुन ई-निविदा मागवित आहेत.

| ई- ID क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| १३०७६६६_१ | रा.प. ठाणे विभागातील भिवंडी येथे तात्पुरते बसस्थानक बांधणे. | ७२८४८०८.०० |
| १३०७६६६_२ | रा.प. मुंबई विभागातील परळ आगारात विशेष दुरुस्ती करणे. (जुने पत्रे काढुन नवीन मेटाकुलर शिट बसविणे.) | ३३०३९२६.०० |
| १३०७६६६_३ | रा.प. मुंबई विभागातील विभागीय कार्यालय विद्याविहार येथे अतिथी कक्ष उपलब्ध करून देणे. | १६८६०८९.०० |
| १३०७६६६_४ | रा.प. रायगड विभागातील विभागीय कार्यशाळेतील देखभाल व दुरुस्ती शाखेवरचे पत्रे बदलणे व गटार बांधकाम करणे | १६६५६९६.०० |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | १२/०६/२०२६ | १०.०० |
| २. | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | २२/०६/२०२६ | ११.०० |
| ३. | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | २३/०६/२०२६ | ११.०० |

टीपः- १. सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या **https://mahatenders.gov.in** वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या **www.msrtc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. २. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील सदर कामांची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**कार्यकारी अभियंता**
**रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)**

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की सौ. मंगला रविंद्रनाथ जोशी श्री. रविंद्रनाथ जोशी यांचेकडून आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत विकत घेण्याचे ठरविले असून त्याबाबत बोलणी चालू आहे.

**मिळकतीचे वर्णन -:**

मौजे चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड, येथील स.नं. १२०, हि.नं. १ए, प्लॉट नं. १,२,३, या मिळकतीवर बांधण्यात आलेली ‘कावेरी को. ऑप. हौ. सोसायटी. लि’ मधील तळ मजल्यावरील निवासी सदनिका नं. ०४, क्षेत्र ५३६ चौ. फूट बिल्ट-अप (बाल्कनी सहीत). चेंढरे ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ६८/४, क्षेत्र ३८.९४ चौ.मी.

तरी वरील निवासी सदनिका मिळकतीबद्दल कुणाचाही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा अथवा लिज इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, इतर कोणाचाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची या नोटीसद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १२/०६/२०२६

सही/-
**ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम हॉटेलच्यावर
जिल्हा न्यायालयासमोर अलिबाग-रायगड
मो नं. ९२७१७७५२७७

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)**

ज.म.र.अर्ज ४८३/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. जावेद हुसेन कारबारो,
रा. राजपुरी, ता. मुरुड, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी. — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार या जन्म दि. १२/०६/१९७४ रोजी मौजे राजपुरी, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांचा दि. १२/०६/१९७४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास तो त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

| सही/- | सही/- |
|---|---|
| ठाणे अंमलदार | (आदेश डफळ) |
| मुरुड पोलीस ठाणे | तहसिलदार मुरुड-जंजिरा |

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वावळोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक हरिश्चंद्र सावळाराम कांबेरे यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| २१/४/ब | ००-३०-९० | ०५.०५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १२ जुन २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड -४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक दिपक मारुती म्हात्रे व मेघनाथ चंदर गायकवाड यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३०/५ | ००-१०-०० | ०.०६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून, ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक- १२ जुन २०२६

**ॲड. शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को. ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड -४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

### जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नांगुर्ले, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत यांनी विद्यामान मालक व कब्जेदार यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे नांगुर्ले, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील**

| मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| बिक्रमजीत सिंग<br>जसमित सिंग<br>गुरकिर्पाल सिंग<br>सुमित सैगल | ८ | ५/अ/१ | १-८२-५० | २.०९ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत करारनामा अथवा इतर हक्का हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खलील सही करणारे यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल. व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक १२/०६/२०२६
येणेप्रमाणे जाहीर नोटिस

सही /-
Adv. Aysha Hyka Saleem
ऑफिस ४०१-४०५, आय विंग,
अरेंजा प्लाझा, प्लॉट नं. ५२, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, ठाणे, नवी मुंबई ४००६१४
मो.नं. ८६९२०३८५६७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत त्या विद्यमान मालक १) माई कशिनाथ झुगे २) स्वाती चंद्रकांत हातमोडे ३) अंजली चंद्रशेखर मोकल ४) रंजना द्वारकानाथ पाटील ५) लक्ष्मी अनंत खुटले सर्व रा. नांदगाव, ता. पनवेल जि. रायगड यांच्या मालकीची खालील नमूद केलेली मिळकत हि विद्यमान मालक याच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| नांदगाव ता. पनवेल, जि.रायगड | २७/५ | ०-५२-४०<br>पो.ख. ०-०५-१०<br>एकूण ०-५७-५० | १२.६४ |

सदर वर नमूद केलेली गवत पड मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख ११/०६/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता-दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे महाळुंगे खुर्द, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून आमचे अशिलांनी कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ट**
**मौजे महाळुंगे खुर्द, ता. मुरुड, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| मालती यशवंत दांडेकर<br>विश्वास यशवंत दांडेकर<br>सुविधा सुधाकर दांडेकर,<br>रोहन सुधाकर दांडेकर<br>पुजा सुधाकर दांडेकर<br>अश्विनी अशोक घोंगे | ७६ | ०-८७-४०<br>०-०८-७०<br>एकूण **०-९६-१०**<br>पो. ख. ०-०५-९०<br>एकूण १-०२-००<br>(पैकी दक्षिणेकडील ० हे. ५० आर एवढी मिळकत) | १९.०९ |
| सुविधा सुधाकर दांडेकर,<br>रोहन सुधाकर दांडेकर<br>पुजा सुधाकर दांडेकर | ७७ | ०-०४-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण ०-०७-०० | ०.०३ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मानकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १२-६-२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
‘श्रुतीसारंग’को.ऑप.हा.सोसायटी
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी
अलिबाग, रायगड ४०२ २०१

### जाहिरात क्र. 65/2026

**भारत सरकार**
सार्वजनिक उपक्रम निवड मंडळामार्फत
**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**मध्ये**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.
अर्जदारांकडून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख
**व वेळ 26/06/2026 रोजी 15:00 वा. आहे.**
नोडल अधिकाऱ्यांकडून पीईएसबीकडे
अर्ज अग्रेषित करण्याची अंतिम
तारीख व वेळ
**06/07/2026 रोजी 17:00 वा. आहे.**
अधिक माहितीसाठी संकेतस्थळ
**https://www.pesb.gov.in**
वर लॉग इन करा.

### उपजिल्हा रुग्णालय रोहा, जि. रायगड
**जाहीर निविदा**

उपजिल्हा रुग्णालय रोहा, जि. रायगड येथील वापरुन निरुपयोगी झालेली रुग्णालयीन साहित्य सामुग्री, फर्निचर इ. साहित्यांची व साधन सामुग्रीची विक्री करायची आहे. यामध्ये लोखंडी/स्टील/धातू साहित्य, प्लास्टीक, इनेमल साहित्य, पुठ्ठे इ.

तरी प्रस्तुत साहित्य खरेदी करण्यास इच्छुक असलेल्या ठेकेदारांनी त्यांचे सिलबंद दरपत्रक जाहिरात प्रसिद्ध दिनांकापासून ७ दिवसांच्या आत उपजिल्हा रुग्णालय रोहा, जि. रायगड येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सादर करावे. सदर निविदेमध्ये जास्त दर असलेल्या ठेकेदारांची निविदा मंजूर केली जाईल. दरपत्रके मान्य करण्याचा किंवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खाली स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचा राहील याची नोंद घ्यावी.

टिप :- अटी व शर्ती लागू.

सही/-
**(डॉ. सचिन गोमसाळे)**
**वैद्यकीय अधिक्षक**
**उपजिल्हा रुग्णालय रोहा, जि. रायगड**

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक अमिता ओहरा व गुरविंदर सिंग यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड | ७३/५ | ०.२९.०० | ०.४१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : /०६/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक ओमलता शर्मा व सुनिता शर्मा यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड | ४५ | ०.११.६० | ०.६९ |
| | ४६/२ | २.०५.०० | १.२६ |
| | ४६/३ | १.६८.०० | ०.९७ |
| | ४६/५ | ०.०८.०० | ०.१२ |
| | ५१/१ | ०.७६.०० | ०.४१ |
| | ५५/१ | ०.९३.३० | ५.३१ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व ईतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : /०६/२०२६

**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given that I have been instructed to investigate the title of Mrs. Minal Manohar Kadam residing at 51, New Indradhanu CHS Limited, Plot No. 674, H.M. Patil Marg, Shivaji Park, Dadar (West), Mumbai - 400 028 (herein after referred to as "Owner") in respect of her plot of land bearing CTS No. 61, situated at Village Bagmala,, Taluka Alibaug admeasuring 17.50 R assessment Rs. 3.80 Paise House no. 1460 situated at Group Grampanchayat Nagaon, along with the building standing thereon

All persons having any claim/right/title/interest, if any, in the said property along with the building standing thereon or any part thereof by way of sale, transfer, exchange, gift, sub-lease, charge, mortgage, charge, lien, lease, tenancy, trust, maintenance, inheritance, possession, license or otherwise howsoever are hereby requested to make the same known in writing along with copies of supporting documents /papers to the undersigned at the address mentioned below, within a period of 14 days from the date of publication hereof, failing which, it will be presumed that the title of above named owner client in respect of the aforesaid plot of land along with structure standing thereon is clear, marketable and free from all encumbrances and claims if any are deemed to have been waived, and I will issue my Title Certificate certifying therein that the title of the above named owners to the said property alongwith the building standing thereon is clear, marketable and free from all encumbrances and reasonable doubts and my client will complete the transaction for purchase of the said property along with the building standing thereon.

Dated this 11th day of June 2026
Mr. Sameer Suresh Naik.
Advocate,
Flat No.103, 1st Floor, B Wing
Moreshwar Apartment Near JSM College,
Taluka Alibaug, District Raigad
Tel. Nos.
E-mail ID:

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे खार दुतर्फा बोर्ली, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- खार दुतर्फा बोर्ली, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| नरदास दत्तात्रेय पाटील<br>रामदास दत्तात्रेय पाटील<br>रोहिदास दत्तात्रेय पाटील<br>विश्वनाथ दत्तात्रेय पाटील<br>संगिता जयप्रकाश पाटील<br>ताईबाई नामदेव म्हात्रे<br>समिक्षा सुधीर ठाकूर<br>शुभांगी गणेश पाटील<br>विद्या विकास म्हात्रे<br>अभय कृष्णा म्हात्रे | ६१ | २ | ०-९३.३० | १०.०६ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालील प्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील नरदास दत्तात्रेय पाटील वगैरे १० यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १२/०६/२०२६

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को. ऑप हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला,
पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८




## राशीभविष्य

- **मेष** : अनुकूलता वाढत जाईल. उपजत कलेतून अर्थार्जन घडेल. ठाम विचारानं रहावं. धरसोडपणा टाळा.
- **वृषभ** : व्यवसायातील आर्थिक अंदाज चुकतील. जागरूक राहून व्यवहार करावे. अनावश्यक खर्च टाळावे.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात विशेष जागरूक रहावं. नव्या जबाबदाऱ्या वाढवू नका. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत जागरूक रहावं. अनावश्यक खर्चांना सामोरं जाल. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात.
- **सिंह** : आर्थिक व्यवहारात जागरूक रहाव. संततीच्या संगतीकडे दुर्लक्ष नको. शिक्षणात अडचणी येतील.
- **कन्या** : नोकरीत कर्तव्यकर्मास प्राधान्य द्यायवं. स्थावर प्रश्न सुटणार नाही. वाहनांपासून जपून असावं.
- **तूळ** : कौटुंबिक जीवनात सामंजस्यानं रहावं. आर्थिक स्थिती सुधारेल. सरकारी कामांना चालना मिळेल.
- **वृश्चिक** : समस्यांमधून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात समाधान लाभेल. अनुकूलता वाढत जाईल.
- **धनु** : घाईने निर्णय घेऊ नका. जीवन साथीदाराच्या प्रकृतीस जपायला हवं. मनाविरूध्द घटना संभवतात.
- **मकर** : नव्या योजना विचारानं राबवाव्यात. अनावश्यक खर्च कसोशीनं टाळावेत. फार दगदग करू नका.
- **कुंभ** : सरकारी कामं चिकाटीनं होतील. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. समस्या राहणार आहे.
- **मीन** : विनाकारण दडपण येईल. सरकारी कामं विचारपूर्वक करावी. अनावश्यक जबाबदारी स्वीकारू नका.

### स्टाईल स्टेटमेंट

## चलती ट्रेंडी टॉप्सची

छानसा टॉप तुमचा संपूर्ण लूक बदलून टाकतो. योग्य ॲक्सेसरीज आणि बॉटम कॅरी करून तुम्ही उठून दिसू शकता. सोबर टॉप्सपासून स्टायलिश टॉप्सपर्यंत प्रचंड व्हरायटी तुम्हाला पहायला मिळते.

✻ भरजरी आणि टेक्स्चर्ड पॅटर्नची आवड असेल तर तुम्ही नक्षीकाम केलेले टॉप्स निवडू शकता. बॉटमवर त्याच रंगाचा टॉप घालता येईल किंवा ड्युअल टोनही कॅरी करता येईल. ✻ पिवळ्या रंगाच्या टॉप्सची कायमच चलती असते. या रंगात स्टायलिश पॅटर्न्सची निवड करा. वेगवेगळे कट्स ट्राय करा. ✻ फ्लेअर्ड किंवा घेरवाले टॉप्स हा सुद्धा मस्त ऑप्शन आहे. वेगवेगळे प्रिंट्स, स्ट्राईप्स, चेक्समध्ये खेळा. स्लीव्हजचे वेगळे पॅटर्नही ट्राय करा. ✻ साध्या प्लेन व्हाईट टॉपलाही स्टायलिश बनवता येईल. ट्रेंडी गळे, नव्या जमान्याच्या स्लीव्हज असणारे व्हाईट टॉप्स निवडा. ✻ थोडा बोल्ड लूक आवडत असेल तर ऑफ शोल्डर कट्सवाले टॉप्स घ्या. डेनिम्स, शॉर्टस, स्कर्ट किंवा ट्राउजर्सवर ते घालता येतील.

## १२ जून

### दिन विशेष

**जागतिक बालकामगार निषेध दिन**

- **२०००** : मराठी मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या पु.ल.देशपांडे यांचे निधन.
- **२००३** : प्रसिद्ध अमेरिकी अभिनेता ग्रेगरी पेक यांचे निधन.
- **२०१५** : दिल्लीतील महाराष्ट्र सदन उभारणीत भ्रष्टाचारप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तीन अधिकारी निलंबित.
- **२०१८** : प्रसिद्ध आध्यात्मिक गुरू भय्यू महाराज यांनी राहत्या घरी स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली.

### सफर देशांची


## स्लोव्हाकियाविषयी...

स्लोव्हाकिया हा मध्य युरोपमधला छोटासा देश आहे. एकेकाळी हा झेकोस्लोव्हाकियाचा भाग होता. ७५ वर्षं या भूभागावर सोव्हियत युनियन म्हणजे सध्याच्या रशियाचं राज्य होतं. १९९० मध्ये हा भाग सोव्हियत युनियनपासून वेगळा झाला आणि १९९३ मध्ये तो झेक रिपब्लिकपासून वेगळा होऊन स्वतंत्र झाला. ब्रातिस्लाव्हा ही या देशाची राजधानी आहे. या देशातले लोक स्लोव्हाक भाषा बोलतात. झेक रिपब्लिक, पोलंड, युक्रेन, हंगेरी आणि ऑस्ट्रिया हे या देशाचे शेजारी आहेत. स्लोव्हाकिया चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला आहे. स्लोव्हाकियाचा बराचसा भूभाग डोंगराळ आहे. देशाच्या उत्तरेला कारपाथियन पर्वतरांगा आहेत. टॅट्रा या इथल्या सर्वात उंच पर्वतरांगा आहेत. इथे उन्हाळ्यात खूप गरम होतं तर थंडीत आर्द्रता बरीच जास्त असते. डन्यूब, वाह आणि एचरॉन या इथल्या प्रमुख नद्या आहेत. या देशात अनेक प्रजातींचे पक्षी आहेत. अस्वलं, लांडगे, रानमांजरं, मिंक असे प्राणी इथे आढळतात. या देशात विविध उत्पादनांची निर्मिती होते. मोठ्या प्रमाणात शेतीही केली जाते. धातूचं उत्पादन हा या देशातला प्रमुख उद्योग आहे. या देशात नैसर्गिक साधनसंपत्तीही भरपूर प्रमाणात आहे.

### आरोग्यमंत्र

## गुणकारी 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'

'होलिस्टिक डेंटिस्ट्री' हा दातांवरच्या उपचारपद्धतींचा एक प्रकार आहे. या उपचारपद्धतीत दातांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेतली जाते. या पद्धतीविषयी...



✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री' ही नावाप्रमाणे तोंडाच्या संपूर्ण आरोग्याची काळजी घेणारी उपचारपद्धती आहे. सर्वसामान्य उपचारपद्धतीत हिरड्या आणि दात यांच्या आरोग्यावर भर दिलेला असतो. हिरड्यांशी संबंधित विकारांचा संबंध हृदयविकार, मधुमेह आणि गरोदरपणा अशा विकारांशी असल्याचं बऱ्याच संशोधनांमधून समोर आलं आहे. तोंडाचं आरोग्य टिकवून ठेवलं तर व्यक्ती निरोगी राहू शकते, असं दंततज्ज्ञ मानतात. 'होलिस्टिक डेंटिस्ट्री' याची अंमलबजावणी करते. ✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'मुळे तोंडाचं आरोग्य सुधारतं. या उपचारपद्धतीमुळे दातांशी संबंधित छुप्या आजारांची माहिती मिळू शकते. ✻ 'होलिस्टिक डेंटिस्ट्री'त 'सेरेक रेस्टोरेशन्स' ही उपचारपद्धती वापरली जाते. ही उपचारपद्धती दातांमधले खड्डे बुजवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पारंपरिक उपचारपद्धतीपेक्षा अधिक उपयुक्त, टिकाऊ आहे. यामुळे दातांची संरचना बळकट होते. ✻ या उपचारपद्धतीत विषारी रसायनं तसंच घटकांचा वापर केला जात नाही. सर्वसाधारण उपचारपद्धतीत विषारी रसायनांचा वापर केला जातो. याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. उदाहरण द्यायचं झालं तर दातांमध्ये भरण्यात येणाऱ्या चांदीत पाऱ्याचं प्रमाण ५० टक्के असतं.

### पंचांग

**शुक्रवार, १२ जून २०२६**

पराभवनाम संवत्सर शके १९४८, अधिक ज्येष्ठ कृ. १२, चंद्रराशी : मेष, नक्षत्र : अश्विनी/भरणी, योग : अतिगंड, सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१४

### फॉरवर्ड्स

**आख़िर तक़ आपके साथ वहीं ठहरेंगे...**

**जिन्हें फ़ायदा नहीं आपकी फ़िकर हैं...!**

### फॅशन पॅशन

ओव्हरसाइज्ड आउटफिट्स म्हणजे नेहमीपेक्षा थोडे ढगळ कपडे. ८० आणि ९० च्या दशकात हा ट्रेंड खूपच लोकप्रिय होता. आता तो परत आला आहे. या ट्रेंडवर एक नजर टाकू या. खांद्यांवरून खाली येणारे ब्लेझर्स, लूज फिटिंगवाल्या पँट्स ही फॅशनला विचित्र म्हणता येणार नाही. मध्यंतरी महिलांनी अशी ओव्हरसाईज्ड फॅशन कॅरी केली होती. पण आता हा ट्रेंड मुलांच्या फॅशनविश्वात येऊन धडकला आहे. हा ट्रेंड सेट करण्यात आयुषमान खुराना, रणवीर सिंह, कार्तिक आर्यन अशा बॉलिवूड स्टार्सचा महत्त्वाचा वाटा आहे. **(क्रमश:)**

### करिअरवाटा

## जपा संपन्न वारसा

आपल्या देशाला मोठी ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. ऐतिहासिक वास्तू, गड–किल्ले यांच्या माध्यमातून देशाच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष पटते. मात्र या ऐतिहासिक स्थळांचं जतन आणि संवर्धन या बाबीही महत्त्वाच्या ठरतात. विशेषत: नव्या पिढीला हा ऐतिहासिक वारसा पाहता यावा यासाठी प्रयत्न होणं गरजेचं आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित क्षेत्रात संशोधनाला मोठा वाव आहे. आपल्याकडे इतिहासाच्या जाणकारांची संख्या खूप कमी आहे.



त्यामुळे इथे मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्याचप्रमाणे पुरातत्व संशोधन आणि पुरातत्वीय अवशेष जतन करून ठेवण्याच्या शास्त्रामध्ये अपरिमित संधी उपलब्ध आहेत. नॅशनल अर्काइव्हज् ऑफ इंडिया या संस्थेतर्फे स्कूल ऑफ अर्काइव्हल स्टडीज् ही शाखा स्थापन करण्यात आली असून तिच्यामार्फत पदविका अभ्यासक्रम सुरू आहे. कोणताही पदव्युत्तर पदवीधर या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. त्याला अर्काइव्ह मॅनेजमेंट, पब्लिक रेकॉर्डस् मॅनेजमेंट, कन्झर्व्हेशन ॲन्ड रिप्रोग्राफी तसंच इन्फर्मेशन ॲन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी या चार विषयांचं ज्ञान दिलं जातं. आवड असेल तर जरुर या क्षेत्राचा विचार करावा.

### खेचाखेची

**पत्ता !**

झम्प्या एका सुंदर मुलीला विचारतो, तुम्ही कुठे राहता?

**मुलगी** : एम. जी. रोड

**झम्प्या** : एवढ्या सुंदर असून तुम्ही रस्त्यावर राहता......?

### वेगळं काही

सध्या ८९ वर्षांच्या असणाऱ्या अर्नेस्टाइन शेफर्ड यांनी वयाच्या ७१ व्या बॉडीबिल्डिंग सुरू केलं. पन्नाशीपर्यंत त्या गृहिणीच होत्या. एके दिवशी कुटुंबासोबत फिरायला गेल्या असताना पतीने त्यांना स्वीमसूट घालायला सांगितला. त्यावेळी त्यांच्या बहिणीनेही स्वीमसूट घातला. त्या दोघी खूपच बेढब दिसत होत्या. मग त्यांनी व्यायाम करण्याचा निर्णय घेतला. मधल्या काळात बहिणीचं निधन झालं. मात्र त्या मागे हटल्या नाहीत. ७१ व्या वर्षी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सात महिने सराव केल्यानंतर पहिल्या बॉडीबिल्डिंग स्पर्धेत सहभागी व्हायला त्या तयार झाल्या. पहिलीच स्पर्धा त्यांनी जिंकली. आता त्या प्रौढ महिलांना बॉडीबिल्डिंगचं प्रशिक्षण देतात.

### सौंदर्यसाधना

## फॉर परफेक्ट मेक अप

मेक अप चांगला व्हावा अशी इच्छा असेल तर ब्रशेसचा वापर करायला हवा. मेक अप ब्रशचे प्रकार आणि वापर याविषयीची ही उपयुक्त माहिती.



✻ फाउंडेशन ब्लेंडिंग ब्रश– हा मेक अपचा बेसिक ब्रश आहे. या ब्रशने त्वचेवर हळू हळू फाउंडेशन पसरावं. यामुळे ते योग्य प्रकारे पसरलं जातं. ✻ कन्सिलर ब्रश– चेहऱ्यावरील डाग लपवण्यासाठी कन्सिलरचा वापर केला जातो. ब्रशच्या सहाय्याने कन्सिलर अधिक चांगल्या पद्धतीने लावलं जातं. डार्क सर्कल, सुरकुत्या, बारीक रेषा लपवण्यासाठी या ब्रशच्या निमुळत्या टोकाने कन्सिलर पसरावं. ✻ पावडर ब्रश– कन्सिलरनंतर पावडरचा क्रमांक येतो. त्वचेवर पावडर योग्यप्रकारे सेट होण्यासाठी या ब्रशचा वापर करावा. हा ब्रश ब्लश लावण्याच्या कामीही उपयोगी ठरतो. ✻ ब्लेंडिंग ब्रश– आयशॅडो लावण्यासाठी ब्लेंडिंग ब्रश परफेक्ट आहे. हा ब्रश मुलायम आणि लवचिक असतो. त्यामुळे आयशॅडो अगदी सहजतेने लावणं शक्य होतं. शंकू आकारातील ब्रश डोळ्याच्या वरच्या कोनांपर्यंतही सहजपणे पोहचू शकतो. ✻ हाय लायटर ब्रश– मेक अप खुलवण्यासाठी या ब्रशचा उपयोग होतो.

## सुडोकू ११४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ | | | ३ | | ४ | ६ |
| ३ | | ४ | ५ | | | | | |
| ९ | | | | | १ | | ७ | |
| ८ | ३ | ६ | | | ५ | | | १ |
| | | | | ३ | | | | |
| २ | | | ६ | | | ८ | ५ | ३ |
| | ९ | | १ | | | | | २ |
| | | | | | ७ | ५ | | ९ |
| १ | २ | | ३ | | | ६ | | |

**टीप** -

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १ | ८ | ४ | ६ | ७ | ९ | २ | ५ |
| ७ | ९ | ६ | १ | ५ | २ | ३ | ४ | ८ |
| २ | ५ | ४ | ३ | ९ | ८ | ७ | १ | ६ |
| ८ | ३ | ७ | ६ | १ | ५ | ४ | ९ | २ |
| ९ | २ | १ | ७ | ८ | ४ | ५ | ६ | ३ |
| ६ | ४ | ५ | २ | ३ | ९ | १ | ८ | ७ |
| १ | ८ | ३ | ९ | ७ | ६ | २ | ५ | ४ |
| ४ | ६ | ९ | ५ | २ | ३ | ८ | ७ | १ |
| ५ | ७ | २ | ८ | ४ | १ | ६ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ११४



**आडवे शब्द :–**

१) आपल्याला न आवडणाऱ्या व्यक्तीचे चांगल्या कार्यातही दोष दिसतात (म्ह)
६) सं. ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
९) खळ लावलेला पतंगाचा धागा
१३) वेडावाकडा
१६) दया,कीव,करुणा
१८) संथपणे, इकडे तिकडे पाहत, संथगतीने
२२) गती
२३) नासाडी,धुळधाण
२५) पकडलेल्या प्राण्यांचे घर
२७) फिकीर
२८) वर्षाव
२९) उगाच
३१) सोनचाफा
३३) गोव्यातील एक राजकीय पक्षाची आद्याक्षरे
३४) विधवा
३६) बाण,नदीचा काठ
३७) जेव्हा (सं.).
३९) राष्ट्रगीत लिहिणारे रविंद्रनाथ ✻✻✻
४१) बाम,जखमेवरील औषधी प्रकार
४४) नमस्कार
४६) शपथ
४८) राजकारभाराचे प्रमुख शहर
४९) चांदणी
५०) बोलणारा
५२) आईचा भाऊ
५३) गाडीचे छत
५५) ✻✻ देवोल धर्मेंद्रचा एक पुत्र
५६) मधुमक्षिका
५७) तात्काळ,जागच्याजागी
६०) गवताचे पान
६२) अतिशय रूक्षता
६५) शरम
६७) चिवचिवाट
७१) रुपेरी पडदा
७३) कल्पनेपलीकडील घटना
७६) श्रीकृष्णाच्या वडिलांचे नाव
७७) रात्रभर
७८) हात
८०) कुबेराचा सेवक
८१) कोळशाची पूड
८२) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
८३) तपासणी

**उभे शब्द:–**

१) नावात बदल
२) गणितातील उणे
३) तृतीया
४) लवण
५) पुष्कळदा
७) मलई
८) मोठी,जाड सुई
१०) चुका करत करत
११) सापाने टाकलेली त्वचा
१२) यज्ञ
१४) बट्टा,कलंक
१५) मच्छर
१६) सत्वांश
१७) सिंह
१९) चार आठवड्याचा काळ
२०) सागरगोटा
२१) त्याप्रमाणे
२४) राजा
२६) पुन्हा
२७) शरीर
२९) गणपतीचे एक नाव
३०) कार्य,काज
३१) कव्वाली म्हणणारा
३२) एक काळ्या रंगाचे बोर फळ
३४) गरजू मनुष्य
३५) रक्तवाहिनी
३८) रामदासस्वामींनी लिहिलेला ग्रंथ
४०) गौरवर्णी
४२) पुणे–नागपूर रेल्वे मार्गावरील एक जंक्शन
४३) चावट
४५) लोणी
४७) अधिक महिना
५१) बनारस
५२) वाजवी, योग्य, मध्यम, बेताचा
५४) वेतन
५५) समतल
५६) स्त्री
५८) कोट,अंगापेक्षा मोठा झालेला अंगरखा
५९) पोपट
६१) केसाला लावण्याचा रंग
६३) व्यय
६४) जनगणना
६६) अटीतील दोन शब्द
६७) कागदाचे कापून ठेवलेले तुकडे
६८) बडबड, वटवट
६९) सोन्याचा कस
७०) आच्छादन
७२) ज्या प्रमाण
७४) सुसर
७५) प्रजा
७७) भस्म,राखुंडी
७९) वाळवंट,युद्ध

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | य | त्या | पि | ठा | व | र | रे | घा | ओ | ढ | णे | | वा | र | स |
| या | म | | त्ता | | क्ष | मा | | व | ळ | | | आ | स | मा | न |
| त | | पा | श | वी | | र | द | न | | ता | क | द | | ना | द |
| नि | रा | म | य | | अ | म | र | | क | स | र | त | | य | |
| र्या | | र | | क्ष | प | ण | क | | ड | | न | | गा | क | र |
| त | या | | ख | त | रा | | दा | दा | बा | बा | क | र | णे | | वि |
| | क | वा | ड | | ध | मा | र | | कु | | र | | गा | | वा |
| सां | | स | क | ट | | न | | प | ट्टी | चा | | ठा | णे | दा | र |
| ज | न | क | | प | र | स | दा | र | | ल | व | ण | | द | |
| | वा | ट | प | | ट्टा | | वे | | क | च | र | | क | ला | प |
| घा | र | | सा | थ | | का | | द | ला | ल | | ध | ड | | सं |
| स | | ज | र | क | ब | र | क | | का | न | व | डा | | प | त |
| ले | ख | न | | वा | र | ण | | ख | र | | न | | | रा | |
| ट | | ग | ल | | क | | नो | ट | | उ | च | ल | बां | ग | डी |
| | स | ण | | ता | त | डी | | प | सा | भ | र | | ध | | न |
| ख | ल | ना | य | क | | र | पे | ट | | य | | का | व | ळा | |

# इंग्लंडमध्ये क्रिकेटचा थरार

## महिला टी २० विश्वचषक स्पर्धा; १२ संघ विजेतेपदासाठी झुंजणार

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

महिला टी-२० विश्वचषक नेहमीच अशा खेळाडूंसाठी सर्वात मोठे व्यासपीठ राहिले आहे, ज्यांना आपली प्रतिभा सिद्ध करायची आहे. अनेक दिग्गज क्रिकेटपटूंनी आपल्या कारकिर्दीची ओळख याच स्पर्धेतून निर्माण केली होती. १२ जूनपासून इंग्लंड आणि वेल्समध्ये सुरू होणाऱ्या विश्वचषकातही काही नवीन नावे चर्चेत येण्यासाठी सज्ज आहेत. पहिल्यांदाच १२ संघ सहभागी होत आहेत, ज्यामुळे नवीन खेळाडूंना आपली छाप सोडण्याची मोठी संधी मिळेल. यापैकी पाच खेळाडू अशा आहेत, ज्या पहिल्यांदा टी-२० विश्वचषक खेळतील आणि आपल्या संघांच्या आशांचे केंद्र असतील.

१०वा महिला टी-२० विश्वचषक १२ जूनपासून इंग्लंड आणि वेल्समध्ये सुरू होईल. पहिला सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात खेळला जाईल. अंतिम सामना ५ जुलै रोजी लॉर्ड्सवर होईल. यावेळी १२ संघ २४ दिवसांत ३३ सामने खेळतील.हा आतापर्यंतचा सर्वात मोठा महिला टी-२० विश्वचषक असेल. स्पर्धेचा गतविजेता न्यूझीलंड आहे. संघाने २०२४ मध्ये पहिल्यांदा विजेतेपद पटकावले होते. ऑस्ट्रेलिया ६ ट्रॉफीसह स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ आहे.

भारताने कधीही ट्रॉफी जिंकली नाही. संघाने ४ वेळा उपांत्य फेरीत आणि एकदा अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. भारत यावेळी 'ग्रुप ऑफ डेथ' मध्ये आहे, ज्यात ऑस्ट्रेलिया-दक्षिण आफ्रिका यांसारखे संघ आहेत. भारताचा पहिला सामना १४ जून रोजी बर्मिंगहॅममध्ये पाकिस्तानशी होईल.

२००९ मध्ये पहिल्यांदा महिला टी-२० विश्वचषक इंग्लंडमध्ये झाला होता. या स्पर्धेत ८ संघ सहभागी झाले होते. यजमान इंग्लंडच पहिला विजेता ठरला होता. सुरुवातीच्या ३ विश्वचषकांपर्यंत ८ संघ खेळत होते. २०१४ पासून संघांची संख्या वाढून १० झाली. २०२६ मध्ये पहिल्यांदाच १२ संघ सहभागी होत आहेत.

इंग्लंड १७ वर्षांनंतर विश्वचषकाचे यजमानपद भूषवत आहे. १२ संघांना प्रत्येकी ६-६ च्या दोन गट आणि मध्ये विभागले आहे. गट टप्प्यात सर्व संघ एकमेकांशी खेळतील. त्यानंतर दोन्ही गटांतील टॉप-२ संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. उपांत्य फेरी जिंकणारा संघ अंतिम सामना खेळेल.



### या खेळाडुंवर असणार नजर

**क्रांती गौड :** २३ वर्षीय क्रांती गौड सुमारे एक वर्षापूर्वीपर्यंत भारतीय क्रिकेटमधील एक उदयोन्मुख प्रतिभा होती, परंतु आता ती संघातील महत्त्वाच्या वेगवान गोलंदाजांपैकी एक मानली जाते. गेल्या १२ महिन्यांत तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वेगाने आपली ओळख निर्माण केली आहे. तिने २९ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ३५ बळी घेतले आहेत. भारताला जर वर्ल्ड कपमध्ये चांगली सुरुवात हवी असेल, तर क्रांतीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल. हा तिचा पहिला टी वर्ल्ड कप आहे, पण तिच्याकडून अनुभवी खेळाडूंपेक्षा कमी अपेक्षा नाहीत.

**इसी वोंग :** इंग्लंडची वेगवान गोलंदाज २४ वर्षीय वोंग दीर्घकाळापासून क्रिकेट तज्ज्ञांच्या नजरेत आहे. २०२३ मध्ये ती संघासोबत राखीव खेळाडू म्हणून गेली होती. आता पूर्णपणे तंदुरुस्त होऊन परतणाऱ्या वोंगला घरच्या मैदानावर स्वतःला सिद्ध करण्याची सुवर्णसंधी आहे.

**कायला रेनेके :** द. आफ्रिकेची २१ वर्षीय कायला रेनेकेला भविष्य मानले जात आहे. माजी अंडर-१९ कर्णधार रेनेके ऑफ स्पिनर असण्यासोबतच खालच्या फळीत जलद धावा करण्याची क्षमताही ठेवते.

**जॉर्जिया वोल :** २२ वर्षीय युवा फलंदाजाने १२ टी आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये १५६.४३ च्या स्ट्राइक रेटने आणि ३९ च्या उत्कृष्ट सरासरीने ४७४ धावा केल्या आहेत. एलिसा हीलीच्या निवृत्तीनंतर जी जागा रिकामी झाली आहे, ती भरण्याची जबाबदारी वोलवर येऊ शकते. वर्ल्ड कपसारखे मोठे व्यासपीठ तिच्यासाठी स्वतःला सिद्ध करण्याची संधी असेल.

**स्टेरे कालिस :** नेदरलँड्स पहिल्यांदाच महिला टी २० वर्ल्ड कपमध्ये भाग घेत आहे आणि संघाची सर्वात मोठी आशा स्टेरे कालिस असेल. २६ वर्षांच्या वयात तिच्याकडे ६४ आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे, ज्यात तिने १९४९ धावा केल्या आहेत.

## राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांसाठी विलंब

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रीडा क्षेत्रात सध्या काहीशी अस्वस्थता आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांच्या घोषणेत होत असलेला विलंब. निवड समितीने सहा महिन्यांआधी आपल्या शिफारशी सादर केल्या, पण पुरस्कारांची अद्याप घोषणा झालेली नाही.

हा प्रदीर्घ कालावधी प्रक्रियेचा एक भाग असून पुरस्कारांची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी आवश्यक आहे. मात्र, या कारणांमुळे खेळाडू समाधानी नाहीत. ऑलिम्पिक पदक आणि खेलरत्न पुरस्कार विजेत्या एका खेळाडूने यावर खंत व्यक्त केली. हा खेळाडू म्हणाला, महा विलंब खेळाडूंचे मनोबल खच्ची करणारा आहे.

२०२० मधील कोविड महामारीनंतर कार्यक्रमाच्या तारखांमध्ये सातत्य राहिलेले नाही. त्या वेळी आरोग्यविषयक निर्बंधांमुळे हा कार्यक्रम आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आला होता. अंतिम यादी निश्चित झाल्यानंतर एका आठवड्यात मंत्रालयाने औपचारिक घोषणा करणे अपेक्षित होते. एका माजी खेलरत्न विजेत्याच्या मते, पुरस्कारांसाठी नेहमी ठरावीक वेळापत्रक असायला हवे. आवश्यक मूल्यमापन जरूर करा, पण अशा प्रकारे नावांची घोषणा रोखून ठेवू नये. निवड झालेल्या बहुतेक व्यक्ती या सन्मानास पात्र आहेत, याची खात्री आहे.

## वैभव सूर्यवंशीच्या मित्राने केला कहर

**नवी दिल्ली :** स्फोटक फलंदाजीने धुमाकूळ घालणारा १५ वर्षांचा युवा सेन्सेशन वैभव सूर्यवंशी सध्या टीम इंडियाच्या आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाल्यामुळे चर्चेत आहे. तो सध्या इंडिया-ए संघाकडून ट्राय-नेशन मालिकेत खेळत आहे. ही चर्चा सुरू असतानाच, आता वैभवच्या पावलावर पाऊल ठेवत त्याच्या मित्रानेही क्रिकेटच्या मैदानावर धावांचे प्रचंड वादळ आणले आहे.

वैभव सूर्यवंशीचा बालमित्र अयान राज याने मुजफ्फरपूर जिल्हा अंडर-१६ क्रिकेट लीगच्या पहिल्याच सामन्यात विरोधी संघाच्या गोलंदाजांची अक्षरशः धूळधाण उडवली. अयानने अवघ्या ८३ चेंडूंमध्ये २१० धावांची विस्मयकारक आणि दुहेरी शतकी खेळी साकारली आहे.

## दुखापत होण्यापूर्वीच एआय देणार अलर्ट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फिफा वर्ल्ड कप २०२६ हा फुटबॉल इतिहासातील आजवरचा सर्वात मोठा आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सर्वाधिक प्रगत ठरत आहे. यंदा पहिल्यांदाच या स्पर्धेत तब्बल ४८ संघ सहभागी झाले आहेत.



सामन्यांची वाढलेली संख्या, कडक वेळापत्रक आणि वेगवेगळ्या देशांमधील प्रवास यामुळे खेळाडूंच्या शरीरावर आणि मानसिकतेवर कमालीचा ताण पडत आहे. अशा हाय-स्टेक्स स्पर्धेत हॅमस्ट्रिंग किंवा स्नायू फाटणे यांसारख्या गंभीर दुखापती एखाद्या स्टार खेळाडूचे वर्ल्ड कपचे स्वप्न एका झटक्यात हिरावून घेऊ शकतात. याच आव्हानाचा सामना करण्यासाठी यंदा फिफाने अधिकृत टेक्नॉलॉजी पार्टनर लेनोव्हो कंपनीच्या सहकार्याने प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता इन्फ्रास्ट्रक्चर आणि स्मार्ट वेअरेबल्सचे एक अभेद्य मडिजिटल सुरक्षा कवचफ मैदानात उतरवले आहे.

रिअल-टाइम डेटा आणि दुखापतींचे भाकीत सर्वसामान्य भाषेत सांगायचे तर, आजकालचे फुटबॉलपटू जर्सीच्या आत जे स्मार्ट वेअरेबल्स घालतात, त्यामध्ये हाय-टेक बायोमेट्रिक सेन्सर्स बसवलेले असतात. हे सेन्सर्स थेट लेनोव्होच्या शक्तिशाली एआय-पॉवर्ड ॲनालिटिक्स सिस्टीमशी जोडलेले असतात.जेव्हा एखादा खेळाडू मैदानात वेगाने धावतो, अचानक दिशा बदलतो किंवा उडी मारतो, तेव्हा त्याच्या स्नायूंची हालचाल, हृदयाचे ठोके आणि रक्तातील ऑक्सिजनची पातळी यावर एआय रिअल-टाइममध्ये म्हणजेच त्याच सेकंदाला बारीक लक्ष ठेवते. स्नायूंवर अतिरिक्त ताण पडल्यास किंवा शरीरात कमालीचा थकवा आल्यास, मानवी डोळ्यांना किंवा अनुभवी प्रशिक्षकांनाही ते लगेच दिसणार नाही, पण एआय ते अचूक पकडते. खेळाडू दुखापतीच्या छायेत पोहोचण्यापूर्वीच एआय अल्गोरिदम्स त्याच्या धावण्याच्या शैलीतील आणि शरीराच्या संतुलनातील सूक्ष्म बदल पकडतात आणि टीमच्या मेडिकल स्टाफला एडव्हान्स अलर्ट पाठवतात.

## श्रीलंकेवर भारताचा थरारक विजय

**। दांबुला । वृत्तसंस्था ।**

तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील भारत अ संघाने यजमान श्रीलंका अ संघाविरुद्ध हातून निसटलेला सामना जिंकून दाखवत तिरंगी वनडे मालिकेत विजयी सलामी दिली आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाने ऋतुराज गायकवाडचे दमदार शतक आणि तिलक वर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर निर्धारित ५० षटकात ६ बाद २७७ धावा करत श्रीलंकेच्या संघासमोर २७८ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या संघाने दमदार फलंदाजी केली.

अखेरच्या १८ चेंडूत ४ विकेट्स हाती असताना श्रीलंकेला विजयासाठी १७ धावांची गरज होती. हा सामना भारताच्या हातून निसटल्याचे चित्र निर्माण झाले होते. पण ४८ व्या षटकात अंशुल कंबोज याने श्रीलंकेचा कर्णधार सहान अरचिगे याची विकेट घेत सामन्यात ट्विस्ट आणला. कर्णधार माघारी फिरल्यावर श्रीलंकेची तळाची फलंदाजी गडबडली. अर्शद खानच्या ४९ व्या षटकात भारतीय संघाने ४ चेंडूत ३ विकेट्स मिळवत ८ धावांनी थरारक विजय नोंदवला.

दांबुला आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात भारतीय अ संघाचा कर्णधार तिलक वर्मानं नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

युवा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशी १४ (१२) आणि प्रभसिमरन सिंग २ (११) आणि प्रियांश आर्य ३२ (३२) धावा करून माघारी फिरल्यावर भारतीय संघ अडचणीत सापडला होता. पण उप कर्णधार ऋतुराज गायकवाडनं कर्णधार तिलक वर्माच्या साथीनं दमदार भागीदारी रचत संघाचा डाव सावरला.

या दोघांनी चौथ्या विकेटसाठी १८५ चेंडूत १५० धावांची भागीदारी रचली. या दोघांच्या आश्वासक खेळीशिवाय आयुष बडोनी याने १८ चेंडूत २४ तर सूर्यांश शेडगे याने १४ चेंडूत नाबाद २६ धावांची खेली केली. जोरावर भारतीय संघाने निर्धारित २० षटकात ६ बाद २७७ धावांपर्यंत मजल मारली होती.

भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना निरोशन डिक्केला ४७ (४५) आणि अविष्का फर्नांडो ४५ (५९) या श्रीलंकन सलामी जोडीनं पहिल्या विकेटसाठी ९३ धावांची दमदार भागीदारी केली. आयुष बडोनी याने या दोघांना तंबूचा रस्ता दाखवला. विपराज निगमनं नुवानिदु फर्नांडोला अवघ्या ८ धावांवर माघारी धाडत श्रीलंकेला तिसरा धक्का दिला.

अनुकूल रॉयनं सदीरा समरविक्रमाच्या खेळीला ४६ धावांवर ब्रेक लावला टीम इंडियाला मॅचमध्ये आणले. पण दुसऱ्या बाजूला कर्णधार सहान अरचिगे भारताच्या विजयातील अडथळा बनून उभा होता. ४८ व्या षटकात अंशुल कंबोजनं त्याची विकेट घेतली. ७२ चेंडूत ७४ धावा करून तो माघारी फिरला अन् ४९ व्या षटकात तीन विकेट्स घेत भारतीय संघाने सामना जिंकला.

## आयुष शुक्लाचा भीमपराक्रम

**। हाँगकाँग । वृत्तसंस्था ।**

पालघर जिल्ह्यातील बोईसर येथे जन्मलेल्या आयुष शुक्लाने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये ऐतिहासिक कामगिरी करत मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. हाँगकाँग क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आयुषने मंगोलियाविरुद्धच्या सामन्यात सलग चार षटके निर्धाव टाकून क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सलग ४ षटके मेडन टाकणारा आयुष शुक्ला हा पहिलाच आशियाई गोलंदाज ठरला आहे. तर, जागतिक पातळीवर अशी कामगिरी करणारा तो जगातील तिसरा गोलंदाज बनला आहे.

मंगोलिया विरुद्धच्या सामन्यात हाँगकाँगच्या रणनीतीनुसार अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत आयुषने विरोधी फलंदाजांना जखडून ठेवले. त्याने आपल्या २४ चेंडूंच्या स्पेलमध्ये एकही धाव दिली नाही आणि एक विकेट घेतला. आयुषच्या या घातक गोलंदाजीमुळे मंगोलियाचा डाव अत्यंत स्वस्तात आटोपला. हाँगकाँगकडून खेळत असला तरी आयुष शुक्लाचा जन्म महाराष्ट्रातील मुंबईजवळील पालघर जिल्ह्यातील बोईसर येथे झाला आहे.

अवघ्या २१ व्या वर्षी तो हाँगकाँगच्या राष्ट्रीय क्रिकेट संघाचा नियमित सदस्य बनला. त्याने आतापर्यंत खेळलेल्या ३४ आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांत २९ विकेट घेतले आहेत. आयुषच्या गोलंदाजीतील धार यापूर्वीही पाहायला मिळाली आहे.

### इंग्लंडकडून पाच धावांनी पराभव
### रिचा घोषची एकाकी झुंज व्यर्थ

## टीम इंडियाची क्वीन मुख्य परीक्षेआधी पुन्हा नापास!

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

महिला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेआधी भारतीय महिला संघाच्या सलामी जोडीनं टीम इंडियाचं टेन्शन वाढवलं आहे. अनुभवी सलामीची बॅटर स्मृती मानधना इंग्लंडविरुद्धच्या सराव सामन्यात पुन्हा एकदा सपशेल अपयशी ठरली. आघाडीच्या फळीतील फ्लॉप शोनंतर रिचा घोष हिने एकाकी झुंज देत इंग्लंडला तगडी फाईट देण्याचा प्रयत्न केला. शेवटच्या षटकापर्यंत रंगतदार झालेल्या सामन्यात भारतीय संघाला ५ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला.



कार्डिफच्या सोफिया गार्डन्स मैदानावर खेळवण्यात आलेल्या सराव सामन्यात इंग्लंडच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी केली. एमी जोन्स ६४ आणि कर्णधार नॅट सायव्हर ब्रंट ५७ या दोघींच्या अर्धशतकाच्या जोरावर इंग्लंडच्या संघाने निर्धारित २० षटकात ६ विकेट्सच्या मोबदल्यात १७१ धावा करत भारतीय संघासमोर १७७२ धावांचे टार्गेट सेट केले होते. गोलंदाजीत श्रेयंका पाटील हिने सर्वाधिक २ तर राधा यादव, श्री चरणी, रेणुका ठाकूर आणि शफाली वर्मानं प्रत्येकी १-१ विकेट् आपल्या खात्यात जमा केली.

इंग्लंडच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना स्मृती आणि शफालीकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. पण मुख्य स्पर्धेला सुरुवात होण्याआधी टीम इंडियाच्या क्वीनचा इंग्लंडच्या मैदानातील फ्लॉप शो कायम राहिला. ती ६ चेंडूचा सामना करून एवढ्या एका धावेवर बाद झाली. तिचा खराब फॉर्म टीम इंडियासाठी चिंतेचा विषय ठरताना दिसत आहे. शफालीनंही ६ चेंडूत १३ धावा करत मैदान सोडले. कर्णधार हरमनप्रीत कोरनं १८ चेंडूत १७ दावांचे योगदान दिले. धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाने ८७ धावांवर अर्धा संघ तंबूत परतला असताना रिचा घोषनं ३६ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ६८ धावांची दमदार खेळी केली.

## निवडक

### पाकिस्तानविरुद्ध स्मृती रचणार इतिहास

**नवी दिल्ली :** टी २० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला १२ जूनपासून सुरूवात होणार आहे. या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना १४ जून रोजी पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानशी होणार आहे. या सामन्यात स्मृती मंधानाला नंबर १ होण्याची संधी आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये स्मृती मंधाना सध्या तिसऱ्या स्थानावर आहे. दुसरे स्थान पाकिस्तानची माजी कर्णधार बिस्माह मारूफ आणि पहिल्या स्थानावर मिताली राज आहे. मिताली राजने पाकिस्तानविरुद्ध १० टी २० सामन्यात ३१५ धावा केल्या आहे. बिस्माह मारूफने भारताविरुद्ध १४ टी २० सामन्यात २४८ धावा केल्या आहेत. तर स्मृती मंधानाने १० टी २० सामन्यात २३९ धावा केल्या आहेत. मारुफला मागे टाकण्यासाठी तिला फक्त १० धावांची गरज आहे. स्मृती मंधानाला अव्वल स्थानी पोहोचण्यासाठी फक्त ७७ धावांची गरज आहे. पाकिस्तानविरुद्ध ७७ धावा करून स्मृतीला अव्वल स्थानी पोहोचणे शक्य आहे का? हे सोपे नसले तरी, अवघडही नाही, विशेषतः सामना इंग्लंडमध्ये आणि जून महिन्यात होत असल्यामुळे. कारण इंग्लंड आणि जून महिना स्मृतीसाठी यापूर्वी चांगला ठरला आहे. स्मृती मंधानाने गेल्या वर्षी जूनमध्ये इंग्लंडमध्ये तिच्या कारकिर्दीतील सर्वोच्च टी २० आंतरराष्ट्रीय धावसंख्या, तसेच पहिले शतक झळकावले होते. हा सामना नॉटिंगहॅममध्ये झाला होता. पाकिस्तानविरुद्धचा सामना एडजबॅस्टन येथे खेळला जाईल. जून महिना असल्याने स्मृती त्या इतिहासाची पुनरावृत्ती करेल अशी अपेक्षा आहे.



### रूट भूषवणार इंग्लंडचे कर्णधारपद

**लंडन :** न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी इंग्लंडचे कर्णधारपद जो रूट भूषवेल. तो ४ वर्षांनंतर संघाची धुरा सांभाळेल. नाइटक्लब प्रकरणामुळे नियमित कर्णधार बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन यांना वगळण्यात आले आहे. दुसरी कसोटी १७ जूनपासून सुरू होईल. लॉर्ड्स कसोटी जिंकल्यानंतर स्टोक्स आणि ॲटकिन्सन एका क्लबमध्ये गेले होते, जिथे वाद झाला होता. मात्र, संपूर्ण प्रकरण अद्याप समोर आलेले नाही. इंग्लिश बोर्ड या संपूर्ण वादाची चौकशी करत आहे. पहिल्या कसोटीत ७ जून रोजी इंग्लंडने न्यूझीलंडला ११५ धावांनी हरवले होते. रविवारी पहिल्या कसोटीच्या शेवटच्या दिवशी गस ॲटकिन्सनने ३० धावा देऊन ५ बळी घेतले होते. विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठीच खेळाडू रात्री बाहेर गेले होते, जिथे रग्बी क्लबच्या खेळाडूंशी त्यांची बाचाबाची झाली.इंग्लंडच्या खेळाडूंचे मैदानाबाहेरील वर्तन गेल्या काही काळापासून डोकेदुखी ठरले आहे. अलीकडेच ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ॲशेस दौऱ्यादरम्यानही खेळाडूंच्या रात्री उशिरापर्यंत पार्टी करण्याच्या आणि दारूशी संबंधित शिस्तभंगाच्या प्रकरणांवर जोरदार टीका झाली होती.रूटने २०१७ ते २०२२ दरम्यान ६४ कसोटी सामन्यांमध्ये इंग्लंडचे कर्णधारपद भूषवले होते. स्टोक्सने २०२२ पासून कर्णधारपद स्वीकारले होते. मात्र, संघाचा उपकर्णधार हॅरी ब्रूक आहे.



### भारतीय क्रिकेटमध्ये पुन्हा 'द्रविड'राज

**मुंबई :** भारताचा माजी मुख्य प्रशिक्षक अन् दिग्गज फलंदाज राहुल द्रविड याच्या मुलाची भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड झाली आहे. अन्वयच्या निवडीमुळे भारतीय क्रिकेटमध्ये आता पुन्हा एकदा द्रविड राज पाहायला मिळणार आहे. भारताचा १९ वर्षांखालील संघ पुढील महिन्यात श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. तिथे तीन वन डे व चार दिवसीय दोन सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. अध्यक्ष शरथ श्रीधरन यांच्या नेतृत्वाखालील ज्युनियर क्रिकेट निवड समितीने गुरुवारी द्विपक्षीय दौऱ्यासाठी व्हाईट-बॉल आणि रेड-बॉल संघांची अधिकृतपणे घोषणा केली. हा दौरा ४ जुलै २०२६ रोजी हंबनटोटा येथे सुरू होईल. १७ वर्षीय अन्वय याला देशांतर्गत वयोगट क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरीमुळे ही संधी मिळाली आहे. मध्य प्रदेशच्या यशवर्धन सिंग चौहानची संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली असून, लक्ष्य रायचंदानीला उपकर्णधार म्हणून नेमण्यात आले आहे. अन्वयने अलीकडेच विनू मांकड ट्रॉफीदरम्यान देशांतर्गत क्रिकेटमध्ये लक्ष वेधून घेतले, जिथे त्याने कर्नाटकच्या संघाचे नेतृत्व करत संघाला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचवले. अन्वयने मधल्या फळीत खेळताना सहा डावांमध्ये २२० धावा जमवल्या. धावांचा पाठलाग करताना अत्यंत दबावाखाली हिमाचल प्रदेशविरुद्ध त्याने ८२ धावांची नाबाद मॅच विनिंग खेळी केली होती.



### मानव सुथारला इंग्लंडमधून ऑफर

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा फिरकीपटू मानव सुथार आता काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळताना दिसणार आहे. त्याने इंग्लंडचा प्रसिद्ध काउंटी क्लब मवॉरिकशायरफसोबत काउंटी चॅम्पियनशिपच्या पुढील दोन सामन्यांसाठी अल्पकालीन करार केला आहे. क्लबने बुधवारी यासंदर्भात अधिकृत घोषणा केली.पहिल्या कसोटीमध्ये मानवने घेतल्या सात विकेट वर्षांच्या सुथारने आपल्या पदार्पणाच्याच कसोटी सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत एकूण ७ विकेट्स घेतल्या. यात पहिल्या डावात अवघ्या ३३ धावा देत ६ बळी घेण्याच्या कामगिरीचाही समावेश आहे. त्याच्या या घातक गोलंदाजीच्या जोरावर भारताने अफगाणिस्तानचा एक डाव आणि ३०० धावांनी पराभव करत कसोटी इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला.पहिल्याच सामन्यातील या दमदार कामगिरीमुळे मानव सुथारला ही मोठी संधी मिळाली आहे. वॉरिकशायरच्या यॉर्कशायर आणि सोमरसेटविरुद्ध होणाऱ्या सामन्यांसाठी तो उपलब्ध असेल. भारतासाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण करण्यापूर्वी त्याने २९ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये १२९ विकेट्स घेतल्या आहेत. सुथारच्या येण्याने आमच्या गोलंदाजीला अधिक धार येईल, असा विश्वास वॉरिकशायर क्लबने व्यक्त केला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)